# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (III)

## स्पेशल पेपर- I POL २३२ (SPL-१) २११४२

## आधुनिक राजकीय विचारप्रणाली

## Modern Political Adeologies

## राज्यशास्त्र- जून २०१४

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

**द्वितीय वर्ष कला सत्र- III**

**१) लोकशाही-**

- लोकशाही अर्थ, व्याख्या, प्रकार, आवश्यक घटक
- लोकशाहीच्या कार्यवाहीतील अडथळे
- लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक अटी
- लोकशाहीचे गुण, दोष, भवितव्य आणि महत्त्व

**२) राष्ट्रवाद-**

- अर्थ, व्याख्या, राष्ट्र आणि राज्य यातील फरक
- राष्ट्रवादाचे आधारभूत घटक
- प्रागतिक आणि प्रतिगामी राष्ट्रवाद
- राष्ट्रवादाचे गुणदोष महत्त्व
- विश्वराज्य

**३) लोकशाही समाजवाद-**

- अर्थ, स्वरूप, विकास
- लोकशाही समाजवादाची मूलभूत वैशिष्ट्ये
- १. फेबियन समाजवाद २. श्रमिक संघवाद ३. व्यवसाय संघवाद
- मूल्यमापन, पूर्णता, मर्यादा आणि महत्त्व

**४) पर्यावरणवाद-**

- अर्थ, व्याख्या, स्वरूप
- मानव आणि निसर्ग यातील संबंध
- पर्यावरण प्रदुषणाची संकल्पना
- जागतिक तापमान वृद्धी
- पर्यावरण व्यवस्थापन आणि कायदा

## प्रकरण १ पहिले
## लोकशाही

**प्र १ ला.लोकशाही व्याख्या सांगुन लोकशाही प्रकार सांगा.**

जगामध्ये लोकशाही शासन प्रणाली आदर्श मानली जाते. जगातल्या अनेक देशांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला दिसतो. लोकशाहीचा उदय ग्रीक नगर राज्यात मध्ये झालेली दिसतो. ग्रीक नगर राज्यामध्ये प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. ॲरिस्टॉटलच्या लिखाणात लोकतंत्र शासन प्रकाराचा उल्लेख आहे. त्यावरून लोकशाही हा प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला शासन प्रकार आहे. मध्ययुगात लोकशाहीचे स्वरूप अधिक व्यापक झाले. वाढती लोकसंख्या आणि राज्याच्या वाढत्या आकारमानामुळे प्रत्यक्ष लोकशाही ऐवजी प्रतिनिधिची संकल्पना विकसित होऊन अप्रत्यक्ष वा प्रतिनिधिक लोकशाहीचा उदय झाला. सद्यकाळात जगातल्या विविध देशांनी अप्रत्यक्ष वा प्रतिनिधीक लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसतो.

**लोकशाही अर्थ, व्याख्या व स्वरूप-**

लोकशाहीला इंग्रजी Democracy असे म्हणतात. हा शब्द Demos (डेमॉंस)म्हणजे लोक वा प्रजा Cratia (क्रेट्रिया) सत्ता वा राज्य करणे अशा दोन ग्रीक शब्दा पासून तयार झालेला दिसतो. लोकशाहीचा शब्दाचा अर्थ लोकांची सत्ता म्हणजे लोकशाही असा होतो. लोकशाही विचार प्राचीन काळापासून अस्तित्वात असला तरी त्याचे सिद्धांत आणि तत्त्वज्ञान विकसित झालेले नव्हते. माल्कम वायलीच्या मते "स्थल-काल-परिस्थितीनुसार लोकशाही विकसित होते आणि त्यात सतत परिवर्तन होत असते. त्यामुळे ती एक गतीमान संकल्पना आहे." आधुनिक लोकशाही शासनपद्धतीचा विकास जवळपास हजार वर्षापासून सतत चालू राहिलेला आहे. इंग्लंडमध्ये राजा आणि प्रजा यांच्या दीर्घ संघर्ष, विचारविनिमय आणि तडजोडीच्या माध्यमातून इंग्लंडमध्ये लोकशाहीचा विकास झाला. त्यामुळे इंग्लंड देशाला लोकशाहीची जननी मानली जाते.

**१. अब्राहम लिंकन:-** यांच्या मते लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य होय.

**२.सिसो :-** ज्या शासन व्यवस्थेत प्रत्येकाचा वाटा किंवा अंश असतो या शासन प्रकाराला लोकशाही असे म्हणतात.

**३. प्रा. सिलीच्या मते-** लोकशाही शासनात भाग घेण्याची संधी प्रत्येक व्यक्तीला मिळत असते.

वरील व्याख्याचा विचार करता लोकशाही शासनपद्धती ही अत्यंत व्यापक आहे. काही विचारवंत लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे असे मानतात. लोकशाहीत जनता सार्वभौम असते. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जनतेला असते. जनतेने निवडलेले प्रतिनिधि अंतिमतः जनतेला जबाबदार असतात. त्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही.

**लोकशाहीच प्रकार व वर्गीकरण :-**

लोकशाही शासनाचे मुख्य दोन प्रकार पडतात

**अ. प्रत्यक्ष लोकशाही-**

राज्य कारभारात जनता प्रत्यक्ष भाग घेते. त्या शासन प्रकाराला प्रत्यक्ष लोकशाही म्हणतात. या प्रकारात राज्यातील सर्व नागरीक विशिष्ट ठिकाणी एकत्र येऊन विचारविनिमय करून राज्यकारभार चालवित असत, कायदे व नियम स्वतः तयार करत असत, जनतेकडून राज्याचा प्रमुख निवडला जाई, राज्याचा प्रमुख जनतेच्या मर्जीनुसार निर्णय घेत असे. प्राचीन काळी ग्रीक नगर राज्यात हा प्रकार अस्तित्वात होता. नगर राज्याची लोकसंख्या खूप कमी होती. मर्यादीत लोकांना नागरिकत्वाचा अधिकार असल्याने त्यांना एकत्र येणे सहज शक्य होते. परंतु सद्यकाळात राष्ट्राचे आकारमान व लोकसंख्या प्रचंड वाढल्यामुळे कोणत्याही देशात प्रत्यक्ष लोकशाही हा शासन प्रकार दिसून येत नाही.

आधुनिक काळात अनेक देशामध्ये अप्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात असली तरी त्या लोकशाहीला व्यापक स्वरूप देण्यासाठी प्रत्यक्ष लोकशाहीस पूरक काही मार्ग वापरले जातात. स्विझर्लंड देशात प्रत्यावहन (Recall) अधिकार जनतेला दिलेला आहे. या अधिकाराचा वापर करून जनता इच्छेनुरूप कार्य करू न शकणाऱ्या प्रतिनिधिस परत बोलवू शकते. याशिवाय सार्वमताचा अधिकार दिलेला आहे. कायदेमंडळाने केलेल्या कायद्यावर जनतेचे मत घेणे म्हणजे

सार्वमत होय. जनतेला कायद्या मान्य नसेल तर जनता सार्वमताद्वारे कायदा नाकारू शकते. तसेच जनतेला आवश्यकता वाटल्यास स्वतः विधेयक तयार करून विधिमंडळाकडे पाठवू शकते. ह्या महत्त्वपूर्ण अधिकाराद्वारे अप्रत्यक्ष लोकशाहीतील दोष दूर करण्याचा प्रयास आधुनिक काळात काळी देशांनी केलेला आढळतो.

**ब. अप्रत्यक्ष वा प्रतिनिधिक लोकशाही-**

आधुनिक काळात वाढती लोकसंख्या आणि व्यापक भू-प्रदेशामुळे प्रत्यक्ष लोकशाही ऐवजी अप्रत्यक्ष लोकशाही जगातील सर्व राष्ट्रांनी स्वीकारलेली दिसते. प्रतिनिधिक लोकशाहीत जनतेला प्रौढ मताधिकाराचा अधिकार असतो. राज्यातील नागरिक राज्य कारभारात प्रत्यक्ष भाग न घेता प्रतिनिधी निवडून देतात. त्या निवडलेल्या प्रतिनिधी मार्फत राज्य कारभार चालतो. त्या लोकशाही प्रतिनिधिक लोकशाही असे म्हणतात. या प्रकारात जनता सार्वभौम असते. प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार जनतेला असतो. जनतेचे प्रश्न, समस्या प्रतिनिधिमार्फत सोडविल्या जातात. जनतेच्या इच्छा, आकांक्षा व मागण्यांना मांडण्याचे कार्य जनप्रतिनिधी करत असतात. प्रतिनिधी अंतिमतः जनतेला जबाबदार असतात. या लोकशाही मुख्य दोन प्रकार आहे.

**१. संसदीय लोकशाही :-** या पद्धतीत राज्यातील जनता कायदेमंडळाचे सदस्य प्रत्यक्ष व गुप्त मतदानाने निवडून देतात. कायदे मंडळातून कार्यकारी मंडळ निर्माण केले जाते. कार्यकारी मंडळ सामूहिकरित्या कायदे मंडळाला जबाबदार असते,जो पर्यंत कायदे मंडळाचा विश्वास आहे तो पर्यंतच कार्यकारी मंडळाला सत्तेवर राहता येते. कायदे मंडळाने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास कार्यकारी मंडळाला राजीनामा द्यावा लागतो. कार्यकारी मंडळाचे सदस्य कायदे मंडळाचे कामात भाग घेतात. कार्यकारी मंडळाच्या सदस्याचा बऱ्याशा काळ कायदेमंडळात कामकाजात व्यथित होता. या प्रकारात वास्तव व नामधारी असे दोन शासन प्रमुख असतात. नामधारी प्रमुख कायदेशीरदृष्ट्या देशाचा सर्वोच्च प्रमुख असतो. मात्र खरी सत्ता वास्तव प्रमुखाच्या हातात असते. भारत, इंग्लड इत्यादी देशात हा शासन प्रकार दिसून येतो.

**२. अध्यक्ष लोकशाही :-**

या लोकशाही राजकीय सत्तेचे विभाजन केलेले असते. कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ एकमेकांपासुन स्वतंत्र असतात. कायदे मंडळाचे सदस्य कार्यकारी मंडळ सदस्य बनु शकतो नाही. कार्यकारी मंडळाचे सदस्य कायदे मंडळाचे कामकाजात भाग घेत नाही .मंत्री हे अध्यक्षाला जबाबदार असतात. जनता प्रत्येक निवडणुकीद्वारे अध्यक्षाला निवडुन देते .तो कायदे मंडळाला जबाबदार नसतो. त्याचा कालावधी निश्चीत असतो ही पध्दत अमेरिकेत दिसुन येते.

वरील दोन्ही प्रकारा शिवाय काही देशानी दोन्ही प्रकारातील तत्वांचा अवलंब करून मिश्रशासन पध्दतीचा स्विकार केले जाते.

**प्र.१ ला. लोकशाही निर्मितीसाठी आवश्यक घटक सांगा?**

**किंवा**

**लोकशाही निर्माण करण्यासाठी आधारभूत वा आवश्यक परिस्थिती सांगा?**

लोकशाही अतिशय व्यापक संकल्पना आहे. आधुनिक काळात लोकशाही ही शासन पध्दत न राहता जीवन पद्धती बनलेली आहे. त्यासाठी लोकशाहीमध्ये काही आवश्यक तत्त्वे असणे गरजेचे आहे. जगातल्या अनेक देशांना लोकशाहीचा स्वीकार केला आहे. लोकशाही निर्माण करण्यासाठी पुढील घटक आवश्यक असतात.

**१. लिखित राज्यघटना :-**

लोकशाहीत लिखित राज्यघटना आवश्यक असते. प्रत्येक देशाचा राज्यकारभार विशिष्ट नियमानुसार चालतो. त्या नियमाच्या संग्रहाला राज्य घटना म्हणतात. घटनेतील नियमाच्या मर्यादेत राहून शासनातील विविध घटकांना आपले कार्य करावे लागते. शासनाचे अधिकार कार्य आणि जनतेचे हक्क इ. बाबतच्या गोष्टीचा घटनेत समावेश असतो. घटना लिखित असली म्हणजे नागरीकांना देखील व्यवस्थित राज्यकारभार चालू आहे की नाही हे पडताळून पाहता येते. प्रत्येक राज्याला राज्यघटना आवश्यक असते. कारण शासनपद्धती, सत्तेचे विभाजन, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि जनतेचे हक्क

ह्या संबंधीची आधारभूत तत्त्वे व सूत्रे राज्यघटनेत समाविष्ट केलेली असते. राज्यघटना लिखित असली म्हणजे राज्यकर्त्यांवर अप्रत्यक्ष नियंत्रण येते. इंग्लंडचा अपवाद वगळता सर्व देशाच्या राज्यघटना लिखित आहेत.

**२. कायदे मंडळ :-**

कायदे मंडळ हे लोकशाहीचे प्रमुख अंग आहे. कायद्याद्वारे राज्याची इच्छा व्यक्त होत असते. कायदे तयार करण्याचे काम कायदे मंडळ करत असते. कायदे मंडळात जनतेचे प्रतिनिधी असतात. ते प्रतिनिधी सरकारच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतात, सरकारच्या आर्थिक कार्यावर नियंत्रण ठेवणे,अयोग्य कार्याबद्दल सरकारला जाब विचारतात, जनतेच्या तक्रारींना वाचा फोडणे, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करून जनहितासाठी कार्य करणे इ. कामे कायदे मंडळ सदस्य करत असतात. कायदे मंडळ सर्व जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत हक्क आणि लोकशाही मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी कायदेमंडळाची स्थापना लोकशाहीत केलेली असते. कायदेमंडळ सदस्याच्या दर्जावर लोकशाही दर्जा अवलंबून असतो.

**३. स्वतंत्र न्यायमंडळ :-**

व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही शासन व्यवस्था कार्यक्षम आणि निपक्ष:पातीपणे चालविण्यासाठी न्यायमंडळाला स्वातंत्र्य असणे गरजेचे आहे. लोकशाहीच्या यशासाठी निपक्ष व स्वतंत्र न्यायमंडळ असणे आवश्यक आहे. त्यासाठी कायदे मंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या नियंत्रणापासून घटना बाहय कायदे रद्द करण्यासाठी न्यायालयांना न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिला पाहिजे. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपविली जाते. न्यायमंडळाचे स्वातंत्र्य जपण्यासाठी न्यायाधीशांना सेवेची शाश्वती व अधिक वेतन दिले पाहिजे.

**४. बहुमताचे शासन :-**

लोकशाहीत सर्व लोक समान मानले जात असले तरी प्रत्यक्षात सर्वांचे प्रत्येक वेळी एकमत होईलच असे नाही. त्यामुळे एखादया प्रश्नावर ज्या बाजूने बहुमताचा कल असेल त्यानुसार निर्णय घेतले जातात. सार्वजनिक क्षेत्रातील निर्णय घेतांना बहुमताचा अवलंब केला जातो. निवडणुकीत ज्या पक्षाला बहुमत मिळेल तोच पक्ष राज्य कारभार चालविण्यास पात्र समजला जातो. अल्पमताचे शासन लोकशाहीला मान्य नाही.

**५.राजकीय पक्ष :-**

प्रतिनिधिक लोकशाहीच्या यशासाठी राजकीय पक्षाचे अस्तित्व आवश्यक असते. जनहित साधण्याच्या हेतूने राजकीय पक्षाची स्थापना केली जाते. लोकशाहीत सुसंघटित राजकीय पक्ष राजकीय पक्षाची आवश्यकता असते. तसेच लोकशाहीत राजकीय पक्षांना कार्य करण्याचे स्वातंत्र्य असते. निवडणुकीच्या काळात पक्षाचे धोरण व कार्यक्रम जनतेसमोर मांडून बहुमताचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात. सत्ता मिळाल्यानंतर आपला कार्यक्रम अंमलात आणण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीच्या यशासाठी द्विपक्ष वा बहुपक्ष पद्धतीस योग्य मानले जाते.

**६.प्रभावी विरोधी पक्ष :-**

लोकशाहीच्या यशासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त पक्ष अस्तित्वात असणे आवश्यक असते. सत्ताधारी पक्षाने सत्तेचा गैरवापर करू नये म्हणून त्याला विरोध करणारा प्रभावी विरोधी पक्ष आवश्यक असतो. सत्ताधारी पक्ष बेजबाबदारपणे सत्तेचा वापर करू लागला तर जनतेचा रखवालदार या नात्याने विरोधी पक्षाला काम करावे लागते. विरोधी पक्ष लोकांना पर्यायी व्यवस्था देण्याचे काम करतो. सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर जुलमी बनण्याची शक्यता असते त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करीत असतो. सत्ताधारी पक्षाला तुल्यबळ असा विरोध करणारा विरोधी पक्ष असेल तर सत्ताधारी पक्ष जबाबदारीने वागतो. विरोधी पक्षामुळे सत्ताधारी पक्षावर अकुंश राहतो. कायदेमंडळात विविध संसदिय आयुधाचा वापर करून विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवू शकतो. विरोधी पक्षाच्या अभावी लोकशाहीची कल्पनाच करता येत नाही. त्यामुळे प्रभावी विरोधी पक्ष लोकशाहीचा महत्त्वपूर्ण घटक मानला जातो.

**७. स्वतंत्र वृत्तपत्रे :-**

लोकमत हा लोकशाहीचा आधार आहे. लोकशाहीचे यशापयश योग्य लोकमतावर अवलंबून असते. लोकमत घडविण्यासाठी आधुनिक काळात विविध साधनांचा वापर केला जातो. वृत्तपत्रे हे लोकमत घडविण्याचे प्रभावी साधन मानले जाते. वृत्तपत्रे लोकमत तयार करण्याचे कार्य करीत असतात. जनतेच्या मागण्या शासना पर्यंत नेणे आणि शासनाचे कार्यक्रम जनतेकडे पर्यंत पोहचविणे असे दुहेरी कार्य वर्तमानपत्रे पार पाडीत असतात. हे कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी त्यांना स्वातंत्र असणे गरजेचे असते. शासनाचे धोरण योग्य असेल तर त्याचा गौरव करणे, अयोग्य असेल तर टीका करणे हे वृत्तपत्राचे काम असते. हे काम योग्य मार्गाने करण्यासाठी शासनाचे कोणतेही दडपण वृत्तपत्रांवर असू नये. त्यांना स्वातंत्र दयावे. कारण सरकारच्या दडपणातून वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध करत असेल तर जनतेला एकांगी माहिती मिळू शकते. सरकारी दडपणाखाली काम करणारी वर्तमानपत्रे निपक्षःपातीपणे काम करू शकत नाही. म्हणून लोकशाहीच्या यशासाठी स्वतंत्र व निपक्षःपातीपणे कार्य करणारी वर्तमानपत्रे असणे गरजेचे आहे.

**८. स्थानिक स्वराज्य संस्था :-**

लोकशाही राज्य कारभाराचे शिक्षण व अनुभव मिळण्याचे केंद्र म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. या संस्थाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना राजकीय सहभाग उपलब्ध करून देता येतो. नविन नेतृत्वाची निर्मिती या संस्थेतून होत असते. लोकशाहीच्या यशासाठी या संस्था आवश्यक आहेत. लोकशाही सत्तेचे जेवढया जास्त प्रमाणात विकेंद्रीकरण केले जाईल तितक्या प्रमाणात लोकशाही यशस्वी होईल. या संस्थेतील कामाचा अनुभव भावी काळात उच्च शासन व्यवस्थेतील कामकाज करण्यासाठी उपयोगी ठरतो. कोणत्याही शासनसंस्थेत सत्ता एकाच केंद्राभोवती एकवटली तर ते सत्ताकेंद्र अत्याचारी व हुकूमशाही होण्याची शक्यता असते. म्हणून लोकशाही विकेंद्रीकरण हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा मानले जाते. लोकशाही विकेंद्रीकरण करण्यासाठी भारतात जिल्हा परिषद, नगर परिषद इ. स्थानिक संस्था निर्माण केलेल्या दिसतात. लार्ड ब्राईसच्या मते "लोकशाही शिक्षणाची उत्कृष्ट शाळा आणि लोकशाहीच्या यशाची निश्चित खात्री म्हणजे स्थानिक स्वराज्य पद्धती होय."

**९. कायद्याचे राज्य-**

कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही. प्रत्येक व्यक्ती कोणत्याही व्यक्तीचा दर्जा व अधिकाराची असो सर्वांनी राज्यातील सर्वसामान्य कायदे पाळले पाहिजेत आणि त्यांच्यावरील सर्वसाधारण न्यायालयांचा अधिकार चालला पाहिजे. त्यातून कायद्याचे सार्वभौमत्व स्पष्ट होते. कायद्यापेक्षा कोणतीही व्यक्ती श्रेष्ठ नाही. कायदे सर्वांसाठी समान असले पाहिजे.

अशा विविध घटकांची वा आवश्यक लक्षणांची लोकशाही शासन निर्माण करण्यासाठी आवश्यकता असते. वरील सर्व घटक लोकशाही यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**प्र. २ रा. लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेले घटक, लक्षणे, वैशिष्ठे स्पष्ट करा?**

जगात इंग्लड देशात सर्वप्रथम लोकशाहीचा उदय व प्रसार झाला. लोकशाहीचे स्वरूप, शासन यंत्रणा आणि लोकांचा दृष्टिकोन यात अनुकूल बदल होत गेल्यामुळे लोकशाही लोकप्रिय होत गेली. परंतु २० व्या शतकात जगातील अनेक देशांनी लोकशाहीचा स्वीकार केला. पण पहिल्या महायुद्धानंतर अनेक देशात लोकशाही शासनाविरूद्ध क्रांती होऊन लोकशाही नष्ट झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आफ्रिका खंडातील देशांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. पण अल्पकाळात त्या देशामध्ये लोकशाही अपयशी ठरले. कारण लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक परिस्थिती असल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. लोकशाही यशस्वी करण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक असतात.

**१. जागृत नागरिकः-** लोकशाहीच्या यशासाठी नागरिकांनी जागृत राहून सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. इतर नागरिकांच्या स्वातंत्र्य व कर्तव्यपालनाबाबत मदत केली पाहिजे. सरकारच्या चांगल्या कार्याबद्दल प्रोत्साहन दिले पाहिजे. अन्यायकारक कायदे व निर्णयाला विरोध केला पाहिजे. निवडून दिलेले प्रतिनिधी व सरकारी अधिकारी योग्य काम करतात किंवा नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या अडचणी शासनाकडून सोडवून घेतल्या पाहिजे.

निवडणुकीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधीची निवड केली पाहिजे. नागरिकांनी प्रत्येक बाबतीत सक्रिय सहानुभूती दाखविली पाहिजे. लार्ड ॲक्टनच्या मते, "लोकशाहीच्या यशासाठी अखंड जागरूकता हे मूल्य आवश्यक आहे."

**२. लोकशाहीवर विश्वास**:- लोकशाहीशी संबंधी असलेल्या मानवी मूल्य आणि शासन पद्धतीवर जनतेचा विश्वास असावा. जनतेने लोकशाहीची शिकवण आत्मसात केली पाहिजे. संघर्ष करण्याऐवजी समन्वय करण्याची प्रवृत्ती जनतेत असली पाहिजे. आपल्या मताबरोबर दुसऱ्याच्या मताची किंमत केली पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांवर जनतेची निष्ठा असल्या शिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही. लोकशाहीची शिकवण, तिच्या सिद्धात व आदर्शावर विश्वास असला पाहिजे. प्रत्येक नागरिकांनी इतर नागरिकांशी सहकार्य करून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. लोकशाही यशस्वी करण्याची इर्षा मनात ठेवून सहकार्य भावनेचा विकास केल्यास सर्वांचा विकास व शांतता प्रस्थापित होईल आणि लोकशाहीवरचा विश्वास विकसित होण्यास सहाय्य मिळेल.

**३. व्यक्ती पूजेचा त्याग**:- लोकशाहीत व्यक्तीपेक्षा तत्व व उद्दिष्टांना महत्वाचे स्थान दयावे लागते. सत्तारुढ नेत्यावर विधायक स्वरुपाचे टीका करणे नागरिकांचे कर्तव्य आहे. देशाची सेवा करणाऱ्या नेत्यांबद्दल आदर असावा पण आपली प्रशासकीय यंत्रणा मोडून पडेल इतकी सत्ता कोणतीही व्यक्ती किंवा गटाकडे देऊ नये. व्यक्तीपूजा हुकूमशाही व्यवस्थेचे लक्षण आहे. लोकशाहीला व्यक्तीपूजा मान्य नाही. राजकीय नेत्याचे विभूती पूजन आणि व्यक्तिनिष्ठ अनुयायित्व ह्यामुळे लोकशाहीला धोका पोहचतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगतात की, "भारतात लोकशाही यशस्वी होण्यासाठी नागरिकांनी कोणत्याही मोठया व्यक्तीच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पण करू नये." असा संदेश दिला.

**४. सामाजिक समता**:- सामाजिक समता लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे. जातीभेद, लिंगभेद, प्रादेशिकता आणि भाषावाद, उच्चनिच भावना लोकशाहीच्या यशाला धोका निर्माण करतात. लोकशाहीच्या यशासाठी मानवनिर्मीत विषमता नष्ट करून समता निर्माण केली पाहिजे. समता म्हणजे सारखेपणा नव्हे तर सर्व नागरिकांना समान दर्जा व संधी उपलब्ध करून दिली पाहिज. प्रत्येक व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण केली पाहिजे तरच लोकशाही यशस्वी होईल. बंधुभावाची व एकीची भावना निर्माण करण्यासाठी आर्थिक, सामाजिक व राजकीय समता असली पाहिजे. प. नेहरूच्या मते, "लोकशाही म्हणजे समानता किंवा समता, केवळ मतदानाच्या हक्काबाबत नव्हे, तर आर्थिक आणि सामाजिक समता होय." आपल्या देशात अस्तित्वात असलेली सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात विषमतेचा नायनाट केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही. देशातील विषमता राजकीय लोकशाही उद्‌ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही. लोकशाहीच्या यशासाठी सामाजिक समता निर्माण करणे गरजेचे आहे.

**५. विवेकशील नेता** :- नेता कशा प्रकारचा आहे यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. नेत्याचे चारित्र्य उच्च दर्जाचे असावे. त्याने घेतलेले निर्णय विवेकपूर्ण असावे. त्याच्याकडे माणसे ओळखण्याची कला असावी. अनुभवी, हुशार, त्यागी व दूरदृष्टी असलेला नेता लोकशाहीला यशस्वी करू शकतो. नेत्याने घेतलेले निर्णय विवेकबुद्धीवर आधारलेले असावे. या उलट स्वार्थी नेत्यांच्या हातात लोकशाहीचा कारभार केल्यास ते स्वार्थासाठी लोकशाही नष्ट करू शकतात. अनुभवी, त्यागी, कर्तृत्ववान, दूरदृष्टी, प्रामाणिक आणि कार्यक्षम नेता लोकशाही यंत्रणेचा योग्य वापर करून लोककल्याण आणि देशहित साध्य करू शकतो.

**६. राष्ट्रीय चारित्र्य** :- लोकशाहीच्या यशासाठी नागरिकांचे चारित्र्य उच्च दर्जाचे असले पाहिजे. देशातील नागरिकांचा नैतिक मूल्यावर विश्वास असावा. राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रप्रेम, इमानदारी, स्वार्थत्याग,सेवाभाव, राष्ट्रसाठी कोणतेही त्याग व कष्ट करण्याची तयारी इ. गुणांचा जोरावर लोकशाही यशस्वी होऊ शकते. ह्या गुणाच्या अभावी लोकशाही यशस्वी होऊ शकते. राष्ट्रीय चारित्र्य आणि नैतिकतेला महत्त्व देणारे नेते आणि नागरिक असतील तर लोकशाही यशस्वी होण्यास वेळ लागणार नाही.

**७. प्रामाणिक व कार्यक्षम शासनयंत्रणा**:- लोकशाही शासन आणि शासन अधिकारी यांच्या कार्यक्षम यंत्रणावर वर्तनावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. प्रशासनात वशिलेबाजी ,भ्रष्टाचार असेल तर जनतेचा लोकशाहीवर विश्वास राहणार नाही. शासकिय अधिकारी तज्ञ म्हणून असून उपयोगाचे नाही तर ते प्रामाणिक व निःस्वार्थी असले

पाहिजे. आधुनिक काळातील कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे शासनाधिकाऱ्याच्या जबाबदाऱ्या वाढलेल्या आहेत. म्हणून त्यांनी जबाबदारीने कार्य करणे गरजेचे आहे. जनतेच्या प्रतिनिधिच्या सल्लाने, मार्गदर्शन, विचारविनिमय आणि सामोपचाराने निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे.

**८. सत्तेचे विकेंद्रीकरणः-** लोकशाही शिक्षणाच्या शाळा आणि लोकशाहीच्या पाया या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केल्या जातात. लोकशाही यशस्वी करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण गरजेचे असते. जनतेचा राजकारभारात सहभाग आवश्यक असतो. त्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही. लोकशाही यशस्वी होण्यासाठी कर्तव्यनिष्ठ आणि जबाबदार नागरिकांची आवश्यकता असते आणि असे नागरिक स्थानिक स्वशासन व्यवस्थेतून निर्माण होऊ शकतात. नागरिकांमध्ये सहिष्णुता, सहकार्य, सार्वजनिक हित करण्याची दृष्टी इत्यादी गुण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यात भाग घेतल्यामुळे वाढीस लागत असते.

अशा प्रकारे लोकशाही यशस्वी होण्यासाठी वरील गोष्टी नितांत गरज असते. या गोष्टीच्या अभावातून अनेक देशात लोकशाही यंत्रणा धोक्यात आलेली दिसते. लोकशाही शासन पद्धती आपोआप यशस्वी होत नाही तर ती यशस्वी करण्यासाठी वरील अटी पूर्ण करणे गरजेचे आहे.

**प्र.३ रा. लोकशाहीच्या मार्गातील प्रमुख अडचणी वा अडथळे सांगा?**

लोकशाही शासन प्रणाली तत्वतः खूप चांगली असली तरी लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक परिस्थीती नसेल तर लोकशाही अपयशी ठरते. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी आणि इटली देशात लोकशाही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी आवश्यक परिस्थिती नसल्यामुळे तेथे हुकूमशाहीचा उदय झालेला दिसतो. लोकशाहीच्या मार्गात पुढील अडथळे येतात.ते पुढील प्रमाणे

**१.निवडणुकांना महत्वः-** लोकशाहीत विशिष्ट काळासाठी प्रतिनिधीची निवड करण्यासाठी निवडणुका घेतल्या जातात. निवडणुकीत लायक आणि निःस्वार्थी प्रतिनिधी निवडले जातील अशी अपेक्षा असते. पण निवडणुकीचा प्रचार तंत्र, आरोप-प्रत्यारोप आणि खर्चाचा विचार करता बुद्धिवान माणसे निवडणुकीत भाग घेण्याची शक्यता नसते, भाग घेतला तरी निवडून येण्याची शक्यता नसते. परिणामतः संधिसाधू व धंदेवाईक राजकारणी आश्वासने व पैशाचा वापर करून निवडून येतात. अशा सामान्य दर्जाचे प्रतिनीधी निवडून आल्यामुळे राष्ट्र पुढील प्रश्न त्यांना कळत नाही. ते अधिकाऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणे राज्यकारभार करतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी ऐवजी अधिकारीच राज्य चालवतात. निवडणुकीतील अप्रवृत्तींमुळे लायक नसलेल्या आणि बेजबाबदार लोकांच्या हातात सत्ता जाते. त्यांच्या अंगी राज्यकारभार करण्यासाठी आवश्यक ज्ञानाचा अभाव असतो. ह्यामुळे लोकशाही म्हणजे अपात्र व लायक नसलेल्यांचा कारभार असा समज निर्माण होता. त्यामुळे लोकशाहीवर जनतेचा विश्वास नष्ट होता. सर सिडने लोच्या मते, "अर्थखात्यांचा कारकून होण्यासाठी गणिताची परीक्षा देण आवश्यक असले तरी अर्थखात्यांच्या प्रमुखाला म्हणजे मंत्र्याला त्यांची गरज नसते." यातून लोकशाहीच्या दोषांची जाणिव होती.

**२. अल्पमतवाद्यांचे राज्य** :- लोकशाहीत बहुसंख्याकांच्या हाती सत्ता असते. मात्र प्रत्यक्षात राजकीय पक्षांच्या हातात सत्ता असते. अनेक लहान-लहान पक्ष एक येवून सत्ता मिळवू शकतात. युती किंवा आघाडीच्या सरकारात कोणत्याही पक्षाकडे बहुमत नसते तरी देखिल इतरांच्या मदतीने सत्ता प्राप्त करता येते. पर्यायाने लोकशाहीचा पाया असलेली जनसार्वभौमत्वाची संकल्पना व्यवहारात निरर्थक ठरते. एकप्रतिनिधी पद्धती अनेक उमेदवार निवडून लढवित असतील तर त्यातील एका निम्मे पेक्षा कमी मते असतील पण सर्वात जास्त मते असतील तो प्रतिनिधी निवडून येतो. याचा अर्थ बहुसंख्य लोकांना नको असलेला प्रतिनिधीही निवडून येऊ शकतो.

**३.गुणांपेक्षा संख्येला महत्त्वः-** व्यक्ती व्यक्तीतील समानता तत्त्वांवर लोकशाही भर देते. पण व्यक्ती व्यक्तीमध्ये बुद्धी, विचारक्षमता, कौशल्य इत्यादी बाबत भेदभाव असतो. परंतु लोकशाहीत प्रत्येकाची गणना एक इतकीच केली जात असल्यामुळे गुणवत्तेऐवजी संख्येला महत्त्व प्राप्त होते. लोकशाही बहुमताने शासन प्रतिनिधीच्या डोक्यात काय भरलेले आहे या पेक्षा प्रतिनिधिची संख्या किती आहे याला जास्त महत्व दिले जाते. बहुमताच्या आधार निर्णय होत असल्यामुळे

तो योग्य की अयोग्य यापेक्षा निर्णयाच्या बाजूला बहुमत आहे किंवा नाही याचा विचार केला जातो. त्यामुळे आपोआप गुणवत्तेपेक्षा संख्येला जास्त महत्व येते.

**४. वेळ व पैशांची हानी:-** लोकशाही अत्यंत खर्चिक शासन प्रणाली मानली जाते. लोक प्रतिनिधिना दिलेल्या सवलतींचा खर्च सरकारी तिजोरीतून केला जातो. निवडणुकासाठी मोठया प्रमाणावर पैसा खर्च करावा लागतो.परिणामतः राष्ट्रविकासासाठी पैसा शिल्लक राहत नाही. लोकशाहीत कोणताही निर्णय जलद गतीने घेतला जात नाही. निर्णय प्रक्रिया प्रचंड किचकट व वेळखाऊ असल्यामुळे लोकांचे प्रश्न वेळवर सुटत नाही. लोकशाही शासनपद्धती अकार्यक्षम, खर्चिक व विलंबकारी असल्यामुळे लोकशाहीच्या यशस्वितेत अडचणी निर्माण होतात. लोकशाहीत कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी समिती नियुक्त केली जाते. लोकशाहीतील समिती पद्धतीचा उपरोधिक शब्दात टीका करतांना असे सांगितले जाते की, "जे काम एक व्यक्ती एका दिवसात करू शकते ते काम सात दिवसात सात व्यक्तींनी करणे होय." असे सांगितले जाते. कायदेमंडळातील द्वितीय सभागृहाचा फारसा उपयोग होत नसला तरी त्यासाठी मोठया प्रमाणावर पैसा खर्च होता. अशा अनुत्पादक खर्चामुळे लोककल्याणकारी कार्यासाठी पैसा शिल्लक राहत नाही.

**५.भ्रष्टाचार:-** भ्रष्टाचार हा लोकशाहीतील सर्वात मोठा अडथळा आहे. निवडणुका आणि किचकट कायद्यामुळे भ्रष्टाचाराला उत्तेजन मिळते. निवडणुका काळात प्रतिनिधिची निवडून येण्यासाठी प्रचंड पैसा खर्च करतात. निवडून आल्यानंतर सत्ता हे सेवेचे माध्यम न ठरता पैसा कमवण्याचे माध्यम ठरते. लाच दिल्याशिवाय कोणतेही काम होत नाही. प्रत्यक्ष व्यवहारात नितीतत्त्वे, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांना महत्त्व दिले जात नाही. सत्ता स्पर्धा, सत्तेचे राजकारण, निवडणुकाचा खर्च, चंगळवाद यामुळे भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी वाढतांना दिसतो. भ्रष्टाचार हा लोकशाही शासन व्यवस्थेला लागलेला फार मोठा कलंक मानला जातो.

**६. सरकार नेहमी बदलत राहते**:- लोकशाही प्रतिनिधिची निवड विशिष्ट काळासाठी केली जाते. प्रतिनिधींची मुदत संपल्यानंतर निवडणुका होवून नवीन प्रतिनिधी निवडले जातात. निवडणुकीच्या माध्यमातुन सत्ताबद्दल झाल्यास नवीन पक्ष सत्तेवर येतो. परिणामतः जुन्या सरकारने राबवलेली ध्येयधोरणे व कार्यक्रम बदलले जातात आणि नवीन धोरण आखले जातात. धोरण बदलामुळे प्रशासनाच्या कोणत्याही क्षेत्रात स्थैर्य राहत नाही. अनेक योजना व कार्यक्रम अचानक बंद झाल्यामुळे योजनेशी संबंधित नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. वारंवार होणाऱ्या सत्तातरांमुळे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक धोरणात स्थैर्य राहत नाही. राजकीय स्थैर्याअभावी इतर क्षेत्रातील प्रगतीवर विपरीत परिणाम होत असतो. राजकर्त्यांची धरसोडवृत्ती आणि लोकरंजनवादी कार्यक्रमामुळे जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

**७. प्रादेशिक पक्ष:-** प्रादेशिक पक्ष प्रांतापेक्षा विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन निर्माण झालेले असतात. परंतु हे पक्ष देशाच्या राजकारणात सक्रिय होऊ लागले. सद्यपरिस्थितीत प्रादेशिक पक्षाचा भारतीय राजकारणातील प्रभाव वाढत चालेला दिसतो. प्रादेशिक पक्ष विशिष्ट प्रांतापुरते मर्यादित असतात. त्या पक्षाचे प्रतिनिधी आपल्या प्रांतापुरत्या संकुचित मागण्या करतात. आपल्या प्रांताच्या विकासाकडे जास्त लक्ष दिले जावे याकरीता जातीने प्रयत्न करतात. आधुनिक काळात आघाडी सरकारांमध्ये प्रादेशिक पक्षांचे महत्व वाजवीपेक्षा जास्त वाढतांना दिसते. प्रादेशिक पक्षांमुळे प्रांताप्रांतात संघर्ष निर्माण होऊ शकतो. त्यांच्या संकुचित दृष्टिकोनामुळे देशाच्या एकात्मतेला धोका पोहचतो.

**८. वृत्तपत्रांची बांधिलकी :-** वर्तमानपत्र लोकशाहीचे आधारस्तंभ मानले जातात. लोकशाहीच्या यशासाठी वर्तमानपत्रे स्वतंत्र असणे आवश्यक आहे. पण आधुनिक काळात अनेक वर्तमानपत्र राजकीय पक्षाची बांधिलकी बाळगतात. परिणामातः ही वृत्तपत्रे चुकीची व दिशाभुल करणारी माहिती जनतेला देतात. एखादया पक्षाची प्रमाणाबाहेर स्तुती करणे कारण नसतांना इतर पक्षांवर टीका करणे अशा दोषांमुळे लोकांचा वर्तमान पत्रावरचा विश्वास नष्ट होतो.

**९. पक्ष पद्धती:-** लोकशाही पक्ष पद्धती आवश्यक असते. विविध राजकीय पक्षांच्या माध्यमातून निवडणुका लढविल्या जातात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात पक्ष पद्धती हाच लोकशाहीच्या यशातील सर्वात मोठा अडथळा ठरत असतो. पक्षांच्या माध्यमातून जनतेच्या राजकीय जाणिवा विकसित करण्यासाठी जनप्रबोधन केले पाहिजे. जनतेत राष्ट्रप्रेमाची भावना विकसित करून विकासासाठी त्याग भावना विकसित करण्यास हातभार लावला पाहिजे. पण प्रत्यक्षात राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात खोटीनाटी आश्वासने देतात. राजकीय पक्ष निवडणुकीत यश मिळविण्यासाठी जनतेची

फसवणूकी करतात. राजकीय पक्ष राष्ट्रहितापेक्ष संपत्ती, प्रतिष्ठा, पक्षहित याकडे लक्ष केंद्रित करतात. राजकीय पक्षाच्या संधिसाधू आणि संकुचित दृष्टिकोनामुळे राष्ट्राचे नुकसान होते. उमेदवारीची लायकी, अभ्यासवृत्ती, समाजकार्याची आवड, स्वार्थ त्यागी वृत्ती इत्यादी गोष्टी विचारात न घेता त्यांची जात, धर्म, पैसा, निवडून येण्याची क्षमता यांचा विचार करून अयोग्य लोकांना तिकिट वाटप करतात. त्यामुळे नि:स्वार्थी व लायक लोक पक्षिय राजकारणापासून अलिप्त राहणे पसंत करतात.

अशा प्रकारे लोकशाही शासन पद्धतीत विविध दोष दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय लोकशाहीचे भवितव्य अंधकारमय आहे.

**प्र.४ था. लोकशाही यशस्वी करण्यासाठी करावयाच्या उपाय योजना स्पष्ट करा ?**

लोकशाही शासनपद्धती सूत्रबद्ध आणि कायदेशीर मार्गाने चालविण्यासाठी लोकशाहीच्या मार्गातील अडथळे दूर करणे गरजे आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी लोकशाही मानसिकता निर्माण करणे गरजेचे आहे. लोकशाही शासनपद्धती यशस्वी करण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविल्या जातात.

**१. शिक्षणचा सार्वत्रिक प्रसार :-** लोकशाहीच्या यशासाठी शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार केला पाहिजे. इंग्लंड सारख्या देशात १००% शिक्षण प्रसार झालेला असल्यामुळे तेथील लोकशाही प्रगत झाली. शिक्षणातून व्यक्तीची वैचारिक पातळी उंचावत असते. नव्या नव्या गोष्टींचे ज्ञान व्यक्तीला मिळते. शिक्षणातून जबाबदार नागरिक निर्माण होत असल्यामुळे शिक्षणाच्या सर्वत्र प्रसार केला पाहिजे. अज्ञानी आणि मागासलेल्या समाजाला लोकशाही परंपराची जाणिव नसल्यामुळे जनतेच्या परंपरागत निष्ठा प्रभावी ठरतात. म्हणून लोकशाही यशस्वी करण्यासाठी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरण करणे गरजेचे आहे.

**२. लोकशिक्षण :-** लोकशाहीच्या यशासाठी मतदाराचे लोकशिक्षण केले पाहिजे. मतदारांना मताच्या हक्काविषयी जागृत केले पाहिजे. मतदारांनी जागृतपणे मतदान करून योग्य प्रतिनिधिची निवड केली पाहिजे. अंधपणे कोणत्याही नेत्यावर प्रमाणपेक्षा जास्त विश्वास ठेवू नये. राजकीय पक्षांनी मतदारांचे प्रबोधन केले पाहिजे. शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पक्ष नेते हुकूमशहा होणार नाही यांची काळजी घेतली पाहिजे. जनतेने विभूतीपूजेवर विश्वास ठेवू नये. राजकारणातील अंधश्रद्धा अणि भक्तीचे हुकूमशाही रूपांतर होणार नाही याबाबत जनतेला प्रशिक्षण व प्रबोधन केले पाहिजे. जनता जागृत तर राज्यकर्ते सत्तेचा गैरवापर करणार नाही

**३. समतेसाठी नियोजीत प्रयत्न :-** समता, स्वातंत्र, बंधुता, सामाजिक न्याय ही लोकशाही तत्वे मान्य झालेली असली तरी त्यांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली जात नाही. या मूल्यांच्या फक्त गवगवा केला जातो. प्रत्यक्षात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात नाही. वरील तत्त्वांची प्रामाणिक व नियोजनबद्ध पध्दतीने शासनाने अंमलबजावणी केल्यास जनतेला पाठिंबा शासनाला मिळेल. त्यामुळे लोकशाही यशस्वी व्हायला हातभार लागेल.

**४. कल्याणकारी योजना:-** लोकशाहीच्या यशासाठी शासनाने जास्तीत जास्त लोककल्याणकारी योजना राबविल्या पाहिजे. शासनाकडून पूर्ण होतील अशाच योजना राबविण्याचा प्रयत्न करावा, न पेलवणाऱ्या योजनामुळे जनतेचा भ्रम निराश होतो. शासनाने आपल्या योजना राबवितांना जनतेचे सहकार्य घेतले पाहिजे. समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत कल्याणकारी योजना समाजास पोहचविल्या पाहिजे तरच लोकशाही यशस्वी होईल. शासन व लोकशाही व्यवस्था यावरील जनतेचा विश्वास विकसित करण्यासाठी कल्याणकारी योजनाची व्यापक प्रमाणात अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

**५. उत्पादन साधनाचे विकेंद्रिकरण :-** लोकशाहीच्या यशासाठी आर्थिक विषमता नष्ट होणे आवश्यक आहे. आर्थिक विषमतेतून समाजात श्रीमंत आणि गरिब वर्ग निर्माण होतात. उत्पादन साधनांची मालकी, संपत्ती आणि सत्ता ह्याचे केंद्रीकरण झाल्यास समाजात आर्थिक विषमता निर्माण होते. समाजात श्रीमंत आणि गरीब यांच्यात खूप मोठी दरी असेल तर लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून शासनाने उत्पादन साधनांची व वितरणाचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. महत्वपूर्ण क्षेत्रातील उत्पादन सरकारने स्वत: केले पाहिजे किंवा खाजगी उत्पादकांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. विषमता

नष्ट करण्यासाठी आधिक लोकांच्या हातात उत्पादन साधने  देण्यासाठी शासनाने कायदे करावे तर लोकशाही यशस्वी होईल.

**६. मूलभूत प्रश्न सोडविणे :-** दारिद्रय, बेरोजगार, दहशतवाद, नक्षलवाद या समस्या लोकशाहीच्या मार्गातील अडथळे आहे. या समस्या सोडविण्यासाठी शासनाने त्वरीत निर्णय घेतले पाहीजे. या समस्या सुटल्या नाहीतर लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो.म्हणून शासनाने प्रयत्न पूर्वक वरील समस्या सोडविण्यासाठी प्रभावी कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. लोकशाही हा समस्या सोडविण्याचा नवा मार्ग म्हणून स्वीकारला पाहिजे. या दृष्टीने जाणिवपूर्वक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

**टिप- लोकशाहीतील गुण:-**

आधुनिक युग हे लोकशाहीचे युग मानले जाते. त्यादृष्टीने राज्यांचे शासन लोकशाही तंत्रानुसार असली पाहिजे अशी अपेक्षा सर्वत्र केली जाते. लोकशाहीत अनेक गुण आहेत म्हणून लोकशाही शासनाची जोपासना लोकशाहीवादी देशांमध्ये झाली आहे. जगातल्या अनेक देशांनी लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसतो. कारण इतर शासन प्रणालीपेक्षा लोकशाहीत जास्त गुण दिसून येतात. ते पुढील प्रमाणे होत.

**१)** लोकशाहीत सार्वभौमसत्ता जनतेच्या हातात असते. त्यामुळे राज्यकर्ता वर्ग जनतेच्या हिताची काळजी करतो. जनतेच्या इच्छा आकांशा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. विशिष्ट वर्गाचेच हितसंबंध जोपासले जात नाही तर सर्वसामान्य जनतेचे हितसंबंध जपले जातात हा सर्वात मोठा गुण लोकशाहीचा मानला जातो.

**२)** लोकशाहीत सर्व नागरिकांना समान मानले जाते. सार्वजनिक क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीला मुक्तपणे प्रवेश दिला जातो. सर्वांना समान संधी हे लोकशाहीचे मुख्य वैशिष्टे आहे.

**३)** लोकशाहीत निवडणुकीच्या माध्यमातून प्रतिनिधिनीची निवड केली जाते. निवडणुकीस सर्व व्यक्तींना निर्भीडपणे भाग घेता येतो. प्रौढ मताधिकाराच्या मतानुसार विशिष्ट वय पूर्ण झालेल्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिला जातो.

**४)**लोकशाहीत शांततापूर्ण आणि घटनात्मक मार्गाने सत्तांतर घडवून आणले जाते. सत्ताबदल करण्यासाठी हिंसा किंवा क्रांतीची गरज नसते. निवडणुकीच्या माध्यमातून शांततेने सत्ताबदल घडवून आणता येतो.

**५)** लोकशाहीत प्रतिनिधी आणि जनता यांच्यात जवळचा संबंध असतो. प्रतिनिधीना जनतेशी सतत संपर्क ठेवावा लागतो. जनतेच्या इच्छा आकांक्षा लक्षात घेवून कार्य करावे लागते अन्यथा जनता प्रतिनिधींना पदावरून दूर करु शकते.

**६)** लोकशाहीत नागरिकांन समान संधी मिळते. प्रत्येक नागरिकांना सुरक्षितता प्राप्त होते.

**७)** जनतेचे शासन असल्या कारणाने जनतेला लोकशाहीवर विश्वास असतो. त्यांच्या प्रगती आणि कल्याणासाठी राज्य कार्य करेल. जनतेशी सदैव संपर्क असल्यामुळे सरकार अतिशय कुशल कार्य असते.

अशा प्रकारे लोकशाही शासन पद्धतीत अनेक गुण दिसून येतात. लोकशाहीच्या असलेल्या गुणांमुळे ती शासन पद्धती जगात सर्वोत्तम मानली जाते.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. लोकशाहीचे कोणतेही दोन दोष सांगा.
उत्तर- लोकशाहीत निवडणुकांना अतिमहत्त्व,गुणापेक्षा संख्येला जास्त महत्व, अकार्यक्षम व भ्रष्टाचार हे दोष दिसून येतात.

२. लोकशाहीचे प्रमुख दोन प्रकार सांगा.
उत्तर- लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही हे दोन प्रमुख प्रकार आहेत. अप्रत्यक्ष वा प्रतिनिधीक लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय लोकशाही हे प्रकार होतात.

३. प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय ?
उत्तर- राज्य कारभारात जनता प्रत्यक्ष भाग घेते. त्या शासन प्रकाराला प्रत्यक्ष लोकशाही म्हणतात. या प्रकारात राज्यातील सर्व नागरीक विशिष्ट ठिकाणी एकत्र येवून विचारविनिमय करून राज्यकारभार चालवितात, कायदे व नियम स्वत: तयार करतात. प्राचीन काळी ग्रीक नगर राज्यात हा प्रकार अस्तित्वात होता.

४. लोकशाहीची व्याख्या सांगा.
उत्तर- लोकशाहीला इंग्रजी Democracy असे म्हणतात. हा शब्द Demo म्हणजे लोक Cracy सत्ता या शब्दा पासून तयार झालेला दिसतो. लोकशाहीचा शब्दाचा अर्थ लोकांची सत्ता म्हणजे लोकशाही असा होतो. लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी ,लोकांसाठी चालवलेले राज्य होय.

५. लोकशाहीचे कोणतेही दोन गुण लिहा.
उत्तर- १) लोकशाहीत सार्वभौमसत्ता जनतेच्या हातात असते. त्यामुळे राज्यकर्ता वर्ग जनतेच्या हिताची काळजी करतो. जनतेच्या इच्छा आकांशा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.२) लोकशाहीत सर्व नागरिकांना समान मानले जाते. सार्वजनिक क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीला मुक्तपणे प्रवेश दिला जातो. सर्वांना समान संधी हे लोकशाहीचे मुख्य वैशिष्टे आहे.

६. लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक दोन घटक सांगा.
उत्तर- लोकशाहीच्या यशासाठी जागृत लोकमत, व्यक्तीपूजेचा त्याग, सामाजिक व आर्थिक समता हे घटक आवश्यक असतात.

७. लोकशाहीचे अडथळे दूर करण्याचे दोन उपाय सांगा.
उत्तर- लोकशाहीतील अडथळे वा दोष दूर करण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकरण, लोकशिक्षण, उत्पादन साधनाचे विकेंद्रीकरण इ. उपाययोजनेची आवश्यकता आहे.

८. प्रत्यक्ष लोकशाही कोणत्या देशात अस्तित्वात होती.
उत्तर- जगात सर्वप्रथम ग्रीक देशातील अथेन्स व इतर लहान गणराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

९. अप्रत्यक्ष लोकशाही निर्मितीचे प्रमुख कारणे कोणती आहेत.
उत्तर- लोकसंख्या वाढ आणि प्रचंड भू-प्रदेश ही प्रमुख दोन कारणे अप्रत्यक्ष लोकशाही शासन पद्धतीच्या उदयामागची प्रमुख कारणे मानली जातात.

१०. अप्रत्यक्ष लोकशाहीचा प्रत्यक्ष लोकशाहीची जोड देण्याची कोणत्या मार्गाचा अवलंब काही देशात केलेला आहे.
उत्तर- सार्वमत, प्रत्यावहनाचा अधिकार इत्यादी मार्गाचा अवलंब करून अप्रत्यक्ष लोकशाहीला प्रत्यक्ष लोकशाहीची जोड देण्याचा प्रयत्न काही देशाकडून केला जातो.

## प्रकरणे २ रे
## राष्ट्रवाद

**प्र.१ ला. राष्ट्रवादाची व्याखा सांगुन राष्ट्रवादाचे आवश्यक घटक सांगा?**

राष्ट्रवाद विचारसरणीचा उदय १८ व्या शतकात झाला असून याच शतकाच्या मध्यापासून तिच्या विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झालेली आढळते. राष्ट्रवाद ही अत्यंत गुंतागुंतीची संकल्पना आहे.राष्ट्र या शब्दाशी राष्ट्रवाद ही संकल्पना संबंधित आहे. राष्ट्र शब्दाला Nation असे म्हणतात हा Natio लॅटिन शब्दापासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ जन्म वा वंश असा होता. युरोपमध्ये सुरूवातीला राष्ट्र हा शब्द वांशिक एकता या अर्थाने वापरला जात असे. राष्ट्र म्हणजे वांशिक आणि रक्तसंबंधामुळे निर्माण होणारा एकात्म समाज असा होता. राष्ट्र संकल्पनेतूनच राष्ट्रवाद संकल्पनेचा जन्म झाला आहे. राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्रावर प्रेम करणे, राष्ट्राच्या कल्याणसाठी आपले सर्वस्व अर्पण करणे. राष्ट्रवाद ही मानसिक व भावनिक संकल्पना आहे.

**राष्ट्रवादाची व्याख्या-** राष्ट्रवादची निश्चित आणि सर्वसामान्य अशी व्याख्या करणे अतिशय अवघड काम आहे असे असले तरी काही विचारवंतांनी राष्ट्रवादाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**१. आल्फ्रेड गाझियाः-** यांच्या मते, राष्ट्रवाद म्हणजे स्वेदशाबद्दलचे प्रेम आणि परिकयाबद्दल संशय या दोन्ही भावनाचे एकत्रीकरण होय.

**२. लुई साईन्डरः-** यांच्या मते, निश्चित स्वरूपाच्या भौगालिक क्षेत्रात राहणाऱ्या समान भाषा, रूढी, परंपरानी प्रभावित झालेल्या समान धर्म असणाऱ्या लोकांची मानसिक एकता म्हणजे राष्ट्रवाद होय.

**३. प्रो. हॅन्स कोहन-** यांच्या मते, राष्ट्रातील बहुसंख्य लोकांच्या मनात झिरपण्यासाठी आणि सर्वांच्या मनात असल्याचा दावा करणारी भावना आणि मनाची स्थिती म्हणजे राष्ट्रवाद होय.

वरील व्याख्यांवरून राष्ट्रवादाची निर्मिती ही व्यक्ती व्यक्तीतील समान मूल्यांतून विकसित होते. या भावनेतून एकमेकांविषयी प्रेमाची आपलेपणाची भावना निर्माण होते. व्यक्ती जेव्हा राष्ट्राविषयी प्रेम व्यक्त करते आणि त्या प्रेमातून देशासाठी त्याग आणि बलिदान करण्यासाठी सिद्ध होत असते. ती मानसिक भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.

**राष्ट्रवादाचे घटक :-** व्यक्तीत राष्ट्रप्रेम, राष्ट्रीयत्व आणि आत्मियता या भावनेतून राष्ट्रवाद निर्माण होत असला तरी राष्ट्रवाद निर्माण होण्यास वा टिकून राहण्यास अनेक कारणे कारणीभूत असतात. राष्ट्रवाद ही मानसिक संकल्पना असून ती संकल्पना पुढील कारणामुळे निर्माण होते.

**१) भौगोलिक एकात्मताः-** व्यक्ती ज्या ठिकाणी जन्माला येते. त्या मातृभूमी बद्दल तिला नेहमीच आत्मियता वाटते. एकाच भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांचे आचार, विचार व सवयी समान असतात. तसेच नैसर्गिक वा कृत्रिमरीतीने तयार होणाऱ्या राष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्राबद्दल व्यक्तीला नेहमीच आत्मियता वाटत असते.अनंत काळापासून त्याच प्रदेशात वास्तव्य असल्यामुळे भावनिक बंध निर्माण होतात. भावनिक संबंधामुळे त्या भूमीला आपण मातृभूमी म्हणतो. मातृभूमी विषयी प्रेम असल्याने लोक तिच्या संरक्षणासाठी व विकासासाठी एकत्र येतात. मातृभूमीच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व वेचण्याची तयारी ठेवतात. एकाच भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये आपण सर्व एक आहोत ह्या भावनेसोबत परस्पर सहकार्याची आणि जवळीकतेची भावना विकसित होते. या उलट भूप्रदेश सलग नसेल तर राष्ट्रवादाच्या निर्मितीत अडथळे येतात.उदा.पूर्व व पश्चिम पाकिस्तानात इस्लाम धर्म समान असूनही भूप्रदेशाच्या अलगतेमुळे पूर्व पाकिस्तान बांगलादेश म्हणून पाकिस्तानातून फुटून निघाला. भौगोलिक एकात्मतेतून राष्ट्रवादाची भावना विकसित होत असली तरी ज्यूं लोकांमध्ये भौगोलिक एकता नसून त्यांनी इस्त्रालय या नव्या राष्ट्राची निर्मिती केली. याउलट युरोपमधील अनेक राष्ट्रात भौगोलिक एकता असून ही राष्ट्रवादाची भावना विकसित झालेली नाही. अर्थात असे असले तरी भौगोलिक एकतेमुळे लोकांच्या मनात राष्ट्राची निश्चित प्रतिमा निर्माण होण्यास मदत होते.

**२.वांशिक एकताः-** बर्जेस व लिकॉकच्या मते, वंश हा एक राष्ट्रीयत्व निर्माण करणारा महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी वांशिक एकता हा महत्वपूर्ण घटक आहे. एकाच वंशाच्या लोकामध्ये परस्परांबद्दल आपुलकीची भावना असल्याने एकाच वंशाचे लोक लवकर एकत्र येतात. आपला वंश शुद्ध आहे. इतरापेक्षा आपला

वंश श्रेष्ठ आहे. ही वांशिक भावना राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देते.उदा. हिटलरने आर्य वंश श्रेष्ठ आहे असे सांगुन जर्मन जनतेत राष्ट्रवाद निर्मितीचा प्रयत्न केला. राष्ट्रीयत्वाच्या निर्मितीसाठी वंश हा घटक उपयुक्त घटक असला तरी आधुनिक काळात या घटकांचे महत्त्व कमी झालेले दिसते. तसेच वांशिक शुद्धता वर्णसंकरामुळे आधुनिक काळात सापडणे शक्य नाही. वंश श्रेष्ठत्वाचा अभिमान हा घटक मानवाच्या आणि मानव जातीच्या विकासाच्या प्रक्रियेतील मोठा अडथळा आहे.

**३.भाषिक एकता:-** भाषा हे संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. समान भाषेमुळे नागरिक एकमेकांचे आचार विचार समजू शकतात. त्यामुळे समान भाषिकांमध्ये भावनिक जवळीक निर्माण होते. रॅम्से मूरच्या मते, भाषा हे वैचारिक देवाणघेवाणाचे प्रमुख साधन असल्याने आचार विचार, संस्कार, संस्कृती इत्यादीची ओळख होऊन लोकांमध्ये ऐक्याची भावना वृद्धीगत होत असते. युरोप खंडात भाषेच्या आधारावर राष्ट्र निर्माण झालेले दिसतात.उदा.इंग्लीश भाषा इंग्लंड देश, जर्मनी भाषा जर्मन देश या उलट निरनिराळया भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये ऐक्य निर्माण व्हायला वेळ लागतो.उदा.भारतात दक्षिण भारतीय राष्ट्रभाषा हिंदीला विरोध करतात. भाषिक एकात्मता हा राष्ट्रवादाला पोषक घटक असला तरी तो अनिवार्य घटक नाही. कारण स्वीत्झंलँड, भारत, देशात अनेक भाषा बोलणारे लोक असून राष्ट्रवादाची भावना अस्तित्वात दिसते. भाषिक विविधता असली तरी एकत्र राहण्याची प्रबळ इच्छा हा घटक राष्ट्रवादासाठी महत्त्वपूर्ण असतो. भाषिक विविधता असलेल्या राष्ट्र संघराज्यात्मक शासन पद्धतीचा अवलंब करून एक राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली जाते.

**४.धार्मिक एकात्मता :-** समाजाला संघटित करणारी धर्म मोठी शक्ती आहे. प्राचीन काळी समाजाला संघटित करण्यासाठी धर्माची फार मोठी मदत झालेली दिसते. समान धर्म असलेल्या लोकांमध्ये लवकर एकात्मता निर्माण होते. प्रत्येक धर्माचे उत्सव, चालीरिती, पुजा अर्चा, रूढी व परंपरा, श्रद्धा समान असल्याने एकाच धर्मातील लोकांमध्ये लवकर ऐक्य निर्माण होते. धार्मिक समानतेतून विशिष्ट घटकांबद्दल त्यांच्याबद्दल स्वाभिमान वाढीस लागतो. त्यातून एक धर्म एक राष्ट्र ही भावना निर्माण होते आणि या भावनेतून राष्ट्रवादाचा उदय होता.म्हणून धार्मिक आधारावर राष्ट्रवाद निर्मितीचा प्रयत्न अनेक देशात झालेला दिसतो.उदा.हिंदुस्थानची फाळणी धर्म या एकमेव कारणांमुळे झालेली दिसते. धार्मिक एकात्मतेतून राष्ट्रवाद विकसित होत असला तरी याच तत्त्वांच्या आधारावर राष्ट्रवादी भावना जागृत होत असतेच असे नाही. याउलट आधुनिक काळात सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता यासारख्या मानवी कल्याणाच्या विचार करणाऱ्या तत्त्वांना महत्त्व मिळाल्यामुळे राज्य आणि धर्म ह्या गोष्टी वेगळया करण्याकडे राष्ट्राचा कल वाढत चाललेला दिसतो.

**५. समान इतिहास**:- ऐतिहासिक घटकाचा आधार घेऊन जनतेला संघटित करण्याचे कार्य राष्ट्रवादात केले जाते. राजकीय नेते जनतेला इतिहासाची आठवण करून देतात. ऐतिहासिक घटना राष्ट्राबद्दल अभिमान निर्माण करायला कारणीभूत असतात. भूतकाळात संपादन केलेले यश, एकत्र भोगलेला त्रास, स्वातंत्र्य चळवळी, युद्ध इ. घटकांचा आधार घेऊन लोकांमध्ये राष्ट्रवाद निर्मितीचा प्रयत्न केला जातो. राष्ट्राचा गौरवपूर्ण इतिहास आणि त्यासंबंधीच्या स्मृती ऐतिहासिक घटनासंबंधी वाटणारा अभिमान, सुख, दुःख या सामूहिक भावना राष्ट्रवादाच्या निर्मितीस महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

**६.समान राजकीय आकांक्षा**:- समान राजकीय आकांक्षातून राष्ट्रवादाच्या निर्मितीला चालना मिळते. परकीय गुलामगिरी खाली असलेले लोक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी एकत्र येऊ लागतात. अनेक भाषा, धर्म, पंथ असलेले लोक राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी परस्परांतील भेद विसरून एकत्र येतात.उदा.भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात अनेक जाती धर्माचे लोकांनी भाग घेतलेला दिसतो.समान राजकीय आकांक्षेचे तत्त्व राष्ट्रीयतेला पोषक मानले जाते. आपला देश स्वतंत्र व सार्वभौम होण्याची भावना राष्ट्रवादाला चालना देते. या भावनेतून लोक परकीय सत्तेविरूद्ध संघर्ष करण्यास लोक तयार होतात. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आणि मिळालेले स्वातंत्र्य टिकवून देण्यासाठी तसेच देशाची सर्वच क्षेत्रात प्रगती घडवून आणण्यासाठीची समान स्वरूपाची आकांक्षा त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना दृढ करण्यास सहाय्यकारी ठरत असते.

**७.समान आर्थिक हितसंबंध:-** आधुनिक काळात आर्थिक हितसंबंधामुळे राष्ट्रवादाला प्रोत्साहन मिळतांना दिसते. जास्तीत जास्त वेगाने आर्थिक प्रगती साधून दारिद्रय दूर करणे हे प्रत्येक देशाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट जोडण्यासाठी धर्म,भाषा हे घटक दुय्यम मानून आर्थिक विकासासाठी एकत्र येण्याची भावना निर्माण झालेली आहे.उदा.भारतीय घटक राज्यांना परस्परांना मदतीची नितांत गरज आहे.पंजाबचा गहू, आसामचा चहा, दक्षिण भारतातील तांदुळ सर्वांना हवा आहे.त्यामुळे भारतीय समाजात अनेक भेद असूनही परस्परांच्या गरजेपोटी एकतेची भावना निर्माण होऊन भारतात राष्ट्रवाद निर्माण झाला. समान हितसंबंधातून राष्ट्रवादाच्या निर्मितीस अनुकूल परिस्थिती निर्माण होत असते. आर्थिक हितसंबंध परस्पर सहकार्यासोबत परस्पर सामंजस्य निर्माण होते. परस्पर सामंजस्यातून आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण होते. ही ऐक्याची भावना राष्ट्राचे आर्थिक हितसंबंध साधण्यास उपयुक्त असते त्यासोबत स्वत:चा आर्थिक उत्कर्ष साधण्यासही सहाय्यक ठरते. आपले राष्ट्र आर्थिक आधाडयांवर विश्वास यशस्वी झाले पाहिजे अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण होते आणि त्यातून राष्ट्रवादी भावनेचा विकास होण्यास मदत होत असते. उदा. स्वीत्झर्लंड मध्ये विविध भाषिक, वांशिक समुदाय असूनही व्यावसायिक व आर्थिक हितसंबंधामुळे ते स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयाला आलेले दिसते.

**८.सांस्कृतिक एकता:-** राष्ट्रीयता ही मुख्यत: सांस्कृतिक संकल्पना आहे. विचार आणि आदर्श याबाबत लोकांमध्ये एक वाक्यता असते. हे समान संस्कृतीचे वैशिष्टये असते. सांस्कृतिक एकता असलेल्या लोकांमध्ये विचार वा आदर्शबाबत समानता असते. रूढी, परंपरा, सण, समारंभातून विशिष्ट संस्कृती निर्माण होते. एका संस्कृतीतील लोकांचे आचार विचार ,चालीरिती व राहणीमान समान असते. त्यामुळे समाजात एकात्मता निर्माण होते.उदा.भारतात अनेक भाषा व धर्म असले तरी सांस्कृतिक एकतेमुळे राष्ट्रवादाच्या निर्मितीचा हातभार लागलेला दिसतो.

अशा प्रकारे राष्ट्रवाद वरील विविध कारणामुळे निर्माण होत असते. सर्व देशात सर्वच घटक अस्तित्वात असतील असे नाही प्रत्येक देशात वेगवेगळया घटकांमुळे राष्ट्रवाद निर्माण होता.

**प्र.२ रा. राष्ट्रवादाचे प्रकार व वर्गीकरण स्पष्ट करा?**

राष्ट्रवादाचा अभ्यास करणाऱ्या विचारवंतानी राष्ट्रवादाचे अनेक प्रकार पाडलेले दिसतात. यात स्नायडर यांनी एकीकृत, विनाशकारी, आक्रमक आणि आधुनिक राष्ट्रवाद असे तीन प्रकार पाडलेले आहेत. हॅन्स कोहेन यांनी पाश्चात्य आणि पाश्चात्येतर राष्ट्रवाद हे प्रकार सांगितले. विविध विचारवंतानी अभ्यास दृष्टिकोनाच्या आधारावर राष्ट्रवादाचे विविध प्रकार पाडलेले असले तरी प्रागतिक वा पुरोगामी राष्ट्रवाद आणि प्रतिगामी वा प्रतिक्रियावादी राष्ट्रवाद ह्या मुख्य दोन प्रकारात राष्ट्रवादाचे वर्गीकरण केलेले जाते. ते पुढीलप्रमाणे होत.

**अ) पुरोगामी वा प्रागतिक राष्ट्रवाद :-** या राष्ट्रवादात राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि समाजातील सर्व व्यक्तीच्या कल्याणाचा विचार केला जातो. हा राष्ट्रवाद विधायक कार्यावर भर देऊन राष्ट्राची प्रगती करण्याचा प्रयत्न करतो.

**ब) प्रतिगामी राष्ट्रवाद:-** हा राष्ट्रवाद विघातक कार्य करणारा राष्ट्रवाद मानला जातो. प्रतिगामी राष्ट्रवाद साम्राज्यवाद, युद्ध, आक्रमकता यांचा पुरस्कार करतो. राष्ट्रवादाचा अतिशय जहाल प्रकार असून तो आपल्या राष्ट्राबरोबर इतर राष्ट्रांनाही घातक ठरू शकतो.

**प्रागतिक व प्रतिगामी राष्ट्रवादातील फरक व परस्पर संबंध-** या राष्ट्रवादातील परस्पर संबंध व फरक पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतात.

१. पुरोगामी राष्ट्रवादात राष्ट्राची सर्वच क्षेत्रात प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. या राष्ट्रवादाचा माध्यमातून राष्ट्राचा विकास हळूहळू व शांततेच्या मार्गाने करण्याचा प्रयत्न केला जातो.आपल्या राष्ट्रासोबत इतर राष्ट्राचीही प्रगती व्हावी हा मानवतावादी उद्देश असतो. इतर राष्ट्रांचे हितसंबंध जोपासना करून आपल्या राष्ट्रांची प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. तर प्रतिगामी राष्ट्रवादात आपली उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब केला जातो. हिंसला उत्तेजन दिले जाते. आपल्या राष्ट्राचा विकास होतांना इतराची अधोगती कशी होईल यावर भर दिला जातो. हा राष्ट्रवाद फक्त राष्ट्राचा विकास हेच उद्दिष्ट मान्य करत असल्याने ते गाठण्यासाठी दुसऱ्या राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि हितसंबंधाला बाधा आणत असतो.

२. पुरोगामी राष्ट्रवादात आधुनिकतेकडे जाण्यासाठी नवीन नवीन विचार, बदल, नवीन प्रवाह व कल्पना स्वीकारल्या जातात. तर प्रतिगामी राष्ट्रवादात विघातक जुन्या रूढी, परंपरांना महत्व दिले जाते. त्या रूढी टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. नवे विचार, दृष्टिकोन, काळानुसार होणारे परिवर्तन हा राष्ट्रवाद नाकारतो.

३. पुरागामी राष्ट्रवादात विधायक स्वरूपाच्या कार्यावर भर दिला जातो. ते कार्य करण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे विधायक शक्तींना सतत प्रोत्साहन मिळते. तर प्रतिगामी राष्ट्रवादात विघातक, विघटनात्मक कार्यावर भर दिला जातो.लोकांमध्ये आक्रमक वृत्ती निर्माण करून युद्धाला प्रोत्साहन दिले जाते. या राष्ट्रवादामुळे संहारक आणि आक्रमक वृत्ती निर्माण होते.

४. पुरोगामी राष्ट्रवादात धर्मनिरपेक्ष विचाराचा अवलंब केला जातो. सर्व धर्मांना समान स्थान दिले जाते. तर प्रतिगामी राष्ट्रवादात विशिष्ट धर्माला राजधर्माची मान्यता असते. इतर धर्मियांना दुय्यम दर्जा दिला जातो. उदा. मुस्लिम धर्म पाकिस्तानाचा अधिकृत धर्म आहे.

५. पुरोगामी राष्ट्रवादात वंश,जात, लिंग,भाषा इ.ना समान स्थान दिले जाते. या आधारावर भेदभाव केला जात नाही. तर प्रतिगामी राष्ट्रवादात विशिष्ट वंश व भाषेला जास्त महत्व दिले जाते.उदा.हिटलरने आर्य वंशचा जयजयकार करून ज्यू चा नायनाट केला.

६. ज्या राष्ट्रवाद अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक यात फरक केला जात नाही. सर्वांच्या हिताचे संरक्षण केले जाते. राष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात सर्वांना सामील करून घेतले जातो त्यास प्रतिगामी राष्ट्रवाद म्हणतात तर ज्या राष्ट्रवादात विशिष्ट लोकांचा विकास साधण्याचा हेतू असतो. अल्पसंख्याकांना दुय्यम दर्जा देऊन त्यांच्या हिताकडे दुर्लक्ष केले जाते. ती प्रतिगामी राष्ट्रवादी भावना असते.

७. जे राष्ट्र जागतिक शांततेला महत्व देतात युनोचे नियम पाळतात. आपल्या स्वातंत्र्याबरोबर इतर राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा आदर करतात.त्या राष्ट्रवादाला पुरोगामी राष्ट्रवाद म्हणतात. तर साम्राज्यवादाचा पुरस्कार करून इतर राष्ट्रावर आक्रमण करतात.युनोच्या कायदयाचा भंग करतात. शेजारील राष्ट्रावर आक्रमण करतात तेथे पुरोगामी राष्ट्रवाद असतो.

राष्ट्रवादाचे मुख्य दोन प्रकार असले तरी दोन्ही प्रकार एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे काढता येत नाही. ते एकमेकांत मिसळलेले आहेत. एखादी घटना वा प्रसंगानुसार राष्ट्रवादाचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात.

**प्र.३ रा. राष्ट्रवादाचे गुणदोष स्पष्ट करा?**

आधुनिक काळात राष्ट्रवादाची संकल्पना सर्वमान्य झालेली असली तरी राष्ट्रवादीच्या प्रागतिक आणि प्रतिगामी स्वरूपामुळे त्यात गुणात्मक भागासोबत दोषात्मक भाग देखील मोठया प्रमाणावर असल्याने या संकल्पनेचे मूल्यमापन करणे गरजे आहे.

**अ) राष्ट्रवादाचे गुण:-**

राष्ट्रवाद ही संकल्पना आधुनिक काळात महत्वपूर्ण मानली जाते. या संकल्पनेत पुढील गुण दिसून येतात.

**१) राष्ट्रप्रेमाच्या भावनेचा विकास:-** राष्ट्रवाद ही भावना सर्व समाजामध्ये कमी अधिक प्रमाणात दिसून येते. राष्ट्रवादामुळे देशभक्तीची भावना विकसित होत असते. हा माझा देश आहे. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. ही भावना राष्ट्रवादातूनच जन्माला येते. देशभक्तीतून देशाप्रति कर्तव्यक्षमतेची वा जबाबदारीच्या भावनेचा विकास होत असल्याने पारतंत्र्यात असणारी राष्ट्रे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करतात.

**२) सामाजिक एकतेचा विकास :-** राष्ट्रवादामुळे लोकांमध्ये एकात्मतेची भावना तयार होते. जात, धर्म, भाषा इ.वरून निर्माण झालेले भेद कमी करून विविधेत एकता निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रवादामुळे होते. देशभक्ती नागरीकांना राष्ट्राकरीता कोणत्याही त्याग करायला शिकविते. त्यागामुळे नागरीकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होऊन समाजात एकी निर्माण होते. त्यातून भेदभाव विरहीत सामाजिक आणि राजकीय संस्कृती विकसित होते.

**३) राष्ट्रीय विकासाला चालना:-** राष्ट्रवाद लोकांना संघटित करण्याचे काम करतो. संघटित झालेल्या लोकांमध्ये आपल्या राष्ट्राची प्रगती व्हावी ही भावना निर्माण होते. व्यक्तीहितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य मिळते. त्यामुळे नागरीक

देशासाठी त्याग व कष्ट करायला तयार होतात. त्यातून आपोआप राष्ट्रविकासाला चालना मिळते. राष्ट्रीय विकासाच्या हेतूने देशातील नागरिक आर्थिक समृद्धीसाठी आपआपल्या क्षमतेनुसार प्रयत्न करतात.

**४) राष्ट्राराष्ट्रात सहकार्य भावनेचा विकासः-** राष्ट्रवादाच्या प्रभावातून प्रत्येक राष्ट्र प्रगती करण्याचा प्रयत्न करते. इतर राष्ट्रेसुद्धा प्रगती करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे राष्ट्रा-राष्ट्रात स्पर्धा निर्माण होते.स्पर्धामुळे सर्वांची कमी अधिक प्रमाणात प्रगती होते. राष्ट्र प्रगतीसाठी परस्परांना आर्थिक व तांत्रिक सहकार्य करतात. त्यातून राष्ट्रा राष्ट्रात सहकार्य भावनेचा विकास होतो.

**५) साम्राज्यवादाचा नाशः-** राष्ट्रवादामुळे राष्ट्राची संस्कृती व इतिहासांबद्दल आदर निर्माण होतो. आपले राष्ट्र स्वतंत्र व्हावे. गुलामगिरी नष्ट व्हावी. त्यासाठी प्रयत्न केले जातात.उदा.आशिया आफ्रिका खंडात राष्ट्रवादाचा उदय झाल्यामुळे अनेक देशात स्वातंत्र्य चळवळी सुरू झाल्या. त्यामुळे अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले आणि जगातील साम्राज्यवाद नष्ट झालेला दिसतो.

**६) सांघिकतेच्या भावनेचा विकासः-** राष्ट्रवादामुळे जनतेत राजकीय ऐक्याच्या भावनेचा विकास होतो. आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण झाल्यामुळे लहान लहान स्वरूपाचे मतभेद नष्ट होऊन ऐक्याची भावना निर्माण होते. विघटनात्मक विचार आणि अंतर्गत संघर्ष समाप्त होतात. सांघिक एकतेच्या भावनेतून राष्ट्रावर येणाऱ्या राजकीय आणि आर्थिक संकटांना एकजुटीने सामना करण्याची भावना निर्माण होते.

**ब) राष्ट्रवादाचे दोष** :- राष्ट्रवाद संकल्पनेत अनेक गुण असले तरी या संकल्पनेत विचारवंतानी पुढील दोष सांगितले आहेत.

**१) संकुचित राष्ट्रवादाची निर्मितीः-** राष्ट्रवाद विचारसरणीचा महत्त्वपूर्ण दुष्परिणाम म्हणजे आपल्या राष्ट्रावर प्रेम करणे याचा अर्थ इतर राष्ट्रांचा द्वेष करणे असा घेतला गेल्यामुळे लोक फक्त आपल्या राष्ट्रावर प्रेम करतात. इतर राष्ट्राचा द्वेष करतात. परिणामतः द्वेष भावना निर्माण होऊन युद्ध होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादामुळे संकुचितपणाला चालना मिळते. ह्या भावनेमुळे लोक फक्त आपल्या राष्ट्राचाच विचार करतात. ही भावना आंतरराष्ट्रवाद, सहअस्तित्वाच्या धोरणात अडथळे येतात.

**२) साम्राज्यवाद व वसाहतवादाला चालनाः-** राष्ट्रवाद स्वतःच्या मातृभूमीबद्दल आत्मियता निर्माण करत असला तरी आपल्या राष्ट्राचे वर्चस्व वाढविण्यासाठी इतर राष्ट्रवर आक्रमण करतो. यामुळे साम्राज्यवाद व वसाहतवादाला चालना मिळते. राष्ट्रा राष्ट्रातील सहकार्य नष्ट होते. व्यापाराच्या नावाखाली परराष्ट्राच्या बाजारपेठा आपल्या ताब्यात घेऊन आर्थिक साम्राज्यावाद निर्मितीचा प्रयत्न केला जातो. साम्राज्यवादी भावनेतून इतर राष्ट्रांचे अस्तित्व धोक्यात येते. साम्राज्यवादामुळे संघर्ष, द्वेष, कटुता आणि शत्रुत्वाची भावना वाढीला लागते.

**३) श्रेष्ठ कनिष्ठ भावनेला प्रोत्साहन**:- संकुचित राष्ट्रवादी भावनेतून जातीभेद व वर्णभेदाला भावनिक आव्हान करून राष्ट्रवादाची उभारणी करण्याचा प्रयत्न केला जातो. वंशाबद्दल फाजील अभिमान निर्माण करून इतर वंशियांना व राष्ट्राना कनिष्ठ लेखले जाते. त्यातून राष्ट्राराष्ट्रांत श्रेष्ठ कनिष्ठ हा वाद निर्माण होतो.उदा.हिटलरने वंश श्रेष्ठत्वाचे आवाहन करून इतर राष्ट्रांना हीन वंशाचे मानले. जात, धर्म आणि वर्ण इत्यादी घटकांच्या आधारावर द्वेषभावना विकसित होऊन राष्ट्राराष्ट्रात श्रेष्ठ-कनिष्ठ असा वाद निर्माण होता. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होता.

**४) व्यक्ती विकासाला घातकः-** राष्ट्रवाद ही संकल्पना व्यक्ती विकासाला घातक आहे. राष्ट्रहिताच्या नावाखाली व्यक्तीच्या सर्वस्वाचा त्याग करायला भाग पाडले जाते. राष्ट्रविकासाच्या नावाखाली व्यक्ती स्वातंत्र्याचा बळी दिला जातो. राष्ट्राच्या नावाने स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली जातात. राष्ट्रहित कितीही महत्त्वपूर्ण बाब असली तरी त्यासाठी व्यक्तीहिताकडे दुर्लक्ष करणे व्यक्तीविकासासाठी घातक असते.

अशा प्रकारे राष्ट्रवाद संकल्पनेत गुणांसोबत दोषही आहेत. राष्ट्रवाद संकल्पनेचे परीक्षण आणि मूल्यमापन करतांना गुणदोषाचा विचार करावा लागतो.

**राष्ट्र आणि राज्य यातील परस्परसंबंध व फरक:-**

राष्ट्र आणि राष्ट्रवाद ह्या राज्यशास्त्रातील अतिशय महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. राष्ट्र व राज्य हे शब्द बऱ्यादा समानार्थी वापरले जातात. मात्र दोन्ही संकल्पनामध्ये मूलभूत स्वरूपाचा फरक दिसून येतो. कायदयासाठी विशिष्ट भूप्रदेशात सुसंघटित झालेला समाज वा समुदाय म्हणजे राज्य होय. राज्य म्हणजे विशिष्ट भूप्रदेशावर कमी अधिक लोकसंख्येने वास्तव्य करणरा, जनसमुदाय की जो शासनाच्या नियमाचे पालन करतो आणि अंतर्गत व बाह्य दृष्टया सार्वभौम असतो. भूप्रदेश,लोकसंख्या, शासनसंस्था व सार्वभौमत्व या चार घटकांची राज्य निर्मितीसाठी आवश्यकता असते. राज्य ही राजकीय संकल्पना असून सार्वभौम राजकीय शासन हा त्यातील मुख्य विचार आहे. सार्वभौम सत्तेच्या नियंत्रणाखाली असलेल्या लोकांना राष्ट्र म्हणता येणार नाही. राष्ट्र निर्माण करण्यासाठी समाजातील घटकामध्ये एकात्मतेची भावना असावी लागते. आपण अन्य समाजापेक्षा वेगळे आहोत ही भावना राष्ट्रासाठी आवश्यक असते. पण राष्ट्राकरिता लोकसमुदायात परस्पर भावनिक संबंध असावे लागतात. भावनिक ऐक्य साधलेल्या राष्ट्रावर राजकीय शासन प्रस्थापित होते तेव्हा त्यास राष्ट्र राज्य ही संज्ञा वापरली जाते. राज्यातील नागरीकांवर शासन व कायदयाचे बंधन असते. राष्ट्राला कायदयाचे बंधन नसते. राज्यासाठी सार्वभौमत्व आवश्यक असते तर राष्ट्राला सार्वभौमत्वाची गरज नसते. राष्ट्र ही संकल्पना वस्तूनिष्ठ व कायदेशीर संकल्पना आहे तर राष्ट्र ही संकल्पना व्यक्तीनिष्ठ, मानसिक व भावनिक असते. राज्य हे राष्ट्रीयत्वावर आधारित असते तर राष्ट्र हे राज्याशिवाय असू शकते.राष्ट्रीत्व हा अनुभव व जीवनाचा मार्ग आहे तर राज्य निर्मिती ही सुसंस्कृती जीवनाशी संबंधित संकल्पना आहे. राष्ट्राची निर्मिती एकात्मतेच्या भावनेतून होते. ती भावना नष्ट वा कमी झाल्यास राष्ट्र नष्ट होते. एका कायद्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या लोकांचे एक राज्य असते पण एक राष्ट्र असेलच असे नाही. उदा. बांगलादेश फुटून निघण्यापूर्वी पाकिस्तान हे राज्य होते. एकात्मतेची भावना नसल्याने पाकिस्तान राष्ट्र होऊ शकले नाही. पाकिस्तानचे  अल्पकाळात दोन भागात विभाजन झ ाले. काही वेळेस राज्यातून राष्ट्राची निर्मिती होते.उदा.ब्रिटिश राजवटीत भारतात एक राष्ट्र ही संकल्पना निर्माण झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे राज्यात रूपांतर झाले. याचा अर्थ राष्ट्र राज्य संकल्पनेत भेद असला तरी दोन्ही संकल्पना परस्परपूरक आहेत.

**राष्ट्र आणि राष्ट्रक यातील फरक:-**

राष्ट्र आणि राष्ट्रक हे शब्द समानार्थी मानले जात असले तरी त्यात सूक्ष्म भेद आहेत. आपले एक स्वतंत्र व सार्वभौम राज्य असावे, अशी आकांक्षा लोकामध्ये निर्माण झाल्यास राष्ट्र ही संकल्पना अस्तित्वात येते. ही आकांक्षा नसल्यास फक्त एकीची भावना असेल तर असा समाजास राष्ट्रक असे म्हणतात. राष्ट्र संकल्पनेत राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करण्याचे ध्येय असते. तर राष्ट्रक ही राजकीयेतर संकल्पना आहे. समान स्वरूपाची बांधिलकी असणारा आणि आध्यात्मिक आणि मानसिक भावनांनी एकत्र येणारा समाज म्हणजे राष्ट्रक होय. एका राज्यात अनेक राष्ट्रके असू शकतात. राष्ट्रकांचे रूपांतर राष्ट्रात होत असते. त्याकरीता राष्ट्रकाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी संघटित प्रयत्नाची गरज असते. लार्ड ब्राईसच्या मते "भाषा, वाङ् मय, रूढी, परंपरा इ सारख्या बंधनानी बांधल्या गेल्यामुळे एकात्मतेची भावना निर्माण होऊन इतर समाजापेक्षा आपण वेगळे आहोत असे मानणारा समाज म्हणजे राष्ट्रक होय "अशी व्याख्या केलेले आहे. राजकीय संघटनेद्वारे संघटित झालेले लोक म्हणजे राष्ट्र होय. याचा अर्थ एकात्मतेची भावना असलेल्या समाजाला राष्ट्राकाचा दर्जा दिला जातो. तर राष्ट्र तयार होण्यासाठी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. याचा अर्थ राष्ट्रक म्हणजे स्वतंत्र होऊ इच्छिणारे लोक तर राष्ट्र म्हणजे स्वतंत्र झालेले लोक हा फरक मान्य केला तर ही संकल्पना राष्ट्र निर्मितीपूर्वीची संकल्पना आहे. उदा.१९४८ पूर्वी भारताचे स्वरूप राष्ट्रकाचे होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताला राष्ट्राला मिळाला. राजकीय दृष्टया सुसंघटित नसलेला, राष्ट्र बनण्याची आकांक्षा बाळगणारा आणि इतरांपेक्षा स्वत:चे वेगळेपण दाखविणारा समाज राष्ट्रक असते. राजकीय संघटनेद्वारा स्वातंत्र्य मिळविलेल्या समाजाला राष्ट्र असे म्हणतात. राजकीय दर्जा व स्वातंत्र्य या संदर्भात राष्ट्र व राष्ट्रक यात भेद केला जातो. इतर वेळेस मात्र दोन्ही संकल्पना समान अर्थाने वापरल्या जातात.

**प्र.४ था.आंतरराष्ट्रवादाची व्याख्या सांगुन आंतरराष्ट्रवादाच्या विकासाची कारणे सांगा?**

आधुनिक काळात राष्ट्रवादी भावनेतून आंतरराष्ट्रवादाचा विकास झालेला दिसतो. विशेषतः २० शतकात आंतरराष्ट्रावाद भावनेचा अधिक विकास झालेला दिसतो. राष्ट्रवादात नागरिक आपल्या राष्ट्राबद्दल त्याग, बलिदान आणि प्रेमाची भावना ठेवता तशीच भावना इतर राष्ट्राबद्दल सह-अस्तित्व, परस्परसहकार्य भावना ठेवीत असेल त्याला अराष्ट्रवादी भावना असे म्हणतात. जगातील सर्व राष्ट्राबद्दल विधायक स्वरूपाचा दृष्टिकोन ठेवणारी भावना म्हणजे आंतरराष्ट्रवादी भावना होय. या विचारसरणीत मानवाला केंद्रस्थानी मानले जाते. अखिल मानवजातीच्या कल्याणाचा विचार केला जातो. जगातील अखिल मानव जातीच्या विकासाचा आंतरराष्ट्रवादी भावनेच्या पाठीमागे असते. संपूर्ण विश्व एक राष्ट्र असून अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी प्रत्येक राष्ट्राने प्रयत्न केला पाहिजे. आपण विशिष्ट राष्ट्रांचे नागरीक नसून संपूर्ण जगाचे नागरीक आहोत ही भावना आंतरराष्ट्रवादाचा पाया आहे.

**आंतरराष्ट्रवादाची व्याख्या:-**

**१) गोल्ड स्मिथ:-** आंतरराष्ट्रवाद ही एक अशी भावना आहे की, व्यक्ती ही केवळ तिच्या देशाची घटक असत नाही तर ती सर्व जगाची नागरीक असते.ही भावना म्हणजे आंतरराष्ट्रवाद होय.

**२) विल्यम गॅरिसन:-** यांच्यामते आंतरराष्ट्रवाद हा व्यापक विचार असून संपूर्ण जग म्हणजे आपला देश, जगातले सर्व मानव म्हणजे आपले बांधव असे मानणारा आणि आपल्या राष्ट्राप्रमाणे इतर राष्ट्रांवरही प्रेम करायला शिकविणारी भावना म्हणजे आंतरराष्ट्रवाद होय.

वरील व्याख्याचा विचार करता आंतरराष्ट्रवाद ही भावना व्यक्तीला जगाचे नागरिक संबोधण्यासोबत आंतरराष्ट्रीय सहकार्य व सह-अस्तित्वाची भावना जोपणारा विचार आहे. राष्ट्रवादी वृत्तीचे लोक आंतरराष्ट्रीय शांतता आणि विकासासाठी सामुहिकपणे प्रयत्न करून परस्परांशी चांगले संबंध प्रस्थापित करून परस्परांबद्दल विश्वास बाळगतात.

**टिप- आंतरराष्ट्रवादाची आधारभूत तत्त्वे-** राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद परस्परविरोधी भावना नसून राष्ट्रवादाच्या मार्गाने आंतरराष्ट्रवादाकडे पोहचता येते. आंतरराष्ट्रवादाचे आधारभूत घटक पुढीलप्रमाणे होत.

१. आंतरराष्ट्रवाद जागतिक पातळीवर बंधुत्वाच्या तत्त्वावर विश्वास व्यक्त करतो.
२. आंतरराष्ट्रवाद राष्ट्रीय समाजापेक्षा आंतरराष्ट्रीय समाजाला जास्त महत्त्व देतो.
३. आंतरराष्ट्रवाद जागतिक पातळीवर परस्पर सहकार्य, सह-अस्तित्व, सहजीवनास मान्यता देऊन सर्व देशात मैत्रीचे बंध निर्मितीस मान्यता देतो.
४. आंतरराष्ट्रवाद हा आक्रमक, युद्ध, साम्राज्यवादी वृत्तीला विरोध करतो.
५. आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रवाद शांततामय व सनदशीर आणि नैतिक पद्धतीचा अवलंब करतो.

**आंतरराष्ट्रवादाच्या विकासाची कारणे व घटक:-** ग्रीक मध्ये स्टोइक विचारवंतानी जागतिक बंधुत्वाची संकल्पना मांडलेली दिसते. मध्ययुगात डान्टेने डी मोनाशिया ग्रंथात जागतिक राज्याची संकल्पना मांडून विश्व बंधुत्व सिद्धाला मान्यता दिली. रूसोने जागतिक संघराज्याची संकल्पना मांडली. जेरमी बेथॅमने आंतरराष्ट्रीय कायद्याचा मसुदा तयार केला. कांटने आंतरराष्ट्रीय संघराज्याची कल्पना विशद केली. हेग जागतिक परिषदेत आंतरराष्ट्रीय कायदे व लवाद न्यायालयाची स्थापना झाली. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्र संघ ही जागतिक पातळीवरील राष्ट्राची संघटना निर्माण झाली. या संघटनेने आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पण यश आले नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्र संघाचे अपयश लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. यूनोच्या स्थापनेतून आंतरराष्ट्रवादाच्या विकासाला चालना मिळालेली दिसते. आंतरराष्ट्रवादाच्या विकासाची कारणे पुढीलप्रमाणे होत.

**१) महायुद्ध:-** जागतिक पातळीवर १९१४ ते १९१८ पहिले महायुद्ध तर १९३९ ते १९४५ दुसरे महायुद्ध झाले. या महायुद्धामुळे मानवी जीवन व संपत्तीची प्रचंड हानी झाली. महायुद्धामुळे मानवाचा सामाजिक,आर्थिक व औद्योगिक विकास थांबला. महागाई, बेरोजगारी,दारिद्रय इ.प्रश्न निर्माण झाले. दुसऱ्या महायद्धात अणुबॉम्बचा सारख्या महाभयानक

अस्त्राचा वापर झाल्यामुळे मानव जातीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला. तिसरे महायुद्ध झाले तर मानव जात शिल्लक राहणार नाही. हे मानवास उमगल्यामुळे महायुद्धे पुन्हा होऊ नये म्हणून आंतरराष्ट्रवादाच्या विकासाला चालना देण्यात आली. आपआपसातील मतभेद सामोपचाराने व शांततमय रीतीने परस्परसहकार्य वृद्धीगत करण्याची भावना सर्वत्र वाढत गेली त्यातून आंतरराष्ट्रवादाच्या विकासाला चालना मिळाली.

**२) वाढते परस्परावलंबन**:- आधुनिक काळात वाढती लोकसंख्या व राहणीमानाच्या दर्जात झालेल्या वाढीमुळे मानवाच्या गरजा दिवसेंदिवस वाढत आहेत. कोणतेही राष्ट्र आपल्या गरजा स्वत: पूर्ण करू शकत नाही. गरजपूर्तीसाठी प्रत्येक राष्ट्रांला इतर राष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. उदा.अमेरिकेसारख्या देशाला खनिजतेलासाठी अरब राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. या गरजामुळे राष्ट्रा-राष्ट्रामध्ये संपर्क व व्यापार वाढत आहे. हा व्यापार कायम टिकून राहण्यासाठी राष्ट्रामध्ये मैत्री करार व तह होतांना दिसतात.अशा परस्परसहकार्यातून आंतरराष्ट्रवादाला चालना मिळते.

**३) विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती**:- आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे दळणवळणाच्या साधनात क्रांतीकारी बदल झाले. जलद संपर्क साधनामुळे राष्ट्रातील भौगालिक अंतर कमी झाले. दूरदर्शन व संगणक आणि इंटरनेट इ.साधनामुळे त्वरीत संपर्क सोयी उपलब्ध झाल्यात. या वैज्ञानिक क्रांतीमुळे तंत्रज्ञान व विचाराचे आदान प्रदान मोठया प्रमाणावर सुरू झाले. वाढत्या संपर्कामुळे एकमेकांचे आचार विचार व संस्कृतीचा परिचय होऊन पूर्वग्रह दूर होतांना दिसतात .तंत्रज्ञानाचा वापर विधायक कार्यासाठी झाल्यामुळे आंतरराष्ट्रवादाच्या विकासाला चालना मिळाली.

**४) नैसर्गिक संकटे:-** भूकंप, पूर, दुष्काळ इ.नैसर्गिक संकटे प्रत्येक देशावर येत असतात. अशा संकटात सापडलेल्या राष्ट्राला इतर राष्ट्राकडून मदत दिली जाते. उदा.गुजराथ मधील कच्छच्या भूकंपाच्या वेळेस अनेक देशांनी मदत केली. अशा कार्यातून जगातील नागरीकामध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते आणि त्यातूनच आंतरराष्ट्रवादाचा विकास होतो.

**५) अत्याधुनिक शस्त्रांस्त्राची निर्मिती**:- आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या जोरावर हायड्रोजन बॉम्ब,अणुबॉम्ब, न्युट्रान बॉम्ब, क्षेपणास्त्र इ.भयानक शस्त्रे निर्माण झालेली दिसतात. या विनासकारी शस्त्राचा वापर केल्यास मानव जातीचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. विनाशकारी शस्त्रामुळे तिसऱ्या महायुद्धाची भीती निर्माण झाली आहे. ही भीती कमी करण्यासाठी शस्त्रकपात व नियंत्रणासाठी जागतिक परिषदा भरविल्या जात आहेत. त्यातूनचे सर्वंकष अणुचाचणी करार जन्माला आला. या कराराच्या माध्यमातून शस्त्र स्पर्धेला लगाम लावण्याचा प्रयत्न राष्ट्राकडून झाल्यामुळे आंतरराष्ट्रवादाला चालना मिळाली.

**६) आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती:-** दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील राष्ट्रांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली. आज बहुसंख्य देश युनोचे सदस्य बनले आहेत. आपआपसांतील प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा युनो प्रयत्न करते. जागतिक प्रश्नांवर चर्चा घडवून आणते. सदस्य राष्ट्रांला आपली बाजू मांडण्यासाठी युनोचे व्यासपीठ कायमस्वरूपी उपलब्ध झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर राष्ट्राराष्ट्रात परस्परसहकार्य, मैत्रीची भावना, सहिष्णुता आणि सह-अस्तित्व भावना निर्माण करण्यासाठी युनोने मोठया प्रमाणावर राष्ट्रामध्ये जनजागृतीची व्यापक प्रयत्न केलेले आढळतात. वेळप्रसंगी युद्धखोर राष्ट्रांवर युनो मार्फत कारवाई केली जाते. उदा.इराकने कुवेतवर हल्ला केला होता तेव्हा अमेरिकेच्या नेतृत्वाखाली युनोने शांतीसेना स्थापन करून कुवेत इराकपासून मुक्त केला. युनिसेफ, युनेस्को,जागतिक बँक इ.युनोशी संलग्न सामाजिक व आर्थिक क्षेत्रात जगातील राष्ट्रांना मदत व सहकार्य करत असतात.त्यामुळे सुद्धा आंतरराष्ट्रवादाला चालना मिळते. राष्ट्राराष्ट्रात मानवविकास आणि मानवी कल्याण साधण्यासाठी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यासारख्या संघटनांची निर्मिती करण्यात येऊन मानवी विकास व कल्याणासाठी चालणाऱ्या प्रयत्नातून आंतरराष्ट्रवाद वाढीस चालना मिळालेली आहे.

अशा प्रकारे २० व्या शतकात आंतरराष्ट्रवादाच्या विकासात सहाय्यक ठरणारे घटक निर्माण झाल्यामुळे आंतरराष्ट्रवाद संकल्पनेच्या विकासाला हातभार लागलेला दिसतो.

**टिप- आंतरराष्ट्रवादाच्या मार्गातील प्रमुख अडथळे वा अडचणी किंवा समस्या स्पष्ट करा?**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रवादाच्या विकासाला मोठया प्रमाणावर चालना मिळाली असली तरी राष्ट्रहित संकल्पनेमुळे आंतरराष्ट्रवादाच्या विकासात पुढील घटक अडथळे येतात.

**१) स्वार्थी राष्टीयता:-** आज आंतरराष्ट्रवादाला महत्त्व आलेले असले तरी बहुतेक राष्ट्रे आंतरराष्ट्रीय प्रश्नाकडे राष्ट्राचा स्वार्थ लक्षात घेऊन राष्ट्रे धोरण आखतात. त्याना जगाच्या कल्याणापेक्षा स्वतःच्या राष्ट्राची प्रतिष्ठा व स्वार्थ महत्त्वाचा वाढतो. राष्ट्रीय स्वार्थासाठी आपले सार्वभौमत्व इतरावर लादण्याचा प्रयत्न करतात.शेजारील प्रदेश मिळविण्यासाठी आक्रमक वृत्ती धारण करतात आणि आक्रमक राष्ट्रवादातून युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे आंतरराष्ट्रवादात अडथळे निर्माण होतात. उदा.भारत पाकिस्तान मधील काश्मीर प्रश्न.

**२) विस्तारवाद व साम्राज्यवादाचा अडथळा:-** आधुनिक काळात भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून आर्थिक साम्राज्यवाद निर्माण झालेला दिसतो. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी आणि हक्कांची बाजारपेठ मिळवण्यासाठी प्रबल राष्ट्रे इतर राष्ट्रांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. एखादया राष्ट्रांवर आर्थिक नियंत्रण निर्माण झाल्यास त्या राष्ट्राची हक्कांची बाजारपेठ निर्यातीसाठी उपलब्ध होते. आर्थिक ताकदीच्या जोरावर राजकीय नियंत्रण प्रस्थापित करता येते.उदा.अमेरिकेचा डॉलर साम्राज्यवाद बाजारपेठा मिळविण्यासाठी राष्टा-राष्ट्रामध्ये स्पर्धा निर्माण होऊन त्याचे रूपांतर संघर्षात होते. त्यामुळे देखील आंतरराष्ट्रीय शांततेला धोका पोहचतो.

**३) वैचारिक मतभेद:-** आंतरराष्ट्रीय पातळीवर सामाजिक व आर्थिक विषयाबाबत विविध विचारप्रणाल्या निर्माण झालेल्या आहेत. यात भांडवलशाही, हुकूमशाही, साम्यवाद इ.विचारप्रणाली सांगता येतात. विचारप्रणाल्याच्या आधारावर जागतिक राजकारणात गट निर्माण झाले.विचारप्रणालीच्या अंमलातून राजकीय, आर्थिक आणि इतर विभिन्न स्वरूपाचे वाद उद्‌भवत आहेत. वेगवेगळया प्रकारांच्या विचारसरणीमुळे ध्येयवादांमुळे राष्ट्रांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक स्वरूपात गट निर्माण झालेले दिसतात. या गटाची विचारसरणी परस्परविरोधी असल्याने या गटात संघर्ष निर्माण होऊन शीतयुद्धाची निर्मिती झाली.उदा.अमेरिका व रशिया हे दोन गट निर्माण झाल्याने शीतयुद्धाचा जन्म झाला.त्यामुळे आंतरराष्टीय शांततेला धोका पोहचला.

**४) वाढती शस्त्र स्पर्धा**:- आज प्रत्येक राष्ट्र शस्त्रसंपन्न होण्यासाठी मोठया प्रमाणावर शस्त्रास्त्रांचे उत्पादन करू लागले. वाढत्या शस्त्र स्पर्धत राष्ट्र मागे पडू नये म्हणून राष्ट्र उत्पन्नाचा मोठया भाग शस्त्र निर्मितीवर खर्च करून महाभंयकर शस्त्र निर्माण केली जात आहे. शस्त्र स्पर्धेमुळे प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राकडे संशयाने पाहते. त्यामुळे वेगवेगळया प्रकारची नवनवीन शस्त्रास्त्रे राष्ट्राकडून निर्माण केली जात आहेत. त्यामुळे शस्त्रास्त्र स्पर्धा आंतरराष्ट्रीय शांततेस घातक ठरत असून प्रत्यक्ष युद्ध होत नसले तरी युद्धसदृश्य वातावरण कायम राहते. त्यामुळे शीतयुद्धाची समस्या आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेली आहे.त्यामुळे देखील आंतरराष्टीय शांतता धोक्यात आली आहे.

**५) प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव:-** राष्ट्रा राष्ट्रातील संघर्ष व मतभेद मिटविण्यासाठी युनो ही संघटना कार्य करीत आहे.आंतरराष्ट्रीय कायदे देखील अस्तित्वात आहे पण युनोचे कार्य नैतिकतेच्या आधारावर चालते. युनोजवळ स्वतःचे लष्कर नाही. ही संघटना आर्थिक दृष्टया कमजोर आहे. युनोला लागणारा निधी बडया राष्ट्राकडून मोठया प्रमाणावर मिळतो. त्यामुळे ते युनोला जुमानत नाही. युनोने कारवाईचा प्रयत्न केल्यास बडे राष्ट्र निधी गोठविण्याचा निर्णय घेतात. त्यामुळे युनोला आक्रमक राष्ट्रांवर कारवाई करता येत नाही. अमेरिका,चीन ,रशिया,इंग्लंड व फ्रॉन्स या देशाना नकारधिकार वा व्हेटोचा अधिकार आहे. हे देश स्वार्थासाठी व्हेटोचा वापर करून युनोच्या कार्यात अडचणी निर्माण करतात. युनो प्रभावशाली नसल्याने आंतरराष्टवादात अडथळे निर्माण होतात. याशिवाय नाटो, सिटो, सिएन्टो, सार्क, अलिप्त राष्ट्रांचा गट, वार्सा करार इ. वेगवेगळया संघटना क्षेत्रिय पातळीवर निर्माण झालेल्या आहेत. या संघटनामुळे राष्ट्र युनोला महत्त्व देत नाही.

आंतरराष्ट्रवाद ही संकल्पना कितीही आदर्श व आधुनिक काळात उपयुक्त मानली जात तरी या संकल्पनेच्या विकासाच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण झालेल्या दिसतात जोपर्यंत या अडचणी नष्ट करण्यासाठी राष्ट्र व्यापक प्रयत्न करीत नाही तोपर्यंत आंतरराष्ट्रावादाचा विकास होणार नाही.

**प्र.५ वा.विश्वराज्य किंवा जागतिक सरकारची संकल्पना स्पष्ट करा?**

**किंवा**

**जागतिक सरकार वा विश्वसरकार का निर्माण होऊ शकत नाही यांची कारणे स्पष्ट करा?**

दुसऱ्या महायुद्धानंतर युनोची स्थापना झाली. जागतिक बहुसंख्य देश युनोच सदस्य झाले. युनोच्या व्यासपीठावर राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात युनोला काही प्रमाणात यश देखील आलेले आहे. जगातील युद्ध नष्ट करण्यासाठी आणि कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी अनेक विचारवंतानी विश्वराज्याची संकल्पना मांडली. आज जगात वेगवेगळी राष्ट्रे दिसत असली ती भावी काळात ही राष्ट्रे नष्ट होऊन संपूर्ण जगाचे एक विश्वराज्य निर्माण होईल. विश्वराज्य तयार झाल्यास नैसर्गिक साधनसंपत्ती व तंत्रज्ञानाचा सर्वासाठी वापर करता येईल. अविकसित देशाचा विकसित देशाच्या मदतीने विकास करता येईल. सर्व राष्ट्रे जगातील सरकारच्या नियंत्रणाखाली असल्याने आपआपसांत संघर्ष होणार नाही. त्यामुळे युद्ध होणार नाहीत.म्हणून लष्कर जवळ बाळगण्याची गरज राहणार नाही.लष्करावर खर्च होणारा पैसा विकास कामासाठी वापरता येईल. विश्वराज्य संकल्पनेमुळे सर्व राष्ट्र एका मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणाखाली आल्यामुळे जागतिक पातळीवर संघर्ष, मतभेद उद्‌भवणार नाहीत. त्यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्याची समस्या राहणार नाही. सर्व राष्ट्र विश्वराज्याचा भाग झाल्याने राष्ट्रा-राष्ट्रातील सर्व नागरिक एकत्र येतील व त्यांना सर्वांना सुख समाधाने राहता येईल आणि त्यातून सर्वांची प्रगती साधता येईल. तंत्रज्ञान आणि माहिती क्षेत्रातील क्रांतीमुळे जगाला वैश्विक खेडयाचे रूप प्राप्त झालेले आहे. त्याअर्थाने भौगोलिक अंतर आणि राष्ट्र सीमा हा मुद्दा गौण ठरला आहे. हे परिवर्तन विश्वराज्याच्या निर्मितीस पोषक आहे.

**विश्वराज्याची वैशिष्टये वा स्वरूपः-**

**१)** जागतिक सरकार सर्वात शक्तीशाली असेल त्याला शक्तीशाली बनविण्यासाठी प्रभावी लष्कर व पोलिस व्यवस्था त्यांच्या जवळ ताब्यात दिली जाईल.

**२)** राष्ट्र आपली सार्वभौम सत्ता विश्वराज्यास अर्पण करतील. राष्टांना घटकराज्यासारखा दुय्यम दर्जा असेल.

**३)** जागतिक सरकार संघराज्याप्रमाणे असेल राष्ट्रांचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्य विश्वराज्यात विलीन केले जाईल.राष्ट्रांना घटकराज्याप्रमाणे अंतर्गत स्वायत्ता दिली जाईल.

**४)** सर्व राष्ट्रे जागतिक सरकारच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे राष्ट्रांराष्ट्रामध्ये अंतर्गत संघर्ष होणार नाही.त्यामुळे युद्ध बंद होऊन जगात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होईल.

**विश्वराज्याच्या स्थापनेतील अडचणी वा समस्या**:- विश्वराज्याची संकल्पना कितीही उदात्त असली तरी ती पूर्ण करण्यासाठी पुढील अडचणी येत असतात.

**१) राजनिष्ठा सोडायला लोक तयार नाहीत**:- विश्वराज्य निर्माण करण्यासाठी राज्यसंस्था नष्ट झाली पाहिजे. कारण राज्यसंस्थेमुळे लोकांची निष्ठा व प्रेम राष्ट्रांपुरते मर्यादित राहते.आपले राष्ट्र इतरांपेक्षा वेगळे आहे.ही राष्ट्रवादाची भावना नष्ट केल्याशिवाय विश्वराज्य निर्माण होणार नाही. विश्वराज्यासाठी समान उद्दिष्टये असणारा समाज निर्माण करणे आवश्यक असते तेव्हा असा समाज निर्माण करणे अवघड नाही तर अशक्य आहे. व्यक्ती आपली निष्ठा राष्ट्राऐवजी विश्वराज्य प्रति अर्पण करण्यास तयार राहतील हे खरे वाटत नाही.

**२) राष्ट्रे सार्वभौमत्व सोडायला तयार नाहीतः-** अंतर्गत कारभारात सर्वश्रेष्ठत्व आणि बाह्य नियंत्रणापासून मुक्त अशी सार्वभौम राष्ट्रे युनोचे सभासद असले तरी आपले सार्वभौमत्व मर्यादित करायला तयार नाहीत. राष्ट्रे स्वार्थासाठी आरोप प्रत्यारोप व युद्धाचा वापर करतात. राष्ट्रहिताचा आधारावर परराष्ट्र धोरण ठरवतात. राष्ट्रहित संकल्पनेमुळे विश्वराज्य होऊ शकत नाहीत.

**३) युनोचे अपयश :-** जागतिक शांततेसाठी युनो स्थापन झालेली असली तरी युनातील पाच बडया राष्ट्रांना व्हेटोचा अधिकार आहे.ते स्वार्थीसाठी नकारधिकाराचा वापर करतात. त्यामुळे अनेक प्रश्न युनोमध्ये जैसे थे स्थितीत पडलेले आहेत.उदा.काश्मीर प्रश्न युनोजवळ स्वतःचे लष्कर नाही. त्यामुळे आक्रमक राष्ट्रांवर कारवाई करता येत नाही. युनोच्या

कायदयामागे दंडशक्ती नसल्यामुळे ते कायदे कुणीही पाळत नाही. युनोच्या अपयशामुळे विश्वराज्य स्थापन करणे शक्य नाही.

**४) जागतिक सरकार अशक्य:-** विश्वराज्य निर्माण करतांना अनेक कायदेशीर व व्यावहारिक अडचणी आहेत. मध्यवर्ती सरकार व घटक राज्य सरकार यात अधिकार विभागणी कोणत्या तत्त्वांच्या आधारावर करावी याबाबत मतभेद आहेत. अधिकार विभागणी करतांना बलवान देश जास्त अधिकाराची मागणी करतील.अधिकार विभागणीवरून राष्ट्रा-राष्ट्रामध्ये लहान मोठे असे भेद असल्याने सद्य:स्थितीत विश्वराज्य निर्माण होणे शक्य नाही.

**५) भूप्रदेश,लोकसंख्या व नैसर्गिक साधन संपत्तीबाबत विषमता:-** आज जागतिक सरकारच्या यशाबद्दल शंका घेतली जाते. कारण अनेक राष्ट्रांत भूपद्रेश व लोकसंख्येबाबत विषमता दिसून येते. काही देश आकाराने खूप मोठे आहेत तर काही अत्यंत लहान आहेत.नैसर्गिक साधनसंपत्तीबाबतही देशात विषमता दिसून येते.काही देशात वाळवंट तर काही देशात सुपीक जमीन या भेदामुळे राष्ट्रांराष्ट्रात दरी निर्माण झालेली आहे. वरील घटकामध्ये समता निर्माण झाल्याशिवाय विश्वराज्य निर्माण होणे शक्य नाही.

अशा प्रकारे विश्वराज्य निर्मितीत वरील अडचणी दिसून येतात.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

**१.** राष्ट्रवादाचे प्रमख प्रकार कोणते?
उत्तर- राष्ट्रवादाचे प्रागतिक वा पुरोगामी राष्ट्रवाद आणि प्रतिगामी राष्ट्रवाद हे मुख्य दोन प्रकार आहेत.

**२.** विश्वराज्य निर्मितीतील दोन अडथळे सांगा.
उत्तर- विश्वराज्य निर्मितीत राष्ट्र सार्वभौमत्व सोडायला तयार नाही, लोक राजनिष्ठा सोडण्यास तयार नाही राष्ट्राराष्ट्रात लोकसंख्या,साधनसंपत्ती व आकार बाबत विभिन्नता हे विश्वराज्य निर्मितीतील प्रमुख अडथळे आहेत.

**३.** राष्ट्रवादाचे प्रमुख दोन घटक स्पष्ट करा.
उत्तर- राष्ट्रवादाचे भौगालिक परिस्थिती, समान इतिहास, समान राजकीय महत्त्वकांक्षा आणि समान आर्थिक हितसंबंध हे प्रमुख घटक आहेत.

**४.** आंतरराष्ट्रवाद म्हणजे काय?
उत्तर- २० शतकात आंतरराष्ट्रावाद भावनेचा अधिक विकास झालेला दिसतो. संपूर्ण विश्व एक राष्ट्र असून अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी प्रत्येक राष्ट्राने प्रयत्न केला पाहिजे.आपण विशिष्ट राष्ट्रांचे नागरीक नसून संपूर्ण जगाचे नागरीक आहोत ही भावना आंतरराष्ट्रवादाचा पाया आहे.

**५.** राष्ट्रक म्हणजे काय?
उत्तर- राष्ट्र आणि राष्ट्रक हे शब्द समानार्थी मानले जात असले तरी त्यात सूक्ष्म भेद आहेत. लार्ड ब्राईसच्या मते "भाषा,वाङ:मय,रूढी परंपरा इ सारख्या बंधनानी बांधल्या गेल्यामुळे एकात्मतेची भावना निर्माण होऊन इतर समाजापेक्षा आपण वेगळे आहोत असे मानणारा समाज म्हणजे राष्ट्रक होय"

**६.** राष्ट्रवादाचे कोणतेही दोन गुण सांगा.
उत्तर- राष्ट्रवादामुळे राष्ट्रप्रेमाच्या भावनेचा विकास होतो. सामाजिक एकतेचा विकास होतो आणि राष्ट्रवादामुळे राष्ट्रीय विकासाला चालना मिळत असते.

**७.** राष्ट्रवादाचे दोन दोष सांगा.
उत्तर- राष्ट्रवादामुळे संकुचित राष्ट्रवादाची निर्मिती आणि साम्राज्यवाद व वसाहतवादाला चालना तसेच राष्ट्राराष्ट्रांत श्रेष्ठ कनिष्ठ भावनेला प्रोत्साहन मिळत असते.

## प्रकरण ३ रे
## लोकशाही समाजवाद

**प्र.१ ला. लोकशाही व समाजवाद यांच्यातील समन्वय स्पष्ट करा ?**

**किंवा**

**लोकशाही व समाजवाद विचारधारा परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहे या विधानाची चर्चा करा ?**

औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या शोषण आणि दोषामुळे समाजवाद विचारसरणीचा उदय जगात झालेला दिसतो. लोकशाही समाजवाद ही विचारसरणी समाजवाद या विचारसरणीपासून जन्माला आलेली आहे. त्यामुळे समाजवाद विचारसरणीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. समाजवाद शब्दांची व्याख्या करणे सोपी गोष्ट नाही. जगातील अनेक विचारवंतानी समाजवादाबद्दल उलट सुलट लेखन केलेले आहे. समाजवादी समाजाच्या निर्मितीबाबत विचारवंतात मतभेद आहेत. समाजवादाचा मुख्य उद्देश उत्पादनाची फळे सर्व समाजाला मिळावीत आणि जास्तीत जास्त लोकांचे हित साधले जावे हा उद्देश पूर्ण करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा याबाबतीत समाजवादी विचारवंतात मतभेद आहेत. या मतभेदातून समाजवादात दोन पंथ निर्माण झाले आहेत. क्रांतिवादी पंथ आणि दुसरा उत्क्रांतिवादी पंथ होय. क्रांतिवादी पंथ भांडवलशाही नष्ट करण्यासाठी संप, घेराव, हिंसक मार्गाला मान्यता देतात तर उत्क्रांतिवादी पंथ सनदशीर व शांततेच्या मार्गाने समाजवाद निर्मितीचे समर्थन करतो.प्रत्येक देशाने सोय व गरजेनुसार समाजवाद शब्दाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे समाजवादाची अवस्था रंग बदलणाऱ्या सरडयाप्रमाणे आहे. प्रा.सी.एम. जोड. च्या मते, "समाजवाद म्हणजे वापरून वापरून गुळगुळीत बनलेली किंवा आकार नसलेली टोपी आहे." समाजवाद ही जागतिक चळवळ असून तिचा संबंध अर्थकारणांशी आहे.

**समाजवादाची व्याख्या /अर्थ**

समाजवाद हा शब्द इंग्रजीतील Socialism या शब्दाचे मराठी भाषांतर आहे. Socialism हा शब्द Socious या लॅटीन शब्दापासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ समाज असा होतो. समाजवाद शब्दाचा शब्दशः अर्थ समाजाच्या हिताचा विचार करणारा वाद होय. पुढील काही विचारवंतानी समाजवादाच व्याख्या केल्या आहेत.

**१) बर्न**:- समाजवाद म्हणजे समाजहितासाठी प्रमुख उत्पादन व विनिमय साधने यांची खाजगी मालकी नष्ट करणे व त्यावर सामुदायिक नियंत्रण प्रस्थापित करणे होय.

**२) एलिटर :-** समाजवाद म्हणजे उत्पादन व वितरणची साधने समाजाचा मालकीची व्हावी आणि प्रत्येक व्यक्तीला गुणांची जोपासना करण्याची संधी दिली जावी. त्यासाठी संपत्तीचे न्याय वितरण करावे.

**लोकशाही व समाजवाद यांच्या समन्वय संयोग**

समाजवादाची संकल्पनेची व्याख्या करणे सोपी गोष्ट नाही. समाजवाद ही आकार नसलेल्या टोपी सारखी संकल्पना आहे. समाजवाद भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या पिळवणुकीतून निर्माण झालेला आहे. त्याचा उदय युरोप व ब्रिटनमध्ये झाला आहे. कामगार वर्गाने संघटित होऊन भांडवलदाराशी संघर्ष केल्याशिवाय शोषण नष्ट होणार नाही. भांडवलशाही नष्ट करून सर्व उत्पादनाची साधने व इतर संपत्ती समाजाची मालकीची केली पाहिजे. खाजगी मालमत्ता हक्क नष्ट करून सर्व खाजगी संपत्ती समाजाने ताब्यात ध्यावी. हे सर्व परिवर्तने क्रंातीशिवाय शक्य नाहीत. समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी काही विचारवंत क्रांतीची आवश्यकता सांगतात. पण आधुनिक काळात शांततेच्या मार्गाने समाजवादी समाजरचना निर्माण करता असा दावा काही विचारवंतांनी केलेला आहे. मात्र त्यासाठी समाजवादाला लोकशाहीची जोड देणे आवश्यक आहे.

समाजवाद व लोकशाही यातील काही तत्वे व बाह्यता एकमेकांच्या विरोधी दिसून येतात. समाजवाद व्यक्ती स्वातंत्र्याला महत्व देत नाही तर लोकशाही व्यक्ती स्वातंत्र्याला महत्व देते. लोकशाहीत खाजगी मालमत्तेचा हक्क दिला जातो तर समाजवाद खाजगी मालमत्ता नष्ट करण्याचा विचार मांडतात. लोकशाही आणि समाजवाद या दोन्ही

विचारसरणीमध्ये काही तत्त्व परस्परविरोधी असली तरी त्यात समन्वय निर्मितीचा प्रयत्न आधुनिक काळात वेगाने सुरू आहे. ब्रिटन, भारत, इतर अनेक देशात लोकशाही व समाजवाद तत्त्वांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकशाहीतील स्वातंत्र्य व समाजवादातील समता या परस्परविरोधी तत्त्वामध्ये लोकशाही समाजवादाच्या माध्यमातून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे लोकशाही समाजवाद दूहेरी निष्ठा व्यक्त करणारे तत्वज्ञान आहे .

लोकशाहीत स्वातंत्र्य संकल्पनेला महत्त्व दिले जात असले तरी कोणत्याही देशात अनिर्बंध स्वातंत्र्य दिले जात नाही. १००% स्वातंत्र्य देणे लोकशाहीत ही शक्य नाही. समाजहितासाठी स्वातंत्र्यावर योग्य बंधने वा मर्यादा लादलेल्या असतात. लोकशाही समाजवादातही कोणत्याही व्यक्तीला अमर्याद स्वातंत्र्य दिल जात नाही. समाजाचा घटक या नात्याने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर समाजहितासाठी काही बंधने टाकली जाते. याचा अर्थ स्वातंत्र्य देण्यासही काही मर्यादा दिसतात. सर्व व्यक्ती जन्मत: समान आहेत. या तत्त्वांच्या आधारावर समाजवादात समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र व्यक्तीमधील नैसर्गिक विषमता नष्ट करता येत नाही. म्हणजेच समता प्रस्थापित करताना समतेवर मर्यादा येतात. १००% समता निर्माण करणे शक्य होत नाही. स्वातंत्र्य आणि समता प्रस्थापित करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन लोकशाही समाजवादात समता व स्वांतत्र्य  या तत्त्वात समन्वय साधला जातो. लोकशाही समाजवादाचा क्रांतीवर विश्वास नाही. शांततेच्या मार्गाने घटनात्मक मार्गाने समाजवाद निर्माण केला जातो. भारत अमेरिका इ. देशांनी समाजवादाचा प्रखर मार्गाचा अवलंब  न करता शांततेच्या मार्गाने समाजवाद निर्माण केला. त्यात लोकशाहीतील चांगली तत्वे  व समाजवादातील चांगली तत्वे यांच्यात समन्वय करून लोकशाही समाजवाद निर्मितीचा आधुनिक काळात अनेक देशात झालेला दिसतो.

**प्रश्न २ रा लोकशाही समाजवादाची मुलतत्वे वा वैशिष्टे स्पष्ट करा?**

इंग्लंडमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर लोकशाही समाजवाद हा नवीन समाजवादाचा प्रकार उदयाला आला. या प्रकारात लोकशाहीतील चांगली तत्वे व समाजवादाची तत्वे याचा समन्वय आहे. लोकशाही समाजवादाची तत्वे व वैशिष्टये निश्चित करण्यात आली असली तरी त्यांची निश्चित व्याख्या करता येत नाही. कारण लोकशाहीच्या अनेक व्याख्या आहेत. समाजवादाच्या देखील अनेक व्याख्या आहेत. तसेच लोकशाही समाजवाद विचार परिस्थितीप्रमाणे बदलणारा असल्यामुळे निश्चित व्याख्या करता येत नाही.

**लोकशाही समाजवादाचा विकास-**

औद्योगिक क्रांतीतून भांडवलशाहीचा उदय झाला. भांडवलशाहीत कामगाराचे शोषण व पिळवणूकीस उत्पादक वर्ग जबाबदार होता. कामगाराचे शोषण व पिळवणुकीपासून मुक्त करण्यासाठी कार्ल मार्क्सने शास्त्रीय समाजवादाची मांडणी केली. कामगारांची त्यांच्यावर होणाऱ्या शोषणाविरूद्ध क्रांती केल्याशिवाय भांडवलशाही नष्ट होणार नाही. त्यासाठी मार्क्स कामगारांना एकत्र येऊन क्रांतीचे आवाहन करतो. परंतु मार्क्सचे क्रांतीकारी विचार इंग्लडला भूमीत रूजणारे नव्हते.कारण इंग्लडमध्ये संसदीय लोकशाहीच्या वातावरणात कामगारांनी क्रांती करण्याऐवजी शांततामय व सनदशीर मार्गानी कामगारांनी आपले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केले. रॉबर्ट ओवेन हा इंग्लंड मधील लोकशाही समाजवादाचा जनक मानला जातो. त्याने कामगाराच्या सहकार्यावर आधारीत सहकारी तत्त्वांवर नवीन समाजरचना निर्माण करावी हे मत मांडले. ओवेनने एक आदर्श समाजाचे चित्र रेखाटले. ते चित्र प्रत्यक्षात आणण्यासाठी एक प्रयोग केला. या प्रयोगासाठी न्यू लॅनार्क नावाची वसाहत निवडली. या वसाहतीत कामगारांना आदर्श जीवन कसे जगता येईल यासाठी त्याने प्रयोग केला.त्यानंतर आर.एच.टोनी, जी.डी.एच.कोल, बर्नाड शॉ, सिडने बेब, प्रा.हेरॉल्ड लास्की इ.विचारवंतानी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला. या विचारंवताचा प्रभावाने निर्माण झालेल्या मजूर पक्षाने त्यांच्या धोरणात्मक कार्यक्रमात लोकशाही समाजवादाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. या अंमलबजावणीला ब्रिटिश जनतेने पाठिंबा दिल्यामुळे ही विचारसरणी लोकप्रिय झाली. इंग्लंडमध्ये लोकशाही समाजवादाच्या यशाने प्रभावित होऊन इंग्लंडच्या वसाहती असलेल्या भारत ,अमेरिका व कॅनडा या देशानी ही विचारसरणी स्वीकारली. क्रांतीचा मार्गाऐवजी सनदशीर मार्गाने समाजवाद निर्माण होऊ शकतो. हे बहुसंख्य देशांना पटल्यामुळे आधुनिक काळात अनेक देशानी लोकशाही समाजवाद स्वीकारला.

**लोकशाही समाजवादाची मूलतत्व वा वैशिष्टये-**

१. **स्वार्थी व्यक्तिवादाला विरोध-** प्रत्येक व्यक्तीला आपले हित कळत असते हे हित साध्य करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असावे यातून तो स्वतःचे कल्याण साधू शकतो हा लोकशाही विचार आहे. पण व्यक्तीचे स्वातंत्र्य समाजहिताला मारक ठरू शकते. समाजात बलवान व दूर्बल हे दोन्ही घटक असतात. मुक्त वातावरणात बलवान गट श्रीमंत होतात तर दूर्बल घटक गरिब होतात. स्वातंत्र्यामुळे विषमता निर्माण होते .म्हणून लोकशाही समाजवाद स्वार्थी व्यक्तीवादाचा विरोधात आहे.

२. **भांडवलशाहीला विरोध -** भांडवलशाही मुक्त स्पर्धवर आधारलेली असते. भांडवलदार मुक्त बाजारपेठाचा वापर करून जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न करतात. नफा कमी होऊ नये म्हणून कामगांराना कमीत कमी वेतन देतात. परिणामतः समाजातील मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होते. भांडवलशाहीतून आर्थिक विषमता निर्माण होते म्हणून लोकशाही समाजवाद भांडवलशाहीला विरोध करतो. लोकशाही समाजवाद्यांना भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट करणे आवश्यक वाटते. परंतु हिंसक व क्रांतीकारक मार्गाने नष्ट करणे मान्य नव्हते. सनदशीर मार्गाने भांडवलशाहीची सत्ता व वर्चस्व कमी केली पाहिजे. श्रीमतांवर वाजवी कर, राष्ट्रीयकरण, कामगारांना सुविधा इत्यादी मार्गाने भांडवलशाही नष्ट करता येईल.

३. **खाजगी उत्पादन क्षेत्रावर नियंत्रण -** लोकशाहीत खाजगी उत्पादनाला मान्यता दिली जाते. खाजगी उद्योग नफा कमावण्यासाठी कामगारांची पिळवणूक करतात. हे टाळण्यासाठी लोकशाही समाजावादात खाजगी उत्पादन क्षेत्रावर नियंत्रण ठेवले जाते. कोणती वस्तू तयार करावी, वस्तूची किंमत किती असावी, वस्तू विक्री कोठे करावी यावर सरकारचे नियंत्रण असते. महत्त्वपूर्ण क्षेत्रात सरकारी उद्योगाकडून उत्पादन केले जाते. किरकोळ वस्तू निर्मितीचा अधिकार खाजगी क्षेत्राला दिला जातो. म्हणजेच मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला जातो. संपूर्ण राष्ट्रीयकरणाऐवजी मर्यादित प्रमाणात राष्ट्रीयकरणाला मान्यता दिली जाते. सरकारी उद्योगासोबत खाजगी उद्योगाचे अस्तित्व कायम ठेवले जाते. मात्र त्यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते.

४. **अनिर्बंध आर्थिक स्पर्धेला विरोध-** भांडवलशाही व्यवस्थेत आर्थिक क्षेत्रात अनिर्बंध स्पर्धा असते. या स्पर्धेतून श्रम व संपत्तीचा उपव्यय होता. योग्य आणि आवश्यक वस्तूंच्या उत्पादन होत नाही. श्रमिकांला उत्पादन आणि नफा मिळविण्याचे साधन मानले जाते. समाजाची गरज लक्षात न घेता नफा देणारे उत्पादन केले जाते. उदा. समाजाला अन्नाची गरज असतांना चित्रमंदिरे उघडली जातात. लोकशाही समाजवादाचा उद्देश अनिर्बंध स्पर्धा नष्ट करून त्याजागी सहकार्यावर आधारित उत्पादने सुरू करणे असतो. उत्पादनाचे कार्य न्याय मार्गाने होण्यासाठी राज्याने प्रयत्न करावा. त्यामुळे राज्य ही आपत्ती नसून अनिष्ट स्पर्धा नष्ट करण्याचे एक साधन मानले जाते. वस्तूंचे उत्पादन किती असावे, किंमत किती असावी यावर राज्याचे नियंत्रण असते. लोकांच्या गरजा लक्षात वस्तूंचे उत्पादन आणि वितरण राज्याने करावे त्यातून अनिर्बंध स्पर्धेला लगाम लावता येईल असे लोकशाही समाजवादी विचारवंताचे मत आहे.

५. **समतेचा पुरस्कार-** लोकशाही स्वातंत्र्यावर जास्त भर देते. अमर्याद स्वातंत्र्यामुळे समाजातील मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होते. समाजातील इतर व्यक्तींना प्राथमिक गरजा देखील पूर्ण करता येत नाही. म्हणून लोकशाही समाजवाद स्वातंत्र्याबरोबर समतेला ही महत्त्व देतो. समता देखील पूर्णपणे निर्माण करता येत नाही. नैसर्गिक विषमता नष्ट करणे कोणालाही शक्य नाही. त्यामुळे लोकशाही समाजवाद मानवनिर्मित विषमता नष्ट करून समता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

६. **मूलभूत हक्कांचे रक्षण-** लोकशाही समाजवादात समतेला महत्त्व असले तरी स्वातंत्र्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात नाही. व्यक्तीविकासासाठी प्रत्येकाला स्वातंत्र्य दिलेले असते. त्यासाठी लोकशाही समाजवादी देशाच्या घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश केलेला असतो. हक्क संरक्षणाची जबाबदारी न्यायालयाकडे दिलेली असते. हक्कावर कुणीही आक्रमण वा उल्लंघन केल्यास न्यायालयात दाद मागता येते.

**७. लोकशाहीचा पाया व्यापक-** लोकशाही समाजवाद स्वातंत्र्य,समता यांचा योग्य समन्वय असल्याने लोकशाहीचा पाया व्यापक बनतो. आर्थिक विषमता कमी झाल्यामुळे अधिक लोक राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात. त्यामुळे लोकशाहीचे स्वरूप केवळ राजकीय न ठरता इतर क्षेत्रातही लोकशाही निर्माण होऊ शकते.

**८. वर्गसंघर्षाऐवजी वर्ग सहकार्य-** मार्क्सवादातील वर्ग संघर्षाची कल्पना लोकशाही समाजवादाला मान्य नाही. ते वर्गसंघर्षाऐवजी वर्ग समन्वय व सहकार्यावर जास्त भर देतात. समाजातील सर्व वर्गांनी परस्परांना सहकार्य करून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणावी आणि त्या वाढीव राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय वितरण समाजात करावे. ना नफा ना तोटा या तत्वावर उत्पादन करावे.त यासाठी उत्पादन प्रक्रियेवर समाजाचे नियंत्रण असावे.

**९. कल्याणकारी राज्याची संकल्पना-** मार्क्सवादाचा राज्य हे कामगार वर्गाचे शोषण करण्याचे भांडवलदाराच्या हातातील साधन आहे. त्यामुळे ते क्रांतीनंतर राज्य नष्ट करावे ही भूमिका घेतात. लोकशाही समाजवादांना ही भूमिका मान्य नाही. त्यांच्यामते राज्य हे लोककल्याणकारी आणि समाजाची सेवा करणारी संस्था आहे. त्यामुळे राज्य नष्ट करणे अशक्य आहे. त्याऐवजी राज्य कल्याणकारी मार्ग वापरून जनतेचे कल्याण घडवून आणावे.

**१०. आर्थिक नियोजनाचा स्वीकार-** राष्ट्राच्या प्रगतीसाठी लोकशाही समाजवादात आर्थिक नियोजनाचा स्वीकार धोरण स्वीकारले जाते. आर्थिक नियोजन विशिष्ट हेतूने केलेले असते. समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी. लोकांचे राहणीमान उंचावणे, बेकारीचे प्रमाण कमी करणे, आर्थिक विषमता कमी करणे हा हेतू अपेक्षित करतो. लोकशाही समाजवादात नियोजनाचे उद्दिष्ट सर्वांना समान न्याय व संधी, समता प्रस्थापना हे असते.

अशा प्रकारे लोकशाही समाजवादाची तत्त्वे ही समाजवादापेक्षा भिन्न आहेत.

**प्रश्न ३ रा लोकशाही समाजवादाचे गुण दोष स्पष्ट करा?**

**किंवा**

**लोकशाही समाजवादाचे टिकात्मक परीक्षण करा?**

लोकशाही समाजवादात राष्ट्र व व्यक्ती यांचे स्वातंत्र्य आणि विकास यांना महत्त्व दिले आहे. लोकशाही विचारसरणीला अभिप्रेत असलेली शांततामय सनदशीर आणि जनसमर्थनाच्या मार्गाने समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुत्व या मूल्यांची स्थापना करणारा लोकशाही समाजवाद हा विचार अल्पकाळात लोकप्रिय झाला. हे या विचारांच्या गुणदोषावरून लक्षात येते.

**लोकशाही समाजवादाचे गुणः-** लोकशाही समाजवाद विचारसरणी दुसऱ्या महायुद्धानंतर लोकप्रिय झाली. कारण त्या विचारसरणीत पुढील गुण दिसून असतात.

**१)व्यक्ती स्वातंत्र्याचा विचार :-**

लोकशाही समाजवादात शोषण विरहीत समाज निर्माण करून भांडवलशाही नष्ट करावयाची आहे. त्यासाठी प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले पहिजे. समाजाचे अहित होणार नाही इतक्या प्रमाणात स्वातंत्र्य दयावे. म्हणजेच लोकशाहीच्या चौकटीत समाजवाद निर्माण करावा. लोकशाही समाजवाद मानवी व्यक्तिमत्त्वास प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी विचारसरणी आहे.

**२) समाजहिताला प्राधान्यः-**

व्यक्ती ही एकटी जीवन जगत नसून समाजाचा घटक म्हणून जीवन जगत असते. त्यामुळे व्यक्ती जीवनाला अर्थ प्राप्त होतो. व्यक्ती हितापेक्षा समाज मोठा असून समाज हितातच व्यक्ती हित सामावलेले असते. म्हणून लोकशाही समाजवाद समाज हिताला प्राधान्य देतात. प्रत्येक व्यक्तीच्या हितापेक्षा समाजहितास प्राधान्य दिले पाहिजे. कारण त्यातून प्रत्येक व्यक्ती शोषण मुक्त होऊ शकेल व आपल्या केलेल्या श्रमाचे योग्य फळ प्राप्त करू शकेल. सामाजिक न्याय प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने लोकशाही समाजवादात समाजहिताला महत्त्व दिले जाते.

**३)समतेचा प्राधान्यः-**

समता म्हणजे समान संधी किंवा एकाच पातळीवर सर्व नागरीकांना आणता आले नाही तरी निसर्ग निर्मित विषमता नष्ट करणे. म्हणून लोकशाही समाजवादात समतेला महत्व दिले जाते.

**४) साधनांची नैतिकताः-**

लोकशाही समाजवादाचा अहिंसा व शांततामय मार्गावर विश्वास आहे. ध्येय गाठण्यासाठी वापरली जाणारी साधने शुद्ध व योग्य असली पाहिजे. म्हणून लोकशाही समाजवादी साध्य व साधने शुद्ध असावीत यांचा पुरस्कार करतात. त्यामुळे ते क्रांती व हिंसात्मक मार्गावर विश्वास ठेवत नाही. ते शांततामय मार्गाला प्राधान्य देतात. उच्च आणि उदात्त ध्येयाच्या प्राप्तीसाठी साधनेदेखील तितकीच शुद्ध असावीत ही नैतिक भूमिका लोकशाही समाजवादात स्वीकारली जातात.

**५) स्वातंत्र्य व समता समन्वय**:-

लोकशाही समाजवादात स्वातंत्र्य व समता परस्परविरोधी तत्त्वांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. कारण अतिस्वातंत्र्यामुळे समता धोक्यात येते. तर १००% समता निर्माण करणे शक्य नाही. म्हणून मर्यादित स्वातंत्र्य व मर्यादित समतेचा पुरस्कार लोकशाही समाजवादात केला जातो.

**लोकशाहीचे समाजवादाचे दोषः-** लोकशाही समाजवाद विचारसरणीत काही गुण असले तरी त्या विचारसरणीत अनेक दोष आहेत त्यांचा देखील विचार होणे आवश्यक आहे. त्याशिवाय लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन होऊ शकत नाही.

**१) हुकूमशाही व्यवस्थेकडे वाटचालः-** लोकशाही समाजवादात व्यक्तीहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले जाते. त्यासाठी स्वातंत्र्यावर बंधने लादण्यात येतात. समाजकल्याणाच्या नावाखाली शासन संस्थेत सत्तेचे केंद्रीकरण होऊन सत्ता समाजातील विशिष्ट गटाकडे जाते व हे गट शक्य तितकी सत्ता वाढविण्याचा प्रयत्न करतात. या गोष्टीमुळे लोकशाहीवर मर्यादा येतात आणि लोकशाहीची हुकूमशाहीच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

**२) कामगार चळवळी**:- लोकशाहीत नागरिक संघटना स्वातंत्र्याचा उपयोग करून वेगवेगळया संघटना निर्माण करतात. त्याच प्रमाणे औद्योगिक क्षेत्रात कामगार संघटना निर्माण होतात. त्यांचे नेतृत्व राजकीय पक्षाकडे असते. नेतृत्वावरून संघटनेत संघर्ष होतात. कामगार संघटनेत सत्ता स्पर्धा ही कामगारांना भडकविणे, संप, कामबंद आंदोलन, टाळेबंदी इ.मार्गाचा अवलंब करतात. त्यामुळे कारखानदाराशी संघर्ष होऊन कारखाने बंद पडतात. औद्योगिक क्षेत्रात अशांतता निर्माण होऊन उत्पादन कमी होते.

**३) लाचलुचपत व भ्रष्टाचार**:- लोकशाही समाजवादाच्या तत्त्वांनुसार उत्पादन साधनाचे राष्ट्रीयकरण केले जाते. खाजगी उद्योग सार्वजनिक क्षेत्रात समाविष्ट केले जातात. या उद्योगावर राजकीय नेत्यांचे वर्चस्व निर्माण होते. त्यांना अर्थकारणाचे ज्ञान नसल्याने सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचार निर्माण होतो व उत्पादन कमी होते.

**४) ग्राहकाचा तोटाः-** उत्पादनाच्या सार्वजनिक क्षेत्रात कमी कार्यक्षमता हा दोष निर्माण होतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो. पर्यायाने वस्तूची किंमती वाढतात. त्यामुळे ग्राहकांचे नुकसान होते. मक्तेदारीमुळे सर्व वस्तूचे भाव सारखे असतात. याउलट भांडवलशाहीत स्पर्धेचे वातावरण असल्याने ग्राहकाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन वस्तूचे उत्पादन केले जाते.तसेच स्पर्धेमुळे कमीत कमी किंमतीत वस्तू विकली जाते.

**५)भौतिक तत्वज्ञानः-**

समाजवाद हा मूलतः भौतिक स्वरूपाचा विचार आहे. वस्तुचे उत्पादन, विनिमय, वितरण इ. अर्थशास्त्रीय गोष्टी त्यात समाविष्ट आहेत. त्यांच्या संबंध लोकशाहीची जोडल्यामुळे त्यांचे महत्व कमी होते अशी टीका केली जाते.

लोकशाही समाजवादावर टीका होत असली तरी एकेकाळी या विचारसरणीने संपूर्ण जगाला प्रभावित केलेले होते.

**प्र.४ था. श्रमिक संघवाद म्हणजे काय ते सांगुन श्रमिक संघवादाचे मुलतत्त्वे किंवा वैशिष्टे सांगा?**

फ्रान्समधील समाजवादी चळवळीला मिळालेल्या वैशिष्टय पूर्ण स्वरूपातून श्रमिक संघवाद ही समाजवादी विचारसरणी अस्तित्वात आली. जार्ज सोरेल आणि पेल्यूटर फ्रेंच विचारवंतानी ही विचारसरणी मांडली. या विचारवंतावर मार्क्सच्या विचाराचा प्रभाव होता. फ्रान्समधील कामगारवर्गांना ज्या परिस्थितीत राहावे लागते असे त्या परिस्थितीतून ज्या क्रांतिकारक विचारांना चालना मिळाली. त्यातून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रेंच मध्ये श्रमिक संघवादाचा जन्म झाला. त्यानंतर इटली व जगातील इतर देशात श्रमिक संघवादाचा प्रसार झाला. १९३० पर्यंत ही विचारसरणी प्रभावी होती. पहिल्या महायुद्धकाळात या विचारसरणीत जहाल व मवाळ असे दोन गट पडले. जहाल क्रांतीकारी अराजकवादी मार्गाचा पुरस्कार करतात तर मवाळ गट मर्यादित अधिकार व सत्ता असलेल्या राज्याचे समर्थन करतात. सहकार, सार्वत्रिक संप यासारख्या सनदशीर मार्गाचे समर्थन करतात. त्यातून १९२२ मध्ये नवश्रमिकसंघवाद विचारसरणी निर्माण झाली.

**श्रमिक संघवादाचा अर्थ व व्याख्या-**

श्रमिक संघवादाला syndicalism असे म्हणतात. हा शब्द syndicate किंवा Syndica या फ्रेंच शब्दापासून तयार झालेला आहे. त्याचा अर्थ मजूर किंवा श्रमिक संघ असा होतो.

१. **F.W. कोकर-** " यांच्या मते श्रमिक संघवाद म्हणजे ज्या परिस्थितीत श्रमिक काम करतात. त्या परिस्थितीवर श्रमिकांचे नियत्रंण असावे. संपूर्ण आर्थिक व्यवस्था श्रमिकांच्या ताब्यात व नियंत्रणाखाली असावी."

२. **सी.इ.एम.जोड-** यांच्या मते श्रमिक संघवाद म्हणजे श्रमिक संघटनाच्या द्वारे नवा समाज निर्माण करू पाहणारा आणि श्रमिक संघटनाना या नवसमाजाचा एकदम मूलभूत पाया समजणारा सामाजिक सिद्धांत आहे.

वरील व्याख्याचा विचार करता श्रमिक संघवादी समाजवादी विचारसरणीचे विकसित स्वरूप आहे. ही विचारसरणी कामगार हिताला प्राधान्य देतात. कामगांराच्या विशेष हक्क, गरजांची पूर्तता आणि ते ज्या परिस्थितीत काम करतात त्यावर त्यांचे नियंत्रणास श्रमिक संघवादी महत्त्व देतात.

**श्रमिक संघवादाची मूलतत्त्वे:-** सोरेल व पेल्यूटर यांनी श्रमिक संघवादाचे पुढील मुलतत्त्वे सांगितली आहेत.

**१. व्यापक उद्दिष्टये:-**

श्रमिकांनी केवळ वेतन व काम करण्याची सुधारलेली परिस्थिती प्राप्त करणे हे मर्यादित उद्दिष्टये न ठेवता. समाजातील संपूर्ण अर्थव्यवस्था आपल्या ताब्यात ठेवणे हे व्यापक उद्दिष्टये ठेवले पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी श्रमिकांनी कोणत्याही दडपणाला बळी पडू नये आपली एकजूट कायम ठेवावी.

**२. अभेद संघटना:-**

श्रमिकांनी आपल्या व्यवसायातील भेदाकडे दूर्लक्ष करून फक्त श्रमिक म्हणून आपली बळकट संघटना उभारली पाहिजे. इतर राजकीय चळवळीपासून अलिप्त राहून श्रमिक म्हणून आपला लढा चालविला पाहीजे. संघटनेचे नेतृत्व मध्यमवर्गीयाकडे देऊ नये. कारण ते तडजोडवादी व मवाळवादी असतात. त्यांना कामगारांचे प्रश्न समजत नाही. त्यामुळे कामगार हाच श्रमिक संघटनेचा नेता असावा.

**३. संघटना हे शस्त्र व अस्त्र:-**

श्रमिकांनी संघटना उभारली व कार्यक्रम आखतांना दूहेरी उद्देश ठेवला पाहिजे. संघटना हे भांडवलशाही नष्ट करण्याचे शस्त्र आणि नवसमाज निर्मितीचे अस्त्र म्हणून वापरले पाहिजे. म्हणून श्रमिकांनी लढण्यासाठी सतत तयार राहिले पाहिजे.

**४. कायमचा लढा:-**

श्रमिकांनी भांडवलदाराशी कोणतीही तडजोड न करता नफेखोरी विरूद्ध लढा चालविला पाहिजे जोपर्यंत भांडवलशाही ही नष्ट होत नाही तोपर्यंत कायमस्वरुपी लढा चालू ठेवावा. समाजात श्रमिकांना महत्त्व मिळत नाही तोपर्यंत लढा चालू राहिल.

**५. प्रत्यक्ष कृतीचे मार्ग:-**

श्रमिकांनी आपल्या लढयामध्ये प्रत्यक्ष कृती मार्गाचा अवलंब करावा. त्याकरीता सार्वत्रिक संप, बहिष्कार व सावकाश काम करून मालकाचे नुकसान करावे. कामाची वेळ फुकट घालावी. वस्तुबाबत ग्राहकांनी असंतुष्ट राहावे म्हणून वस्तूत दोष ठेवावे वस्तूतील दोष ग्राहकांच्या नजरेत आणून दयावेत. कारखाने बंद पाडणे, घातपात, बहिष्कार, निरोधन, सर्वव्यापी संघ या जहालवादी मार्ग वापरण्यास श्रमिक संघवादाची काहीही हरकत नाही. या प्रत्यक्ष मार्गाचा अवलंब करून कारखानदारांचे नुकसान करावे. त्यामुळे श्रमिकांच्या शक्तीत वाढ होईल. भांडवलशाहीला धक्के देऊन ती कमकुवत करावी. या मार्गातून भांडवलशाही यंत्रणेवर दडपण आणले जाईल आणि त्यातून श्रमिकांचे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित करता येईल.

**६. राज्याचा विरोध:-**

श्रमिक संघवादाचा लढा हा केवळ खाजगी मालमत्ता नष्ट करणे किंवा भांडवलशाही नष्ट करणे यापुरता मर्यादित नाही. भांडवलशाही आणि खाजगी संपत्तीचा पाठपुरावा करणारी राज्यसंस्था नष्ट करणे हा हेतू असला पाहिले.राज्यसंस्था भांडवलदारांच्या हातातील खेळणे आहे. भांडवलदारांचे राज्यकर्त्यावर्गाशी मैत्रीचे संबंध असल्यामुळे राज्या मार्फत श्रमिकांना न्याय मिळण्याची शक्यता खूप कमी आहे. उलट राज्याकडून श्रमिकांचे पिळवणूक व शोषण होण्याची जास्त शक्यता आहे. म्हणून श्रमिकांनी क्रांतीकारक मार्गाचा अवलंब करून राज्याची सत्ता आपल्या ताब्यात ध्यावीत. त्यामुळे त्यांच्यावरील अन्याय अत्याचार कमी होईल.

**७. लोकशाहीचा विरोध:-**

श्रमिक संघवादी लोकशाहीला विरोध करतात. कारण लोकशाही शासन प्रणाली राजकीय पक्ष चालवितात. राजकीय पक्ष हे अनैसर्गिक गट आहे. ते निवडणुका लढवण्यासाठी भांडवलदारांकडून देणग्या घेतात. त्यामुळे सत्तेवर आल्यानंतर भांडवलदाराचा फायदेशीर होईल असे वर्तन व कायदे करतात. म्हणून श्रमिक संघवादाच्या मते लोकशाही नष्ट केल्याशिवाय कामगारांना नव समाजाची निर्मिती करता येणार नाही.

अशा प्रकारे श्रमिक संघवादात सात मूलतत्त्वे सांगितली आहेत. मात्र या मूलतत्त्वांवर कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. त्यांचा शांततेचा मार्गावर विश्वास नाही ते परिवर्तन क्रांतीच्या मार्गाने करू पाहतात. क्रांतीमुळे समाजात अराजकता निर्माण होऊ शकते. या विचारसरणीने उपभोक्त्यांचा विचार केला नाही. तसेच राष्ट्रप्रेम, देशभक्ती इत्यादी संकल्पनांना ही विचारसरणी महत्त्व देत नाही.श्रमिक संघवादी लोकशाही व राज्य दोन्ही नष्ट करून नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र नवसमाज कसा असेल या बाबत काहीही मार्गदर्शन करत नाही इ. ठळक दोष श्रमिक संघवादात दिसतात.

**प्र.५ वा. फेबियन समाजवाद म्हणजे काय ते सांगुन फेबियन समाजवादाची मुलतत्त्वे व वैशिष्टे स्पष्ट करा?**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे जे आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम झाले ते कसे टाळता येतील याचा विचार करण्यासाठी १८८२ मध्ये फेबियन सोसायटीची स्थापना झाली. त्या सोसायटीत सिडनी वेब, एच.जी वेल्स, बर्नाड शॉं, प्रा. लास्की, जी. डी. एच. कोल इ. समावेश होता. इंग्लंडमध्ये उदयोग क्षेत्रात मंदीच्या अनुकूल परिस्थितीत विशिष्ट वर्गाच्या ताब्यातील उत्पादन साधने समाजाच्या मालकीची करण्यास योग्य काळ आहे असे फेबियनवाद्यांना वाटते. कार्ल मार्क्स ध्येय धोरणावर फेबियन वादाचा विश्वास होतो. पण त्यांचा क्रांतीकारक मार्ग त्यांना मान्य नव्हता. म्हणून ते समाजवादी असले तरी मार्क्सवादी नव्हते. त्यांनी आपल्या विचारसरणीच्या समर्थनार्थ समाजवादी सुधारणा ऐतिहासिक परिस्थितीच्या संदर्भात करणे आवश्यक आहे. त्यांना श्रमिक संघवादातील प्रत्यक्ष कृती मार्गावर यांच्या विश्वास नव्हता. ते शांततेच्या माध्यमातून समाजवाद निर्माण करण्याच्या प्रयत्न करणारे होते.

**फेबियन समाजवादाची मुलतत्त्वे/वैशिष्टये-**

**१. लोकशाही समाजवादावर विश्वास: -** फेबियन समाजवादी लोकशाही आणि समाजवाद दोन्ही तत्त्वांना महत्व देणारे आहेत. ते लोकशाहीच्या चौकटीत समाजवाद निर्माण करण्याच्या प्रयत्न करतात. व्यक्तीची कोणत्याही प्रकारची

गुलामगिरी त्यांना मान्य नाही. गुलामगिरीमुळे व्यक्ती विकास होऊ शकत नाही. व्यक्तीची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आर्थिक समता निर्माण करावी.

**२. संपत्तीच्या केंद्रिकरणला विरोधः-** भांडवलशाहीतील पिळवणूक व शोषणामुळे फेबियन समाजवादी भांडवलशाहीला विरोध करतात. भांडवलशाहीमध्ये संपत्तीचे केंद्रीकरण विशिष्ट व्यक्तीच्या हाती एकवटलेले असते. भांडवलदार नफा व भूमीवरील खंड यांच्या माध्यमातून संपत्तीचे केंद्रीकरण करतात. हे टाळण्यासाठी कारखाने व जमिनीची मालकी खाजगी व्यक्तीऐवजी समाजाकडे दिल्यास संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही. मार्क्सप्रमाणे भांडवलशाहीचा एकदम नायनाट न करता हळूहळू व सनदशीर मार्गाने सुधारणा कराव्यात हे मत व्यक्त करतात.

**३. उदयोगधंदयाचे राष्ट्रीयकरणः-** भांडवलशाहीत मूठभर लोकांच्या हातात कारखानाचे नियंत्रण असल्यामुळे वस्तुच्या उत्पादनातून प्रमाणा पेक्षा जास्त नफा मिळण्याची संधी त्यांना प्राप्त होते. नफेखोरीला आळा घालण्यासाठी सर्व उदयोगांचे राष्ट्रीयकरण करून सरकारचा मालकीचे करावे. राष्ट्रीयकरण व सामाजिक नियंत्रणे ही धोरणे क्रमाक्रमाने अंमलात आणावी. समाज व सरकार ह्यांच्या अंगी राष्ट्रीयकृत उद्योग चालविण्याची पात्रता व कार्यक्षमता आल्याशिवाय राष्ट्रीयकरण करणे योग्य ठरणार नाही. ज्या भांडवलदाराकडील उद्योगाचे राष्ट्रीयकरण करतांना त्यांना काही प्रमाणात नुकसान भरपाई दिली पाहिजे असे फेबियनवादाचे मत आहे.

**४. श्रमिकांचे कल्याणः-** उदयोगधंदयाची मालकी समाजाकडे आल्यास नफा व जमिनीवरील खंड राज्याच्या तिजोरीत जमा होईल. हा वाढीव नफाचा वाढा कामगारांना देण्यासाठी त्याच्या कामगारांचा वेतनात वाढ करता येईल. वेतनवाढीमुळे त्यांच्या राहणीमानात बदल घडवून येईल. सर्व संपत्ती राष्ट्राच्या मालकीची केल्यास सर्वांना समान संधी मिळेल.

**५. समाजवादाचा प्रचारः-** फेबियन समाजवाद हे निवड तत्व न राहता प्रत्यक्ष व्यवहारात निर्माण झाला पाहिजे. फेबियन समाजवाद व्यवहारात निर्माण करण्यासाठी अनुकूल लोकमत तयार केले पाहिजे. लोकमत तयार करण्यासाठी फेबियनवाद्यांनी सर्वत्र प्रचार केला पाहीजे. जनतेत मोठया प्रमाणात चर्चा, प्रचार आणि वस्तुस्थितीची जाणिव करणे आवश्यक आहे. त्यासाठी लहान लहान पुस्तिका प्रकाशित करणे. समाजातील हुशार व्यक्ती, विचारवंत यांच्यावर प्रभाव पाडून त्यांच्यामार्फत सामाजिक जागृती करण्याकडे लक्ष केंद्रीत करावे.

**६. वर्गसंघर्ष अमान्यः-** कार्लमार्क्स या विचारवंताची वर्ग संघर्षाची कल्पना मांडली. ही कल्पना फेबियनवाद्यांना मान्य नाही. त्यांच्या मते भांडवलदार हे फक्त कामगारांची पिळवणूक करत नसून संपूर्ण समाजाची पिळवणूक करतात. त्या समाजात कामगार देखील समाविष्ट होतात. सामाजिक न्यायासाठी उत्पादन साधनाची मालकी राष्ट्राकडे दिल्यास भांडवलदार वर्ग आपोआप नष्ट होईल.

**७. राज्य ही विश्वस्त संस्थाः-** फेबियन समाजवादी राज्य नष्ट करावे हा विचार मांडत नाही. उलट राज्य ही संस्था समाजकल्याण करण्यासाठी निर्माण झाली असून समाजावर नियंत्रण ठेवणारी दंडशक्तीयुक्त सामाजिक विश्वस्त संस्था आहे. म्हणून समाजाने भूमि, भांडवल, उत्पादन साधने राज्याकडे सोपवावी. खरी लोकशाही निर्माण करण्यासाठी राज्याने सत्तेचे विकेंद्रीकरण करून स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्यात यावीत. स्थानिक स्वराज्य संस्थापासून सुरूवात करून लहान लहान योजना आणि कार्यक्रम स्वीकारून लोकशाही मार्गाने सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्याचे ध्येय फेबियनवादी ठेवतात.

**८. साधनशुचिताः-** फेबियन समाजवादी साध्या इतकेच साधनाला महत्त्व देतात. साध्य कितीही श्रेष्ठ असले तरी ते पूर्ण करण्यासाठी वापरली जाणारी साधने देखील शुद्ध वा पवित्र असली पाहिजे. म्हणून ते समाजवाद निर्माण करण्यासाठी शांततामय व सनदशीर मार्गाला महत्व देतात आणि क्रांतीला विरोध करतात.

**फेबियन समाजवादाचे मुल्यमापनः-**

फेबियन समाजवादात अनेक विचार हुशार व आंतरराष्ट्रीय किर्तीची विचारवंत असल्याकारणाने त्यांचा प्रभाव इंग्लडंमध्ये मोठया प्रमाणावर दिसतो. इंग्लडंमध्ये सुशिक्षित व मध्यवर्गियांना फेबियन समाजवादाचे धोरणे उपयुक्त वाटली. त्यांनी आपली विचारसरणी निरनिराळया पक्षातील लोकांना पटवून दिली. पार्लमेंटमध्ये अनेक कायदे मंजूर

केले तसेच मजूर पक्षाच्या निर्मितीवर देखील फेबियनवाद्यांचा प्रभाव पडला. फेबियनवाद्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेपासून समाजवादाची सुरूवात करून नंतर समाजवाद देशभर राबवावा. श्रीमंतीवर जास्त कर बसवावे. शेती व उदयोगधंदयाची मालकी राज्याकडे ठेवावी. कामगारांचे कामाचे तास कमी करावेत. त्यांना जास्त वेतन दयावे इ. व्यापक शिफारशी केलेल्या दिसतात. इंग्लंडमधील कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचे आणि त्यांच्या प्रयत्नामुळे कामगारांची परिस्थिती सुधारणा होण्यास मदत मिळाली.

**फेबियन समाजवादाचे दोषः-**

फेबियन समाजवाद अनेक गुण असले तरी तिच्यातील संकल्पनात्मक दोषामुळे या विचारसरणीवर पुढील टीका केल्या जातात.

१. फेबियन समाजवाद्यांनी मध्यम वर्गियांच्या मनात लोकशाही समाजवादाबद्दल आपलुकी निर्माण केलेली असली तरी कामगार वर्गावर त्यांचा फारसा प्रभाव पडू शकला नाही. कारण कामगारहितापेक्षा सर्व वर्गाच्या हिताला ते महत्त्व देतात.

२. फेबियन समाजवादी हे संधीसाधु आहेत असल्याची टीका केली जाते. ते परिस्थितीनुसार ते आपले विचार बदलतात. त्यांची विचारसरणी व उपाययोजना दोन्हीमध्ये तफावत आहे. एका बाजूला भांडवलशाही व जमिनदारी नष्ट करणे हे उद्दिष्ट ठेवतात तर दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत पाणी पुरवठा, वीजपुरवठा इ. कमी महत्त्वाच्या कार्यक्रमाची मांडणी करतात.

३. फेबियन समाजवाद्यांनी एखादे तत्त्वज्ञान किंवा सिद्धांताची मांडणी केलेली नाही. समाजवाद अंमलात आणताना प्रशासनाकडून अडथळे येतील याचा विचार केलेला नाही. सामाजिक न्याय आणि आर्थिक समता निर्माण करण्यासाठी आवश्यक ते तात्वीक मार्गदर्शन, स्पष्टीकरण व खास कार्यक्रम देत नाही. समाजवादी कार्यक्रम राबविला म्हणजे आपोआप सामाजिक न्याय व आर्थिक समता निर्माण होईल, असे गृहित धरतात परंतु ते योग्य नाही असे टीकाकारांचे मत आहे.

वरील मुद्दे लक्षात घेता फेबियन समाजवाद हा इंग्लंड पुरता मर्यादित राहिला. इंग्लंड मध्ये देखिल फारसे अनुयायी त्यांना मिळाले नाही. ही चळवळ मध्यम वर्ग व बुद्धिवंतापुरती मर्यादित राहिलेली दिसते.

**प्र.६ वा. व्यवसाय संघवाद म्हणजे काय ते सांगुन व्यवसाय संघवादाची मूलतत्त्वे व वैशिष्टये सांगा ?**

व्यवसाय संघवाद हा विचार २० व्या शतकात उदयाला आला. श्रमिक संघवादातील क्रांतीकार तत्वे आणि फेबियन समाजवादातील अति सौम्य तत्त्वे या विचारवंताना मान्य नव्हती. त्यांनी फेबियन व श्रमिक संघवादात समन्वय घडवून आणला. या समन्वयवादी नव विचाराला व्यवसाय संघवाद म्हणतात. रौको यांच्या मते, "व्यवसाय संघवाद हे इंग्लंड फेबियन समाजवाद आणि फ्रेंच श्रमिक संघवाद यांचे बौद्धिक अपत्य आहे." या विचारांनुसार कारखान्याची मालकी समाजाकडे असावी. पण व्यवस्थापन कामगारांकडे असावे हे मुख्य क्षेत्र सूत्र आहे. "द रेस्टोरेशन ऑफ द गिल्ड सिस्टीम" या ग्रंथात १९०६ मध्ये जोसेफ पेन्टी याने व्यवसाय संघवादाची पहिल्यादा मांडणी केली. पेन्टी, हॉन्सन, कोल इत्यादींनी फेबियन समाजवादाबद्दलच्या असमाधानातून व्यवसाय संघवादाचा पुरस्कार केला. समाजवाद्यांमुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील केंद्रीकरण, नोकरशाहीचे वर्चस्व इत्यादी दोष राहून कामगार वर्गाच्या हातात खरी सत्ता येणार नाही.

**व्यवसाय संघवाद व्याख्या व अर्थ :-**

श्रमिक संघवादातील क्रांतीकारक तत्त्वे व फेबियन संघवादातील अती सौम्य तत्त्वे जगाच्या मानवणारी नव्हती म्हणून काही विचारवंतांनी फेबियन व श्रमिक संघवादाची तत्त्वांना समन्वय करून व्यवसाय संघवाद ही नवीन विचारसरणी निर्माण केली.

१. समाजातील विशिष्ट कार्य जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी परस्परावलंबी लोकांची स्वयंमशासित संघटना म्हणजे व्यवसाय संघवाद होय.

२. समाजाच्या विशिष्ट कार्यासाठी एकत्र येणाऱ्या व्यावसायिकांची स्वयंम नियंत्रित संघटना म्हणजे व्यवसाय संघवाद होय.

३. **बर्नस-** यांच्यामते व्यवसाय संघवाद म्हणजे उत्पादन साधनाची मालकी शासनाकडे आणि उद्योगधंद्याचे व्यवस्थापन व संचालन कामगाराच्या व्यवसाय संघाकडे सोपवावे असे प्रतिपादन करणारी विचारसरणी आहे.

**व्यवसाय संघवादाची मूलतत्त्वे किंवा वैशिष्टये :-** फेबियन समाजवाद आणि श्रमिक संघवाद यांच्या समन्वयातून व्यवसाय संघवादा तत्त्वप्रणाली साधली गेली असल्यामुळे व्यवसाय संघवादाची वैशिष्टयपूर्ण तत्त्वे मांडलेली आहेत. ते पुढील प्रमाणे

**१. भांडवलशाहीला विरोधः-** इतर समाजवादी विचारप्रवाहाप्रमाणे व्यवसाय संघवादी भांडवलशाहीला विरोध करतात.भांडवलशाही कामगारांना एक निर्जिव उत्पादन साधन बनविते. त्याच्यातील नवनिर्मिती व सृजनशिलता नष्ट करून त्यांना यंत्राप्रमाणे राबविते. कमी वेतन देऊन कामगारांचे शोषण करते. कामगाराला कोणतेही आर्थिक प्रोत्साहन देत नाही. भांडवलशाहीत कामगाराच्या विकासाला संधी नसल्यामुळे भांडवलशाही नष्ट केली पाहिजे हे मत व्यक्त करतात.

**२.औद्योगिक क्षेत्रात लोकशाही**:- आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढलेले आहे. राज्यावरील कामाचा ताण कमी करण्यासाठी कारखान्याची व्यवस्थापनात कामगाराकडे सोपवावे. त्यामुळे खऱ्या अर्थाने औद्योगिक क्षेत्रात लोकशाही निर्माण करता येईल. व्यवसाय संघ ही विचारसरणी औद्योगिक क्षेत्रात स्वायत्तता आणि कार्य यांच्या आधारावर स्थापन केलेली लोकशाही आहे.

**३.व्यवसाय संघ व्यापक संकल्पनाः-** व्यक्तीचे रक्षण अनिर्बंध अर्थव्यवस्थेप्रमाणे शक्तीमान राज्यापासून केले पाहिजे हे तत्त्व अंगीकारले आहे. प्रत्येक समाजात अनेक प्रकारची कामे असतात. ती पार पाडण्यासाठी अनेक व्यवसाय संघ निर्माण करावे लागतात. प्रत्येक व्यवसायात एक व्यवसाय संघ असेल. तो त्या उद्योगाची व्यवस्था पाहील. व्यवसाय संघ कामगारापुरता मर्यादित नसून कामगांराना सहकार्य करणाऱ्या कारकून, तंत्रज्ञ इ.चा देखील समावेश केला जाईल. कारण ते देखील श्रमिक आहेत.

**४. उत्पादक व ग्राहक हित जोपासनाः-** प्रत्येक उद्योगात व्यवसाय संघामार्फत व्यवस्थापन होईल. कोणती वस्तू निर्माण करावी,वस्तूंची किंमत काय असावी हे सर्व निर्णय संघामार्फत घेतले जातील. संघ आपल्याबरोबर ग्राहकाच्या हिताची सुद्धा काळजी घईल. कारण कमीत कमी किंमतीत मिळविले. हे ग्राहक संघाचे ध्येय असते.म्हणून ग्राहक संघ आणि व्यवसाय संघ यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे.

**५. साधनशुचिता व सत्तेचे विकेंद्रीकरण**:- व्यवसाय संघवाद हा लोकशाही विचार असल्याने ते हिंसाचाराला विरोध करतात. साध्यप्रमाणे साधने शुद्ध असली पाहिजे म्हणून ते शांतता व लोकशाहीच्या मार्गाने संघवाद निर्माण करू इच्छितात.तसेच राज्याने सत्तेचे विकेंद्रीकरण करावे.आर्थिक क्षेत्रात व्यवसाय संघाला स्वतंत्रपणे काम करू दयावे हा विचार मत व्यक्त करतात.

**६.व्यावसायिक प्रतिनिधित्वाचे समर्थनः-** संघवादी प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धतीला विरोध करतात. प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती योग्य असे प्रतिनिधित्व निर्माण करत नाही. एक व्यक्ती मतदार संघातील हजारो व्यक्ती व विविध हितसंबंधीयांचे प्रतिनिधित्व करणे हे हास्यास्पद संकल्पना असून लोकशाहीचे विडंबन असहे. प्रत्येक व्यावसायिकच्या समस्या वेगवेगळया असतात. म्हणून व्यक्तीला नव्हे तर हितसंबंधाला प्रतिनिधित्व देण्यासाठी व्यावसायिक प्रतिनिधित्व द्यावे. प्रत्येकाला फक्त आपल्या व्यवसायबद्दल जास्त ज्ञान असते. त्यासाठी व्यावसायिक मतदारसंघ निर्माण करावे. या मतदारसंघामुळे प्रत्येक जण आपल्या व्यवसायाचे प्रतिनिधित्व करेल.त्यामुळे समाजात प्रत्येक व्यवसायाला प्रतिनिधित्व मिळेल.

**७. विकेंद्रीकरणः-** राजकीय व आर्थिक ह्या दोन्ही क्षेत्राचे व सत्तेचे व्यवसाय संघवादी विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करतात. राज्याप्रमाणे इतर सामाजिक संस्थाना व आर्थिक संस्थाना देखील राज्याप्रमाणेच सार्वभौम सत्ता असावी. आर्थिक बाबतीत सत्ता व्यवसाय संघटना असावी. सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी दृष्टीने स्थानिक स्तरावरील संघाना अधिक

सवायत्तता द्यावी असे त्याचे म्हणणे आहे. व्यवसाय संघवादी समाजात राजकीय लोकशाही व आर्थिक लोकशाही ह्यांचा संगम होऊ शकेल असा त्याचा विश्वास होता.

**व्यवसाय संघवादाचे दोष-** व्यवसाय संघवादी विचारसरणीत काही विचारवंतानी पुढील दोष सांगतिले आहे.

१. **व्यवसाय प्रतिनिधित्व पद्धत अयोग्य:-** तांत्रिकदृष्ट्या व्यवसाय प्रतिनिधित्वाची पद्धत चुकीची आहे. या पद्धतीत व्यक्तीचा आर्थिक घटक म्हणून विचार केला जातो. मात्र व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अनेक प्रकारचे असल्यामुळे सर्व व्यक्तीना प्रतिनिधित्व देता येणार नाही. तसेच व्यक्तीच्या सामाजिक व सांस्कृतिक पैलूकडे व्यावसासिक प्रतिनिधित्व पद्धतीत दुर्लक्ष होते. व्यावसायिक प्रतिनिधित्वामुळे समाजातील एकात्मता नष्ट होते.

२. **व्यावसायिक प्रतिनिधित्वातील अडचणी**:- कोणत्या व्यवसायाला किती प्रतिनिधित्व द्यावे हा प्रश्न सुद्धा वाद्ग्रस्त आहे. व्यावसायिक मतदार संघाच्या आधारावर निवडलेले प्रतिनिधी व्यावसायिक हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे देखील व्यावसायिक प्रतिनिधीत्व देतांना अडचणी येतात.

३. **कार्यविभागणी अशक्य:-** राज्याने कायदा व सुव्यवस्था क्षेत्रात काम करावे आणि व्यवसाय संघाने उत्पादन क्षेत्रात कार्य करावे अशी भूमिका संघवादी मांडतात. पण प्रत्यक्षात ही कार्य एकमेकांशी संबंधित असल्याने त्यांच्यात विभागणी करणे अशक्य आहे. व्यवसाय संघवादामुळे प्रत्येक व्यवसायात विविध व्यवसाय संघ निर्माण करावे लागतील. वेगवेगळया व्यवसाय संघात मतभेद आणि भांडणे निर्माण होतील. त्यांचा उत्पादनावर विपरीत परिणाम होईल. ही गोष्ट देशहितासाठी घातक ठरेल याकडे व्यवसाय संघवाद लक्ष देत नाही.

४. **व्यवसाय संघाना समान दर्जा अयोग्य:-** प्रो. कोल यांच्या मतानुसार राज्य आणि व्यवसाय संघ ह्याचा दर्जा एकच राहणार असून राज्याचे सर्वश्रेष्ठत्व आणि सार्वभौमत्व त्यामुळे टिकू शकणार नाही. राज्याचे सार्वभौमत्व नष्ट केले तर व्यवसाय संघाचे सार्वभौमत्व प्रस्थापित होईल. ही गोष्ट राज्याच्या अस्तित्वासाठी घातक ठरेल. आजच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार आणि यंत्राद्वारे मोठया प्रमाणावर उत्पादन होत आहे. उद्योग आणि व्यापार क्षेत्रात मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण झालेली आहे. त्या स्पर्धात व्यवसाय संघ ही संकल्पना कितपत राबविता येईल याबाबत विचारवंतामध्ये शंका आहे.

**व्यवसाय संघवादाचे गुण**:- व्यवसाय संघवाद विचारसरणी अनेक दोष असले तरी या विचारसरणीत पुढील गुण दिसतात.

**१.** या विचारसरणीमुळे कामगांराना उद्योगधंदाच्या क्षेत्रात थोडी फार सत्ता मिळाली तसेच राज्यसत्तेला सर्वश्रेष्ठ मानणे चुकीचे आहे हे या विचारसरणीने दाखवून दिले आहे.

**२.** लोकशाही यशस्वी होण्यासाठी आर्थिक व राजकीय क्षेत्रात सत्तेचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. या गोष्टीकडे समाजाचे लक्ष वेधण्याचे कार्य व्यवसाय संघवादाने केले आहे.

**३.** उद्योगधंदाच्या व्यवस्थापनात मालक व कामगारा यांना प्रतिनिधित्व असावे तसेच आज मर्यादित प्रमाणात व्यवसाय प्रतिनिधित्वाची कल्पना मान्य झाली आहे याचे श्रेय संघवादाने दिले पाहिजे.

अशा प्रकारे व्यवसाय संघवाद विचारसरणीचे मूल्यमापन करता येते.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. लोकशाही समाजवादी विचारवंताची नांवे सांगा.
उत्तर- राबर्ट ओवेन, सेन्ट सायमन, चार्लस फेरिअर, लुई ब्लॅक आणि जी.डी.एच.कोल इ.लोकशाही समाजवादी विचारवंत मानले जातात.

२. श्रमिक संघवाद विचारसरणीची मांडणी कोणत्या विचारवंतानी केलेली आहे.
उत्तर- श्रमिक संघवाद विचारसरणीची मांडणी जार्ज सोरेल आणि पेल्यूटर या विचारवंतानी केलेली आहे.

३. श्रमिक संघवाद म्हणजे काय ?
उत्तर - श्रमिक संघवाद म्हणजे ज्या परिस्थितीत श्रमिक काम करतात. त्या परिस्थितीवर श्रमिकांचे नियत्रंण असावे. संपूर्ण आर्थिक व्यवस्था श्रमिकांच्या ताब्यात व नियंत्रणाखाली असावी.

४. व्यवसाय संघवाद म्हणजे काय ?
उत्तर- समाजातील विशिष्ट कार्य जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी परस्परावलंबी लोकाचे स्वयंपूर्ण संघटन म्हणजे व्यवसाय संघवाद किंवा समाजातील विशिष्ट कार्यासाठी एकत्र येणाऱ्या व्यावसायिकांची स्वयंम नियंत्रीत संघटना म्हणजे व्यवसाय संघवाद होय.

५. व्यवसाय संघवाद विचारसरणीत कोणत्या दोन विचारसरणीतील तत्त्वाचा समन्वय केलेला आहे.
उत्तर- व्यवसाय संघवाद विचारसरणीत श्रमिक संघवाद आणि फेबियन समाजवाद विचारसरणीतील तत्त्वांचा समावेश आहे.

६. लोकशाही समाजवाद म्हणजे काय?
उत्तर- लोकशाही समाजवाद म्हणजे सनदशीर आणि घटनात्मक मार्गाने समाजातील उत्पादन साधने वा वितरण साधनावर समाजाची मालकी वा नियंत्रण प्रस्थापित करणे.

७. लोकशाही समाजवादाच्या दोन मर्यादा स्पष्ट करा?
उत्तर- लोकशाही समाजवाद उत्पादन साधनावर मक्तेदारी प्रस्थापित केली जात असल्याने स्पर्धेला कमी महत्व प्राप्त होते तसेच राष्ट्रीयकरणावर अतिरेकी भर दिल्यामुळे अकार्यक्षमता व भ्रष्टाचार हे दोष निर्माण होतात.

८. फेबियन समाजवादाची स्थापना कोणत्या देशात व कोणी केली?
उत्तर- फेबियन समाजवाद इंग्लंडमध्ये झाली. सिडने वेब, श्रीमती वेब, प्रा.हेरॉल्ड लास्की, जार्ज बर्नार्ड शॉं आणि जी.डी.एच.कोल, एच.जी.वेल्स यांनी केली.

९. लोकशाही समाजवादाची दोन मूलतत्त्वे कोणती ते सांगा.
उत्तर- स्वार्थी व्यक्तीवाद, भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विरोध, खाजगी उत्पादन क्षेत्रावर नियंत्रण, मर्यादित राष्ट्रीयकरण इत्यादी लोकशाही समाजवादाची मूलतत्त्व आहेत.

# प्रकरण ४ थे
# पर्यावरणवाद

### प्र.१ ला. पर्यावरणवादाचा अर्थ, स्वरूप आणि वैशिष्टये स्पष्ट करा?

पर्यावरणवाद ही विचारसरणी सद्यस्थितीत एक अत्यंत महत्त्वाची राजकीय शक्ती म्हणून झाली आहे. पर्यावरणवाद ही विचारसरणी हरित चळवळ किंवा हरित राजकीय विचार या नावाने ओळखला जातो. या विचारसरणीला आधार मानून पर्यावरण संरक्षणासाठी अनेक दबावगट आणि राजकीय पक्ष अमेरिका आणि युरोपच्या राजकारणात सक्रिय झालेले आहेत. पर्यावरणवाद ही विचारसरणी १९६० आणि १९७० दशकात युरोप आणि अमेरिकेत उदयाला आली. तेथील निःशस्त्रीकरण चळवळीने पर्यावरणवादी विचारसरणीची पार्श्वभूमी विकसित करण्यात मोलाची भूमिका बजावलेली दिसते. व्हिएतनाम युद्धात वनस्पतीनासक कीटकनासकाच्या वापरातून पर्यावरणाचा मोठया प्रमाणावर ऱ्हास झाला. या युद्धातून अण्वस्त्रप्रसारबंदी, निःशस्त्रीकरण आणि पर्यावरण संरक्षणाविषयी जाणिवा तीव्र होत गेल्या. पर्यावरणवादास चालना देणारे रॅशेल कारसनचे 'सायलेंट स्प्रिंग'आणि पॉल एहरिशची 'द पॉप्युलेशन बॉम्ब' सारख्या पुस्तकांनी पर्यावरणवादाचा सैद्धांतिक पाया घातला. जर्मनीतील राजकारणात ग्रीन पक्ष, इंग्लंड व अमेरिकेतील ग्रीन पक्षांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

**पर्यावरणवादाचा अर्थ-** पृथ्वीवरील विशिष्ट किंवा ठराविक भागास उपलब्ध असलेली सर्व सजीवांच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. 'Enviorn' या मूळ फ्रेंच शब्दापासून इंग्रजीत Enviornment हा शब्द प्रचलित झालेला आहे. आपल्या सभोवतालची परिस्थिती ही एक किंवा अनेक घटकांनी मिळून बनलेले असते. तिच्याच सजीव, निर्जीव, निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित घटकांचा समावेश होता. या सर्व घटक मिळून पर्यावरण निर्माण होत असते. पर्यावरण सर्वत्र सारखे नसते. या संज्ञेत सूर्यप्रकाश, मृदा, तापमान, पाणी, वनस्पती, सजीव वसाहती, धरण प्रकल्प इत्यादी घटकांचा समावेश होता.

**पर्यावरणाची व्याख्या-** सजीवांच्या व मानवाच्या समूहावर तसेच जीवनावर सभोवतालच्या नैसर्गिक, भौगोलिक, सांस्कृतिक घटकांचा एकत्रित प्रभाव पडतो. या प्रभावाचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे म्हणजे पर्यावरण होय.

१. **जॉन टर्क-** पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर होणारा प्रभाव म्हणजे पर्यावरणशास्त्र होय. पर्यावरणाच्या संबंधात निर्माण झालेल्या समस्या व त्यावरील उपाय यांचा अभ्यासही पर्यावरणशास्त्रात केला जातो.
२. **डॅनियल चिरास-** जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रियांचा अभ्यास करणारे पर्यावरण हे एक शास्त्र आहे.

पर्यावरण हा घटक समकालीन राजकारणामध्ये महत्त्वाचा बनण्याचे कारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील वाढते परस्परालंबित्व आहे. हवा, पाणी, पर्वत, जंगले हे पर्यावरणीय घटक सृष्टीतील सजीवांना जोडण्याचे काम करता आहेत. एका राष्ट्राकडून झालेल्या पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम केवळ त्या राष्ट्राला भोगावे लागत नाही तर शेजारी राष्ट्रांना किंवा विश्वालाही भोगावे लागत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेने वेग घेतलेला आहे. या विकास प्रक्रिये अंतर्गत मर्यादीत नैसर्गिक साधनसंपत्तीची बेसुमार लुट केली जात आहे. या लुटीतून पर्यावरणाचा समतोल बिघडत असून भावी काळात ही साधनसंपत्ती नष्ट होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. त्यातून प्रदूषण, जागतिक तापमान वाढ, आम्ल पर्जन्य, अवर्षण आणि अतिप्रर्जन्य ह्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. याचे हानिकारण परिणाम केवळ मानवाला नाही तर प्रत्येक सजीवाला भोगावे लागत आहेत. म्हणून नैसर्गिक पर्यावरणातील विविध घटकांचे गुणधर्म, त्या घटकांचा सजीवांशी येणारा संबंध, पर्यावरण ऱ्हासावर उपाय व नैसर्गिक घटकांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा पद्धती इत्यादी विषयाचा अभ्यास करण्यासाठी पर्यावरणशास्त्र शास्त्राचा अभ्यास केला जातो आणि मानवात पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करता येऊ शकते.

**पर्यावरणवादाचे स्वरूप-** पर्यावरणशास्त्र हे पृथ्वीवरील सर्वच सामाजिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक घटकांचा अभ्यास करत असल्याने त्यांचा सर्व सामाजिक शास्त्राची निकटचा संबंध येतो. सजीवाच्या विविध पैलूचा अभ्यास करण्यासाठी

विविध शास्त्र निर्माण झालेली असली तरी त्यात परस्परसंबंध असतो. त्याप्रमाणे पर्यावरणशास्त्र हे आंतरविद्याशाखीय आहे. विविध शास्त्राशी त्याचा संबंध आहे. पर्यावरण शास्त्र हे फक्त मानवासाठी नव्हे तर सर्व सजीवाच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहे. ते नेहमीच परिवर्तनशील असते. आपल्या सभोवताली घडणाऱ्या दृश्य व अदृश्य गोष्टीचा अभ्यास पर्यावरणशास्त्रात केला जात असतो.

१. पृथ्वीवरील कोणत्याही मानव व इतर सजीव आणि तिच्या सभोवताली असणारे निर्जीव घटक यांच्या संयोगातून निर्माण झालेली परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.
२. पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकांच्या संयोगातून सर्वासाठी निर्माण झालेले आवरण म्हणजे पर्यावरण होय.
३. परिवर्तनशीलता हा पर्यावरणाचा प्रमुख गुण असून स्थल आणि काळाप्रमाणे त्यात बदल होत असतो. पर्यावरणाचे परिणामही बदलत असतात.
४. अध्ययन व अध्यापन या साधनांद्वारे, पर्यावरणातील समस्यांचे आकलन करून त्या सोडविण्याची कृती म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.
५. पर्यावरणावाद विविध परिस्थितीतील संबंध, त्यांची कार्यप्रणाली, बाह्य घटकांचा परिसंस्थावर होणारा परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना इत्यादी सखोल अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन पर्यावरणवादात केले जाते.
६. पर्यावरणातील घटक हे परस्परालंबी असतात. त्याचे अस्तित्व एक दुसऱ्यावर अवलंबून असते. त्यामुळे पर्यावरणवादाचा अभ्यास करतांना सर्व घटकांचा एकत्रितपणे अभ्यास करतो लागतो. कारण एक दुसऱ्याचे वैशिष्टयपूर्ण संबंध असतात.
७. हवा, पाणी आणि जमीन हे पर्यावरणातील प्रमुख घटक आहेत. या घटकांच्या संयोगातून सजीव सृष्टी आकाराला आली आहे. त्याच्यातील संबंधाचा अभ्यास पर्यावरणवादात केला जातो.
८. पर्यावरणातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि विविध घटक अमर्यादित नसून मर्यादित आहेत. हे नैसर्गिक स्त्रोत भावी काळात समाप्त होणारे आहेत. म्हणून त्यांचा काटकसरीने वापर करावा याची जाणिव विकसित करणे हे पर्यावरणवादाचे आद्य तत्त्व आहे.

**पर्यावरणवादाची वैशिष्टये-** विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये उदयाला आलेला पर्यावरणवाद ही एक महत्त्वपूर्ण विचारसरणी आहे. गेल्या काही दशकात विकसित होत असलेली हरित चळवळ ही पर्यावरणवादातून विकसित झालेली आहे. पर्यावरणवादी चळवळीची वैशिष्टये पुढील प्रमाणे होत.

१. **औद्योगिकीकरणाला विरोध-** पर्यावरणवाद ही विचारसरणी स्वार्थी आणि अविवेकी औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास प्रक्रियेला करते. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक आणि औद्योगिक विकासाने जोर पकडला. ही प्रक्रिया सुरक्षित विकासाऐवजी पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित होती. उदयोगधंदाच्या विकासातून पर्यावरणाचा समतोल नष्ट होऊन प्रदुषणाचे प्रमाण वाढले. नैसर्गिक साधनसंपत्तीला ओरबाडणे सुरू झाले. पर्यावरणवाद या स्वार्थी औद्योगिकरणाला विरोध करते. औद्योगिकीकरणाच्या विरोधात होत असलेल्या आंदोलनामागे पर्यावरणवाद आहेत.
२. **भांडवलशाहीला विरोध-** पर्यावरणवादी विचारसरणीतील समाजवादी गट भांडवलशाहीला विरोध करतात. युरोपातील औद्योगिकीकरणाचा पाया हा भांडवलशाही आहे. भांडवलशाहीने विकासाची संकुचित संकल्पना मांडली. आर्थिक समृद्धी म्हणजे विकास ही संकुचित कल्पना विकसित केली. आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी राष्ट्रांमध्ये अनिष्ट स्पर्धा सुरू झाली. विकासाच्या नावावर नैसर्गिक संपत्तीची बेसुमार लूटचा परवाना उदयोगांना मिळाला त्यामुळे हा विकास भावी पिढीच्या विकासावर मुळावर उठणारा आहे. म्हणून पर्यावरणवादी स्वार्थी भांडवलशाहीला विरोध करतात.
३. **निसर्गकेंद्रित विचारसरणी-** पर्यावरणवादी विचारसरणी निसर्गकेंद्रित आहे. विविध विचारधारला व्यक्तीला केंद्रस्थानी मानून विचार करतात. पण व्यक्तीचे अस्तित्व तिच्या सभोवताली असलेल्या पर्यावरणावर अवलंबून

असल्याने निसर्गकेंद्रित विचार हा अधिक संयुक्तिक विचार आहे, असे पर्यावरणवादी मानतात. पर्यावरण असमतोलातून व्यक्तीचे अस्तित्व धोक्यात येते. त्यामुळे व्यक्ती नव्हे तर पर्यावरण अधिक महत्त्वाचे असे पर्यावरणवादी मानतात.

४. **मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाची चिंता-** पर्यावरणवाद हा विचार पृथ्वीवरील मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. वाढत्या पर्यावरण प्रदूषणातून मानवी संस्कृतीचे भवितव्य धोक्यात आले असून तिच्या अस्तित्वाची चिंता पर्यावरणवादयांच्या केंद्रस्थानी आहे. व्यक्तीचा घसरत जाणारा जीवनस्तर, वाढत्या सामाजिक, आर्थिक आणि सामाजिक समस्याविषयी सहानुभूती पर्यावरणवादी विचारसरणीत अंतर्भूत आहे.
५. **पर्यावरणवादामधील स्त्रीवादी दृष्टिकोन-** पर्यावरणवादातील स्त्रीवादी दृष्टिकोन पर्यावरणाच्या विनाशाला , प्रदूषणाला पुरूषप्रधान संस्कृतीतील स्वार्थी आणि अधिकारपिपासूवृत्तीला जबाबदार मानतात. पर्यावरणाचे प्रदूषण कमी करण्यासाठी स्त्रियांनी सक्रिय भूमिकेवर भर देतात. स्त्रियांनी निसर्गकेंद्रित जीवन जगण्यावर भर देतात.
६. **सुधारणावादी दृष्टिकोन-** पर्यावरण हा मूलतः सुधारणावादी विचार आहे. प्रदूषणातून पर्यावरणाचा बिघडलेला असमतोल कमी करून पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे हा या विचारसरणीचा प्रमुख उद्देश आहे. पर्यावरण सुधारण्याच्या हेतूने अनेक दबाबगट आणि राजकीय पक्ष कार्य करतांना दिसता आहेत. युरोपातील अनेक पर्यावरणवादी गट कायदेमंडळात शिरून पर्यावरणपूरक कायदे करण्यासाठी शासनावर दडपण आणून कायदा निर्मितीचा प्रयत्न करीत आहेत.
७. **निःशस्त्रीकरणाचे समर्थन-** पर्यावरणवाद चळवळीच्या उदयाला पोषक पार्श्वभूमी निःशस्त्रीकरण चळवळीने निर्माण करून दिली आहे. अणुबॉम्ब, क्षेपणास्त्रे, रासानिक व जैविक शस्त्रातून मोठया प्रमाणावर प्रदूषण होत असते. या शस्त्राच्या अमर्याद विनाश क्षमतेतून निःशस्त्रीकरणाची चळवळ विकसित झाली. या चळवळीस पर्यावरणवादयांचे समर्थन आहे. अण्वस्त्र निर्मिती, हवा,जमीन आणि पाण्यात चाचणीला विरोध, अणुतंत्रज्ञान हस्तांतरणाला बंदी यासारखी अनेक आंदोलने पर्यावरणवादयांनी केलेली आहेत.

**प्र.२ रा. मानव आणि निसर्ग यातील संबंध विशद करा?**

**किंवा**

**पर्यावरणातील मानवाची भूमिका विशद करा?**

मानवाची निर्मिती हा निसर्गातील सर्वात मोठा अविष्कार मानला जातो. त्यामुळे मानव व निसर्गात एक प्रकारचे धनिष्ठ नाते निर्माण झालेले आहे. मानवाचे संपूर्ण आयुष्य निसर्गावर अवलंबून आहे. मानवी जीवनाच्या उत्क्रांती प्रक्रियेतून मानवी गट, मानवी समाज आणि मानवी संस्कृती निर्माण झाली. समाज आणि निसर्गाच्या बदलत्या नात्यावर मानवाची निसर्गाप्रति असलेली भूमिका बदलली. प्रत्येक मानवी समूहातील मानव आणि निसर्ग यांच्यातील सहसंबंधात भिन्नता आढळून येते. पौर्वात्य सांस्कृतिक जीवनात निसर्गाला मानवाचा मित्र मानले जाते. मानवापेक्षा निसर्ग श्रेष्ठ मानला जातो. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा मानसन्मान राखण्यासाठी त्याची भक्ती व उपासना केली जाते. म्हणून पौर्वात्य संस्कृतीतील अनेक देव, देवता, धार्मिक विधी, सण हे नैसर्गिक जीवनाशी नाते दर्शविणारे आहेत. उदा. भारतासारख्या देशात सूर्य, अग्नी वा पंचमहाभूतांना देव मानण्याची प्रवृत्ती

पाश्चिमात्य संस्कृतीतील तत्त्वज्ञान हे बुद्धिवादावर आणि भौतिकवादावर आधारलेले असल्याने निसर्ग ही मानवाला मिळालेली देणगी असून तिचा मानवाच्या कल्याणासाठी जास्तीत जास्त कसा उपयोग करून घेतला पाहिजे याचे तंत्र शोधण्यावर भर देते. या विचारधारेतून औद्योगिक क्रांतीनंतर नैसर्गिक साधनसंपत्तीची बेसुमार लूट करण्यात आली. त्यामुळे नैसर्गिक घटकातील असंतुलन नष्ट झाले. त्यातून पर्यावरणविषयक अनेक समस्या निर्माण झाल्या आणि त्या दिवसेंदिवस घट होण्याऐवजी वाढ होताना दिसते आहे. पाश्चिमात्य देशात विकसित झालेला विचार पौर्वात्य देशातही पसरत चालला आहे. पाश्चिमात्य देशाच्या अनुययाने जलद आर्थिक विकासाच्या स्वप्नाने तिसऱ्या जगातील देश पाश्चिमात्य देशांप्रमाणे औद्योगिकीकरण, राहणीमानाचा स्तर उंचावणे, भौतिकतावाद यांच्या मागे लागला आहे. संतुलित

विकासाऐवजी असंतुलित विकासाची कास या देशांनी धरल्याने पर्यावरणविषयक समस्यांनी सद्यस्थितीत गंभीर रूप धारण केलेले आहे.

प्राचीन काळी मानव हा निसर्गाचा आज्ञाधारक उपासक आणि संरक्षक म्हणून वावरत होता. अर्वाचीन काळात मानवाने ही भूमिका बदलून तो अधिक संहारक, विध्वंसक बनू लागला आहे. जगातील बहुतेक समाज आणि मानवी समूह निसर्गातील घटकांना पूर्वी पवित्र मानून त्यांची पूजा करत असत. त्या पवित्रेला लोकांनी मान्य करावे म्हणून त्याला धार्मिकतेची जोड देण्यात आली. धार्मिकतेच्या आधारामुळे लोक पर्यावरणाच्या रक्षणासाठी स्वत:हून प्रयत्न करत आहे. उदा. भारतात नद्यांना देवता मानने होय. निसर्गाला गुरूच्या केंद्रस्थानी ठेवून मानव आजपर्यंत अनेक गोष्टी शिकत आलेला आहे. मानवाच्या संशोधकवृत्ती आणि धडपडीतून निसर्गातील अनेक गुपिते त्याला अवगत झाल्याने अनेक शोध लागले. त्यातून मानवाने अनेक जीवनाश्यक वस्तू निर्माण केल्या, अनेक महत्त्वपूर्ण वस्तूही निर्माण केल्या. उदा. पक्ष्यांच्या उडण्यापासून प्रेरणा घेऊन विमानाचा शोध लावला. ज्ञानेंद्रिये आणि कल्पनाशक्तीच्या आधारावर निसर्गातील अनेक अदृश्य घटकांचे ज्ञान मिळविले. सातत्याने चालणाऱ्या संशोधनामुळे निसर्गासंबंधी ज्ञानात भर पडली. मानव निसर्गाला समजून घेऊ लागला. आपले जीवन सुसह्य करण्यासाठी त्याचा वापर करू लागला.

निसर्गाच्या संरक्षणासाठी आपल्या देशात प्राचीन काळापासून काही चालीरीती, रूढी, परंपरा चालत आलेल्या आहेत. यातील एक परंपरा म्हणजे संवर्धन वनराई अथवा देवराई अशा या देवराईचा समाज, धार्मिक संस्था आणि शासनाकडून सांभाळ केल्यामुळे पर्यावरण संरक्षणाला हातभार लागलेला आहे. श्रद्धा व विश्वासाच्या तत्त्वामुळे अनेक प्रदेश अजूनही सुरक्षित आहेत उदा. हिमालयातील हिंदूच्या तीर्थक्षेत्रामुळे तेथील जंगलाना संरक्षण मिळाले आहे. जंगल संरक्षणातून मूळ वनस्पतीचे संरक्षण होत असताना दिसते. पूर्वी रोज लोक शिकारीसाठी जंगल वा देवराईचा उपयोग करीत असत. प्रत्येक राजाच्या साम्राज्यात देवराई होत्या. आज त्याचे प्रमाण कमी झालेले दिसते. त्याचे पुनरूज्जीवन केल्यास पर्यावरणा रक्षणाच्या प्रश्नास हातभार लागेल. देवराईची मालकी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, काही जमाती आणि कुटुंबाकडे दिसते. त्यात धार्मिक विधी, उत्सव, सणसमारंभ साजरे केले जातात. त्यामुळे पर्यावरण ऱ्हासाचा त्यातून धोका जाणवतो. शासनाने स्वप्रयत्नाने वनराया विकसित केल्यास पर्यावरण समस्या कमी होण्यास हातभार लागेल. अभयारण्य, वनराई यातून जैवविविधताचे रक्षण करता येईल. अभराण्यातून दुर्मिक पशू, पक्षी आणि पाण्याचे संवर्धन करतात येईल त्यासोबत पर्यावरण आणि परिसंस्थेचा समतोल टिकविण्यास हातभार लागेल.

प्राचीन काळापासून सुरू असलेल्या रूढया, प्रथा, परंपरा वाढत्या अर्थाजर्नाच्या महत्त्वामुळे मोडीत निघाल्या आहेत. लोकांच्या मनावरील धार्मिक आणि निसर्गप्रधान जीवनाचा पगडा व श्रद्धा कमी होऊ लागल्या. निसर्गप्रधान जीवन जगणाऱ्याला रानटी, अप्रगत मानले जाऊ लागल्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवर्धनाऐवजी लूटीला प्राधान्य मिळू लागले आहे. मानवाची भूमिका पर्यावरण रक्षक ऐवजी भक्षक बनू लागल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास सुरू आहे. यातून सुटका करून घेण्यासाठी असंतुलित विकासाऐवजी संतुलित पर्यावरणपूरक विकासाला प्राधान्य दयावे लागेल. विकास करत असतांना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल तर मानव आणि निसर्ग याचा समतोल टिकून दोघांचे अस्तित्व टिकून राहील.

**प्र. ३ रा. प्रदूषण म्हणजे काय ते सांगुन प्रदूषणाची कारणे व परिणाम स्पष्ट करा?**

प्रदूषण ही एक जागतिक समस्या आहे. मानवनिर्मित दूषित पदार्थामुळे प्रदूषण होते. प्रदूषणातून पर्यावरणातील नैसर्गिक संपदावर ताण पडून नैसर्गिक समतोल नष्ट होता. वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विकासाची अनियंत्रित प्रक्रियेतून प्रदूषण वाढत आहे. Pollution हा शब्द Pollute या लॅटिन शब्दापासून रूढ झालेला आहे. त्याचा अर्थ गलिच्छ, दूषित वा अशुद्ध करणे असा होता. पर्यावरण प्रदूषण याचा अर्थ मानवनिर्मित हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे दूषितीकरण असा होता. सामान्यपणे पाणी, हवा, जमीन दूषित झाल्यास त्यास प्रदूषण म्हटले जाते. वातावरणातील धूळ, वायू, धुके, बाष्प, त्याज्य पदार्थ इत्यादी घटकांमुळे मानवी व वनस्पती जीवनास अपायकारक ठरणाऱ्या घटकाला प्रदूषण जाते.

**प्रदूषणाची व्याख्या-**

१. **पर्यावरण प्रदूषण मंडळाच्या मते-** मानवी क्रियांमुळे आपल्या भोवतालच्या परिस्थितीत पूर्णपणे किंवा काही प्रमाणात झालेले फेरफार म्हणजे प्रदूषण होय.

२. पर्यावरणातील काही घटकांच्या संचयामुळे मानवी जीवनावर अपायकारक परिणाम होता त्यास प्रदूषण असे म्हणतात.

३. पर्यावरणातील अपायकारक घटकांमुळे पर्यावरण संतुलन बिघडते व पृथ्वीवरील सजीवांच्या जीवाला धोका पोहचतो. अशा अपायकारक घटकामुळे दूषित झालेल्या पर्यावरणास प्रदूषण असे म्हणतात.

पर्यावरणाच्या वरील व्याख्या परिपूर्ण नसल्या तरी ही संकल्पना स्पष्ट होण्यास हातभार लागतो.

**प्रदूषणाची कारणे-** औद्योगिकरणामुळे विसाव्या शतकात अनेक विषारी वायू आणि घातक घटकांचे वातावरणातील प्रमाण खूपच वाढलेले आहे. खजिन तेल, दगडी कोळसाच्या खाणीमुळे ऑक्सिजनचे वायूचे प्रमाण कमी होऊन कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. इंधन, इमारत, फर्निचरच्या निर्मितीमुळे प्रचंड वृक्षतोड होऊन जंगले नष्ट होत आहेत. त्यामुळे देखील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. कारखाने, वाहनाची संख्या वाढली. त्यातून कार्बन मोनॉक्साइडसारखे विषारी वायू वातावरणात मिसळतात व हवा दूषित होते. औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाहतूक, इंधन, लोकसंख्या वाढ, रासायनिक खते, जंतुनाशकाचा वापर, औद्योगिक अपघात, अणुप्रकल्प, युद्धी इत्यादीमुळे जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि हवा प्रदूषणात वाढ होत आहेत.

प्रदूषणाचे परिणाम हे एका देशापुरते मर्यादित नाही. एका देशात होणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम दुसऱ्या देशाला भोगावा लागतो आहे. उदा. अमेरिकेतील औद्योगिकरणातून निर्माण झालेल्या प्रदूषणातून कॅनडासारख्या राष्ट्राला आम्ल पर्जन्याच्या रूपाने त्रास सहन करावा लागतो. एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात वाहणाऱ्या नदीत झालेल्या प्रदूषणाचा फटका सहन करावा लागतो. अणुस्फोट व अणुभट्ट्यातून पसरणाऱ्या किरणोत्सारी कण पर्यावरणात विखरून मृदा व हवा प्रदूषत होते. विषारी प्राणघातक वायू व भूमीतून विषारी प्राणघातक अन्न साखळी तयार होते. कृर्षी क्षेत्रात वापरल्या जाणारी खते, किटकनाशकाच्या अतिवापरामुळे भूमी व अन्नात प्रदूषित घटकाचे प्रमाण वाढत आहे.

१. **प्रदूषके-** पर्यावरणात निर्माण होणाऱ्या अथवा निर्माण करून टाकल्या जाणाऱ्या अपायकारक पदार्थाना प्रदूषके असे म्हणतात. प्रदूषके मानवनिर्मित असतात. ते दृश्य व अदृश्य स्वरूपाची असतात. धूर,वायू, धूळ, दूषित पाणी, कचरा, रासायनिक खते व जंतुनासक हे दृश्य प्रदूषके तर जीवाणू, पाण्यात व जमिनीत विरलेली विषारी रसायने हे अदृश्य स्वरूपाची प्रदूषके आहेत. प्रदूषकात घन, द्रवरूप आणि वायूरूप ही तीन प्रकारची प्रदूषके आहेत. प्लॅस्टिक पिशव्या, वस्तू, भांडी, शिसे, पारा, औद्योगिक कचरा हे धन प्रदूषके तर अमोनिया क्लोराइड, कारखान्यातील टाकाऊ रसायने, मानवी मलमूत्र, सांडपाणी हे द्रवरूप प्रदूषके तसेच क्लोरो-प्लुरोकार्बन, कार्बन डाय-ऑक्साईउ, कार्बन मानोक्साईड हे वायूरूप प्रदूषके आहेत. याचा वेग वाढत आहे.

२. **घातक पदार्थ किंवा टाकाऊ पदार्थ-** पर्यावरणाला हानिकारक विषारी घटक समाविष्ट असलेल्या पदार्थाला टाकाऊ पदार्थ असे म्हणतात. घातक कचरा मानव, प्राणी आणि वनस्पतीसाठी घातक असतो. उदा. गंजलेल्या वस्तू, ज्वलनशील पदार्थ कारखान्यातील प्रक्रिया केलेले घटक, शेतीत वापरली जाणारी खते, कीटकनासके इत्यादी कचऱ्याचे प्रमुख स्त्रोत आहेत. देशात विविध ठिकाणी उदयोगाचे प्रमाण भिन्न असल्यामुळे प्रदेशानुसार कचऱ्याचे प्रमाण देखील भिन्न भिन्न असते. महाराष्ट्र, गुजराथ सारख्या औद्योगिकदृष्टया प्रगत राज्यात कचऱ्याचे निर्मूलन ही समस्या भेडसावते आहे. भारतात २००० मध्ये ७.२ लाख टन धोकादायक कचरा निर्माण झाला त्यात फक्त १.४ लाख टन कचरा पुनःप्रक्रिया करण्यासारखा आहे. संगणक आणि मोबाईलच्या वापरासोबत ई-कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे.

**पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम-**

१. **आम्ल पर्जन्य- (Acid Rain)**आम्ल पर्जन्याची समस्या ही विभागीय स्वरूपाची असली तरी अनेक राष्ट्र या समस्येला बळी पडत आहेत. आम्ल पर्जन्य ही वायू प्रदूषणातून निर्माण झालेली आहे. गंधक आणि नायट्रोजन

ऑक्साईड्स, वाहनातील धूर, इंधनाचे ज्वलन हे हवेत मिसळल्यामुळे आम्ल पर्जन्य पडतो. उर्जा निर्मितीसाठी पेट्रोलियम पदार्थ आणि जीवाश्म इंधनाचा वापर वाढला. या इंधनाच्या ज्वलनातून सल्फर डाय ऑक्साईड व नायट्रोजन डाय ऑक्साईड बाहेर पडतात. हे वायू दीर्घकाळ हवेत राहिल्यास पाण्यासोबत मिसळतात. त्यातून सल्फयूरिक ॲसिड व नत्राम्ल व नायट्रिक ॲसिड तयार होतात. ही दोन्ही आम्ले पाण्याशी संयोग पावून पावसाद्वारे जमिनीवर पडतात. त्यास आम्ल पर्जन्य म्हणतात. या पर्जन्यामुळे वनस्पतीतील हरित लवके नष्ट होतात त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रिया बंद पडून वनस्पतीची पाने पिवळी पडतात व गळतात. आम्ल पर्जन्यामुळे जंगले नष्ट होऊन वाळवंटीकरण होते. संरक्षित कलाकृती, स्मारके व पुस्तकावर विपरीत परिणाम, पिण्याच्या पाण्याचे प्रदूषण, कर्करोग, पोटाचे विकार व श्वसनाचे विकार, समुद्रातील मासे व वनस्पती मरतात. आम्ल पर्जन्याची समस्या कॅनडा, अमेरिका, आणि युरोपीयन राष्ट्रांना भेडसावत आहे. या पर्जन्याचा गंभीर परिणाम पाहता ते रोखण्यासाठी जीवाश्य इंधनाच्या वापरावर निर्बंध घालणे आवश्यक आहे.

२. **हरितगृह परिणाम- (Green House Effect)**हरितगृह परिणाम प्रक्रिया पृथ्वीच्या पृष्ठभागावरील तापमानात वाढ घडवून आणतात. तापमान वाढीस कार्बन ऑक्साइड (Co२) हा वायू जबाबदार असतो. कोळसा, खनिज तेलाचे ज्वलन, वाहनातील धूर यामधून कार्बनडाय ऑक्साईड हवेत मिसळला जातो. या वायूचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात वाढल्यास सूर्यापासून जमिनीवर पडलेल्या किरणांचे उत्सर्जन कमी होते आणि भूपृष्ठाचे तापमान वाढते. या वायूच्या प्रमाण वाढीबरोबर पृथ्वीचे तापमान वाढत जाते. यालाच हरितगृह परिणाम असे म्हणतात. ही वैश्विक समस्या असून या समस्येतून ध्रुवावरील बर्फ वितळून समुद्रातील पाण्याची पातळी वाढणार आहे. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील शहरे समुद्रात बुडण्याची शक्यता आहे. वाढत्या तापमानातून कृषी उत्पन्नावर परिणाम होऊन शेतीचे उत्पादन क्षमता कमी होऊन अन्नधान्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

३. **ओझोन क्षय- (Ozone Depletion)**वातावरणाच्या प्रदूषणाशी निगडीत महत्त्वाची समस्या म्हणजे ओझोन थराचे विरळ होणे होय. ओझोन थराचे मानवी जीवनात फारच महत्त्व आहे. हा थर संरक्षण जाळीसारखा कार्य करतो. सूर्यापासून परावर्तित होणारी किरणे ओझोन थरात अडवली जातात. त्यामुळे किरणाच्या घातक परिणामापासून मानवाचे संरक्षण होते. हायड्रोफलोरोकार्बन, नायट्रोजन युक्त खते, सल्फर हेक्साफलोराइड, परफलुरोकार्बन्स हे औद्योगिक क्षेत्रातून बाहेर पडणारे वायू पडतात. हे वायू ओझोन थराला विरळ बनतात. हे वायू रेफ्रिजरेटर, इन्सूलेटर्स, सूपरसॉनिक विमाने, शीतपेटया, शीतकपाटे, अग्नीशामक द्रव्य इत्यादी मधून उत्सर्जित होतात. ओझोन थर विरळ झाल्यामुळे हानिकारक क्ष-किरणे पृथ्वीच्या पृष्ठभागावर पडतात. हा थर अंटार्क्टिका खंडावर विरळ असून त्यामध्ये छिद्र पडल्याचे निर्देशनात आले. या छिद्राचा आकार दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कर्करोगात वाढ, सागरी पाणी व वनस्पतीचे अस्तित्व नष्ट, कृषी उत्पादना घट, रोगप्रतिकारशक्ती मंदावणे, तापमान वाढ, ध्रुवीय बर्फ वितळणे हे घातक परिणाम होतात. म्हणून २७ प्रगत राष्ट्रानी कृती समिती स्थापन करून CFC वायूच्या वापरावर बंदी लादली आहे.

४. **टिप- वैश्विक तापमान वाढ (Global Warming)** पर्यावरण प्रदूषणाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे वैश्विक तापमान वाढ मानला जातो. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून आर्थिक आणि उदयोगधंदयाच्या विकासाची प्रक्रिया सुरू झाली ती मूळात पर्यावरणाच्या ऱ्हासावर आधारित होती. युरोपियन राष्ट्रांनी आणि अमेरिकेने औद्योगिक विकास आणि आर्थिक विकास करतांना पर्यावरण संरक्षणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून पृथ्वीचे तापमान वाढविणाऱ्या कार्बन डाय ऑक्साईड ($Co_२$), मिथेन ($CH_४$), नायट्रस ऑक्साईड ($N_२O$), हायड्राफलोरोकार्बन ($HFC_s$), सल्फर हेक्साफलोराईड ($SF_६$) यासारखे पृथ्वीचे तापमान वाढविणारे वायू हवेत मिसळले जातात. कृषी उत्पादन वाढीसाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांचा भरमसाट वापर केला जातो. या खतामधून मिथेन आणि नायट्रस ऑक्साईड वायू हवेत मिसळले जातात. हवेमध्ये या वायूचे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढण्यास सुरूवात होते. विसाव्या शतकात पृथ्वीच्या तापमानात १ अंश सेल्सियश एवढी वाढ नोदविण्यात आलेली आहे. म्हणून विसावे शतक सर्वात उष्ण शतक मानले जाते. २१ व्या

शतकात त्यापेक्षा जास्त तापमानवाढीचा अंदाज तज्ञांनी वर्तविला आहे. त्यांच्या मते इ.स. २०५० पर्यंत पृथ्वीच्या तापमानात २ ते ११ सेल्सिअसमध्ये वाढण्याची शक्यता आहे. तपमानवाढीमुळे ओझोन थर विरळ होऊन त्यास छिद्र पडत आहे. ओझोन थराच्या विरळपणामुळे अतिनील किरणे पृथ्वीवर पोहचत असल्यामुळे त्यांच्या किरणोत्सारामुळे कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. तसेच तापमानवाढीमुळे ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वितळू लागेल. त्यामुळे सागराच्या पाण्याची पातळी वाढून किनाऱ्यावरील लोकांना महापूरासारख्या आपत्तीना सामोरे जावे लागेल किंवा किनाऱ्यावरील जमिन पाण्याखाली जाईल. सागरी पातळीत वाढ झाल्यामुळे सागरप्रवाहाची दिशा बदल, वादळे व मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होईल. बर्फाळ प्रदेश नाहीशे झाल्यामुळे वायूभार, पर्जन्य आर्द्रता, वाऱ्यावर विपरित परिणाम घडेल, तापमानवाढीमुळै प्राणी व वनस्पतीचे प्रजातीय संतुलन बिघडेल, आम्ल पर्जन्याचे प्रमाण वाढून पृथ्वीवर वाळवंट वाढेल, तापमानवाढीमुळे कृर्षी उत्पादन कमी होऊन अन्नधान्याची समस्या वाढेल. जागतिक तापमानवाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी घातक वायूच्या उत्र्सजनाचे प्रमाण कमी केले पाहिजे. त्याशिवाय या समस्येचे निराकरण करणे शक्य नाही.

**प्र. ४ था. पर्यावरण व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षणाबद्दलचे कायदे सांगा.**

मानवाने आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर विविध क्षेत्रात प्रगती साधून जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मात्र ही प्रगती करताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठया प्रमाणावर दुरूपयोग केल्याने आज अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. पर्यावरणाच्या ऱ्हासातून मानवी जीवनाला फार मोठया संकटाला तोंड दयावे लागत आहे. भविष्यात जर मानवाने योग्य उपाययोजना केल्या नाहीत मानवी जीवन नष्ट होऊ शकते म्हणून आधुनिक काळात पर्यावरण व्यवस्थापन ही संकल्पना वेगाने विकसित होत आहे. पर्यावरण प्रदूषणाची समस्या आज वैश्विक बनली आहे. अमेरिकेपासून ते भूतानसारख्या अत्यंत औद्योगिकदृष्टया प्रथम पायरीवर असलेल्या राष्ट्राला सुद्धा प्रदूषणाला तोंड द्यावे लागत आहे. पर्यावरणाच्या वाढत्या प्रदूषणातून निर्माण झालेल्या विविध समस्यातून जीवित आणि वित्तहानी होत आहेत. महायुद्धानंतर जागतिक पातळीवरील आर्थिक आणि औद्योगिक विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान झाल्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. या प्रक्रियेतून पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीची बेसुमार लुट केली जात आहे. त्यामुळे साधनसंपत्तीचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यातून पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. प्रदूषणाच्या समस्येतून जागतिक तापमान वाढ, आम्ल पर्जन्य, ओझोन थराचा क्षय हे प्रश्न निर्माण होत आहेत हे सर्व प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन काळाची गरज आहे. पर्यावरण व्यवस्थापनाशिवाय मानवी आणि प्राणी जीवनाचे संरक्षण अशक्य आहे. म्हणून प्रत्येक देश पर्यावरण व्यवस्थापनाला आपल्या धोरणात अग्रस्थान देत आहे.

**पर्यावरण व्यवस्थापन म्हणजे काय-** पर्यावरण व्यवस्थापन म्हणजे मानवाचा पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे होय. पर्यावरण व्यवस्थापन करतांना सर्व स्तरांतील लोकाचा आर्थिक विकास, जीवसृष्टीचे संरक्षण, साधन संपत्तीचे जतन, संवर्धन, यांच्या योग्य समन्वय करून आर्थिक विकास साधणे होय. पर्यावरणाचा ढासळत जाणारा समतोल निर्माण करण्यासाठी आणि या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी भारत सरकारने अनेक कायदे केलेले आहेत. याशिवाय पर्यावरण संरक्षणासाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजना आणि कार्यक्रमांमध्ये समन्वय साधण्यासाठी १९७२ मध्ये एका राष्ट्रीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीकडून पर्यावरण संरक्षण क्षेत्रामध्ये संशोधनाला प्रोत्साहन, पर्यावरण संरक्षण कार्यक्रमांना निधी, संतुलित औद्योगिक व आर्थिक विकास या उद्दिष्टांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी समितीकडे सोपविलेली आहे. एखादया प्रकल्प किंवा उद्योग उभारतांना तो पर्यावरण संरक्षणाशी सुसंगत आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचा अधिकार समितीला आहे. नवीन प्रकल्पाची उभारणी करतांना पर्यावरणाला धोका निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक मार्गदर्शन या समितीकडून पुरविले जाते.

१. **पर्यावरण संरक्षण कायदा- (The Enviormment Protection Act १९८६)-** भारत सरकारने १९८६ मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी सर्वसमावेशक कायदा संमत केला. हा कायदा घटनेतील कलम २५३ वर आधारित आहे. राजीव गांधीच्या पंतप्रधानपदाच्या काळात हा कायदा संमत झाला. या कायदयात पर्यावरण बाबींचा समावेश आहे. १९८४ मध्ये भोपाळ शहरात युनियन कार्बाईड कारखान्यातील विषारी वायू गळतीमुळे मोठया प्रमाणावर जीवित

आणि वित्तहानीच्या पार्श्वभूमीवर कायदयाची निर्मिती करण्यात आली आहे. या कायदयात अशा गंभीर अपघातांची दखल घेण्यात आली होती. याशिवाय वाढत्या पर्यावरण प्रदूषण नियंत्रण, सुरक्षितता, आरोग्य संवर्धन इत्यादींसंबंधी सविस्तर तरतुदी करण्यात आल्या आहेत. पर्यावरणास हानी पोहचविणाऱ्या व्यक्ती व संस्थावर कारवाई करण्याचा अधिकार सरकारला आहे. ह्या कायदानुसार सजीव प्राणी, वनस्पती, आणि इतर साधनसंपत्तीच्या संरक्षणासाठी तरतुदी करण्याचा अधिकार सरकारला आहे. तसेच पर्यावरण संरक्षण आणि सुधारणेविषयी तरतुदी कायदयात दिलेले आहे. या कायदयातील कलमांचे उल्लंघन करण्यास पाच वर्षापर्यंत शिक्षा किंवा १ लाख पर्यंत दंड करण्याची तरतूद आहे. या कायदयातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

A. पर्यावरण संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी केंद्रीय पातळीवर रचनात्मक यंत्रणेची उभारणी करणे.
B. पर्यावरण संरक्षणासाठी व्यापक नियमावलीची निर्मिती करणे.
C. पर्यावरण संरक्षणाशी संबंधित नियम, कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली.
D. पर्यावरणासाठी धोकादायक ठरणाऱ्या उद्योगाचे परीक्षण वा त्यांना करण्याचा शासनाला अधिकार देण्यात आला.
E. प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापनेची शिफारश करण्यात आली.

२. **जलप्रदूषण नियंत्रण कायदा (१९७४)-** पाण्याची गुणवत्ता जतन आणि जलप्रदूषण नियंत्रित करण्यासाठी भारत सरकारने १९७४ मध्ये हा कायदा संमत केला. या कायद्यान्वये केंद्रीय पातळीवर केंद्रीय जलप्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्यपातळीवर राज्य जल प्रदूषण नियंत्रण मंडळ निर्माण करण्यात आले. हे मंडळे केंद्र आणि राज्य पातळीवर प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी कार्यक्रमाची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करतात. तसेच जलसंरक्षणाबाबत जनजागृती करतात आणि संशोधनाला प्रोत्साहन देतात. जलप्रदूषण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना प्रशिक्षण, तांत्रिक साह्य ही संस्था पुरवित असते. हे मंडळ जलप्रदूषणाची आकडेवादी करणे, सांख्यिकीय माहिती प्रसिद्ध करणे, जलप्रदूषणाबाबत उपाययोजना सुचविणे, जलप्रदूषणाचे नमुन तपासणीसाठी प्रयोगशाळा स्थापन करणे इत्यादी कार्य करत असते. ही मंडळे जलप्रदूषणाचे कारण व परिणामाबाबत शासनास माहिती व सल्ला देणे, जलप्रदूषणास जबाबदार व्यक्तीस शिक्षा व दंडाची तरतूद या कायदयात करण्यात आली आहे. त्यानुसार जलप्रदूषणास जबाबदार व्यक्तीस तीन महिने कारावास व दहा हजार रूपये पर्यंतचा दंड होऊ शकतो. विविध राज्यात स्थापन झालेली जलप्रदूषण मंडळे कारखाने आणि उद्योगांतून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यातील प्रदूषणाचे प्रमाण ठरविण्यासाठी भारतीय मानक संस्थेने (Indian Standared Institute) ठरवून दिलेल्या निकषाचा आधार घेतला जातो. या मंडळाला कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा नमुना घेण्याचा व तपासणी करण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र आणि ओरिसा राज्यात जलप्रदूषणाचा स्वतंत्र्य कायदा असल्यामुळे ही दोन राज्य वगळून हा कायदा सर्व भारतीय घटकराज्याना लागू आहे.

३. **वायू प्रदूषण कायदा (१९८१)- Air Pollution and Prevention Act** वायू प्रदूषणाचे वाढत प्रमाण रोखण्यासाठी भारत सरकारने हा कायदा संमत केला. या कायद्यांतर्गत केंद्र सरकारने केंद्र आणि राज्यस्तरावर मंडळे निर्माण करून वायू प्रदूषण रोखण्यासाठी धाडसी पाऊल उचलले. या मंडळाला हवेची गुणवत्ता सुधारणे, वायूप्रदूषण रोखणे, वायू प्रदूषण नियंत्रण क्षेत्र घोषित करणे, ज्वलनशील पदार्थ वापरावर प्रतिबंध लादणे हे अधिकार दिले आहेत. या कायद्यान्वये राज्य सरकार एखादया प्रदेश हवा प्रदूषित मुक्त क्षेत्र म्हणून जाहीर करू शकतो. उदा. महाराष्ट्रात गडचिरोली जिल्हा उद्योगमुक्त जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. निर्धारीत मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषण करणाऱ्या कारखान्यावर खटला दाखल करण्याचा किंवा दंड करण्याचा अधिकार मंडळाला आहे. घातक वायूचा व्यक्तीला त्रास होत असेल तर न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे. वायू प्रदूषणविषयक सर्वसमावेशक कार्यक्रम आणि नियमावली या कायदयाने तयार करण्यात आली आहे.

४. **वन संर्वधन कायदा (१९८६)-** Enviornment Protection Act या कायद्यांतर्गत वन संरक्षणासाठी जागा आरक्षित करता येते. वनाव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी या भूमीचा या कायद्यान्वये वापरावर प्रतिबंध लादला

आहे. आरक्षित भूभाग खाजगी व्यक्तीस हस्तांतरित करण्यास मनाई करण्यात आली आहे. अशासकीय संस्था जमीन न देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या भूमीवरील झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली आहे. हा कायदा जम्मू-काश्मीर वगळता सर्व राज्यांना लागू आहे. जंगलातील वन्यजीव व वनस्पतीचे रक्षण करणे, वृक्षतोड व प्राण्याच्या शिकारीस बंदी लादणे, लोकांना पर्यावरण शिक्षण देणे, जंगलातील प्राणी व वनस्पती प्रजातीचे संरक्षण करणे, इत्यादी कार्य करणे अपेक्षित आहे.

५. **वन्यप्राणी संरक्षण अधिनियम-** Will life Protection Act वन्यजीवनाची अनेक कारणासाठी शिकार केली जाते. प्राण्याचे शरीर, मांस व अवयवाचा उपयोग अर्थाजनासाठी केला जातो. त्यामुळे वन्यप्राण्याच्या प्रजाती नष्ट होत चालल्या आहेत. या सर्व गोष्टींना प्रतिबंध लादण्यासाठी १९७२ मध्ये वन्यजीव संरक्षण कायदा संमत केला गेला होता. तो सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशाना लागू आहे. वन्यजीव आणि वनस्पतीच्या संरक्षणासाठी केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये स्वतंत्र मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आहे. हे मंत्रालयमार्फत वन्यजीव आणि वनस्पती संरक्षणासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात. दुर्मिक होणाऱ्या प्रजातीच्या संरक्षणासाठी विशेष प्रकल्पन राबविले जातात. उदा. १९५४ मध्ये प्रोजेक्ट क्रोकोडाईल. या कायद्यांतर्गत राज्य अभयारण्य, राष्ट्रीय उदयाने आणि वनाची घोषणा केली जाते. राज्यांना सल्ला देण्यासाठी वन्यजीव संरक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. सस्तन प्राणी, उभरचर व सरीसृप प्राणी व पक्षांच्या शिकारीला प्रतिबंध लादण्यात आला. कायदा भंग करणाऱ्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. देशातील ४% भागाला अभयारण्य किंवा राष्ट्रीय उदयाने घोषित करण्यात आले. या कायदामुळे वन्यजीव व जंगल संरक्षण होण्यास मदत होते. राष्ट्रीय उदयाने आणि अभयारण्याच्या स्थापनेमुळे प्राणी व वनस्पतीच्या प्रजातीचे सरक्षण होते. वन्यपाणी व वनस्पती संरक्षणासाठी मंडळे स्थापन करणे हे प्रमुख उद्देश ह्या कायदाने साध्य होतात. १९८२ मध्ये वन्यजीवांच्या रक्षणासाठी धडक कृती योजना आखण्यात आली.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. पर्यावरणवाद म्हणजे काय?

उत्तर- जॉन टर्क यांच्या मते, पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर होणारा प्रभाव म्हणजे पर्यावरणशास्त्र होय. पर्यावरणाच्या संबंधात निर्माण झालेल्या समस्या व त्यावरील उपाय यांचा अभ्यासही पर्यावरणशास्त्रात केला जातो.

२. पर्यावरणवादाची दोन वैशिष्ट्ये लिहा.

उत्तर- औद्योगिकीकरणाला विरोध, भांडवलशाहीला विरोध, निःशस्त्रीकरणाला समर्थन, निसर्गकेंद्रित विचारसरणी इत्यादी पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये आहेत.

३. प्रदूषण म्हणजे काय?

उत्तर- पर्यावरणातील काही घटकांच्या संचयामुळे मानवी जीवनावर अपायकारक परिणाम होता त्यास प्रदूषण असे म्हणतात.

४. पर्यावरण प्रदूषणाचे दोन परिणाम कोणते?

उत्तर- वैश्विक तापमान वाढ, आम्ल पर्जन्य, ओझोन क्षय, हरितगृह परिणाम हे पर्यावरण प्रदूषणाचे दोन परिणाम आहेत.

५. प्रदूषणाचे प्रकार कोणते ते सांगा.

उत्तर- जल प्रदूषण, हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि भूमी प्रदूषण हे प्रदूषणाचे प्रमुख प्रकार आहेत.

६. पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने केलेले कोणते कायदे केले आहेत.

उत्तर- वन्यजीव संरक्षण कायदा, वायू प्रदूषण कायदा, पर्यावरण संरक्षण कायदा, जलप्रदूषण नियंत्रण कायदा हे कायदे भारत सरकारने केलेले आहेत.

७. पर्यावरण व्यवस्थापन म्हणजे काय?

उत्तर- पर्यावरण व्यवस्थापन म्हणजे मानवाचा पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे होय. पर्यावरण व्यवस्थापन करतांना सर्व स्तरांतील लोकाचा आर्थिक विकास, जीवसृष्टीचे संरक्षण, साधन संपत्तीचे जतन, संवर्धन, यांच्या योग्य समन्वय करून आर्थिक विकास साधणे होय.

८. प्रदूषण निर्मितीला कारणीभूत दोन वायूची नावे लिहा.

उत्तर- कार्बन डाय ऑक्साईड ($Co_२$), मिथेन ($CH_४$), नायट्रस ऑक्साईड($N_२O$), हायड्राफलोरोकार्बन ($HFC_s$), सल्फर हेक्साफलोराईड ($SF_६$) हे वायू प्रदूषण निर्मितीला कारणीभूत मानले जातात.

९. पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक दोन उपाय सांगा.

उत्तर- जंगल निर्मिती, घातक वायूच्या उत्सर्जनावर प्रतिबंध, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बेसुमार वापरावर प्रतिबंध हे पर्यावरण संरक्षणासाठी उपाय सांगता येतात.

१०. पर्यावरण संरक्षण कायदा कोणत्या वर्षी आणि कोणाच्या काळात संमत झाला ते सांगा.

उत्तर- पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना संमत झाला होता.